महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

# हाकारा

वर्ष : पंचविसावे
अंक : दुसरा

एप्रिल - जून २००४



## हाकारा अंक सूची

१९८० - १. जबरन जोत जंगल जमीन २. आदिवासी व शिक्षण
३. आदिवासी वनसंवर्धन ४. आदिवासी साहित्य व कला

१९८१ - १. दलितांना सवलती व राखीव जागा
२. आदिवासी व आरोग्य ३. वनशेती व संवर्धन
४. रोजगार हमी योजना

१९८२ - १. धरणे व विकास २. धरणे व विकास
३-४. जंगल व्यवस्थापन

१९८३ - १. आदिवासी व दारु
२.आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
३. प्रा. सरदार गौरव अंक
४. आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न

१९८४ - १-२ आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
३. आदिवासी स्त्री ४. आदिवासी आरोग्य व शिक्षण

१९८५ - १. आदिवासी संघटन २. जमीन हस्तांतर
३. आदिवासी महिला ४. आदिवासी व सरकार

१९८६ - १. जंगल व धरण २. आदिवासी कला
३. आदिवासी व वेठबिगारी
४. आदिवासीविषयक ग्रंथ : मानवशास्त्र परिचय

१९८७ - १. भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
२. आदिवासी आणी सांस्कृतिक बदल
३-४. राष्ट्रीय वननितीचा प्रश्न

१९८८ - १. सवलती अपहरणाची समस्या
२. आदिवासी साहित्य
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९८९ - १-२. डॉ. वेरिअर एल्विन विशेषांक
३-४. व्यवसाय मार्गदर्शन

१९९० - १-२. महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
३. जागतिक आदिवासी
४. गं. बा. सरदार स्मृति विशेषांक

१९९१ - १. आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
२. आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
३. आदिवासी जिवन व संस्कृती

१९९२ - १-२. आदिवासी समाज जीवन
३-४. अनुताई वाघ विशेषांक

१९९३ - १-२. आदिवासी धर्म, सण व उत्सव
३-४. धरण - विस्थापन व पुनर्वसन

१९९४ - १. आदिवासी संस्कृती
२. आदिवासी एकता परिषद
३. आदिवासी विकासाची सैध्दांतिक भुमिका
४. आदिवासी जमाती

१९९५ - १-२. राणीपूर अभ्यास विशेषांक
३. कुपोषण विशेषांक ४. पर्यावरण विशेषांक

१९९६ - १. आदिवासी जमाती
२. महाराष्ट्र, ओरिसा आदिवासी अध्ययन
३. आदिवासी जमाती
४. आदिवासी शिक्षण

१९९७ - १-२. वारली लोकगिते व बोलीभाषा
३. पंचायत राज विशेषांक
४. साहित्य संमेलन विशेषांक

१९९८ - १. वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
२. आदिवासी व प्रशासन
३-४. आदिवासी समाज व संस्कृती

१९९९ - १. आदिवासी व आर्थिक धोरण
२. आदिवासी विकास व संस्कृती
३-४. बोर्डी परिसर अभ्यास

२००० - १. आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
२. स्त्रिया आणि आरोग्य
३. पाणी टंचाई आणी पाणलोट विकास
४. आदिवासी जीवन व संस्कृती

२००१ - १-२. अस्मिता व विकास विशेषांक
३. आदिवासी समाज व शासन
४. अस्मिता व विकास : दिशा २००१

२००२ - १. आदिवासी व उपेक्षित समाज : अस्मिता आणी विकास
२-३. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : महाराष्ट्र
४. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प :
पर्यायी उपाययोजना

२००३ - १-२. पायाभूत सोयीसुविधा अभ्यास प्रकल्प : मध्यप्रदेश
३. आदिवासी समाज ४. आदिवासी संस्कृती

२००४ - १. पुस्तक परिचय २. ?
३-४ आदिवासी विकास धोरण

२००५ - १. प्रस्तावित वनकायदा
२. डॉ. बानू कोयाजी स्मृती विशेषांक
३ -४ आरोग्य व्यवस्था व शिक्षण - नंदूरबार अभ्यास

कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ॥
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक

संपादक
रामचंद्र मुटाटकर

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

वर्ष : पंचविसावे | एप्रिल-जून २००४ | अंक : दुसरा

## अनुक्रमणिका

संपादकीय ....... २
भूमिहीन, वेठबिगार कुपोषित आदिवासी - रा. वि. भुस्कुटे ....... ३
कोकणी समुदायाचे राजकारणातील सहभागाविषयी
समाजशास्त्रीय अध्ययन-डॉ. कल्याण मोरे ....... ७
नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजातील
व्यसनाधीनता: स्वरुप व उपायोजना-प्रा. फारुक के. शेख ....... १४
आदिवासी संस्कृतीचे समकालीन संदर्भ - उषाकिरण आत्राम ....... १९
विकासाच्या वाटेकडे-सुभाष पावरा ....... २५
पाऊस - एक आदिवासी अख्यायिका-विरसिंग पाडवी ....... ३६
आदिवासी संस्कृती आणि समाजकार्य - डॉ. शैलजा देवगांवकर ....... ३९
आरोग्य शिक्षणासाठी विस्तार कार्य आणि
दृक श्राव्ये माध्यमे - डॉ. शैलजा देवगांवकर ....... ४२
आदिवासी रंगभूषा-वेशभूषा - कुंडलिक केदारी ....... ४४
संस्था-वृत्त
संस्थेने जनसेवा करण्याची संधी दिली -श्रीकृष्ण रघुनाथ वैद्य (काका)....... ४६

• **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे-४११ ००७.

• **मुद्रक व प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
अध्यक्ष, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

• **मुखपृष्ठ छायाचित्र**
डॉ. पुरुषोत्तम आगाशे

• **अक्षर जुळणी**
आरती परदेशी

अंक मूल्य २५ रूपये

• **विशेष सहाय्य**
विदुला पुरोहित

• **मुद्रण स्थळ**
मोनार्क प्रिंट आर्टस, पुणे ३०.

या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

आदिवासी समाज व संस्कृती याबाबत ब्रिटिश अधिकाऱ्यांनी व मानवशास्त्रज्ञांनी विपुल लेखन केले आहे. महात्मा गांधींच्या रचनात्मक कार्यक्रमाचा भाग म्हणून गांधींच्या अनुयायांनी शिक्षणाचा प्रसार केला. साम्यवादी संघटनांनी आदिवासींची पिळवणूक व त्यांच्या जमीन मालकीच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले. स्वातंत्र्यानंतर घटनेस अनुसरुन भारत सरकारने आदिवासी उपयोजना सुरु केल्या. तरी शहरातील मध्यमवर्गीयांचे आदिवासी संस्कृती व समाजाबाबत अज्ञान व गैरसमज आहेत. आदिवासींच्या गरिबीस इतिहास काळापासून भारताबाहेरचे आलेले लोक आणि त्यानंतर त्यांची पिळवणूक करणारे सावकार, शासकीय अधिकारी व त्यांना जंगल निसर्गातून हुसकावून लावणारे शासकीय धोरण जबाबदार आहे. ज्याप्रमाणे पाश्चिमात्य ग्रामीण भागात द्राक्षापासून घरोघरी स्वत:च्या वापरासाठी मद्य तयार करण्यात येते; त्याचप्रमाणे आदिवासी समाजात महुवा पासून मद्य तयार करण्यात येत असे. परंतु शासनाच्या अबकारी करामुळे आणि साहूकारांनी दारुची सवय लावून त्यांना कर्जबाजारी बनविले. आदिवासी समाजात आदिवासी स्त्रीवर आदिवासी पुरुष कधीही बलात्कार करत नाही. याच्या खोलात जाऊन आदिवासी संस्कृतीची श्रेष्ठता अभ्यासली जात नाही. श्री. रा.वि भुस्कुटे यांनी आदिवासी भूमिहीन होण्याच्या कारणांची यथायोग्य चर्चा केली आहे. आदिवासीचे जंगलाशी नाते हे मायलेकराचे आहे आणि याबाबतचे दाखले त्यांच्या साहित्यात सापडतात. जंगलातील अन्नसंकलनावर प्रतिबंध आणि निकृष्ट शेत जमीन आणि तीही अल्प, अशा परिस्थितीत आदिवासी जगतो कसा? ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे. नंदूरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यात काठी व मोलगी येथील होळीचा सण शांतपणे साजरा करणारा दहा-पंधरा हजाराचा समुदाय बघितला की आदिवासी किती शांतीप्रिय आणि शिस्तबद्ध आहे याची प्रचिती येते. अर्थात हे सण थोडक्यात न आवरता लांबणीवर पडतात आणि त्यामुळे शाळा-आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या दीर्घकाळपर्यंत रोडावते, ही चिंतनीय बाब आहे. निसर्गाच्या सानिध्यात आणि निसर्गाचे अंग असणाऱ्या आदिवासींना प्रगल्भ सौंदर्य दृष्टी आहे. त्यांच्याकडे साधनांचा अभाव असूनही स्त्री व पुरुष आपली वेशभूषा व केशांची राखण आकर्षक करतात.

हाकारातील या अंकात आदिवासी संस्कृतीविषयक लेख आहेत. श्री. सुभाष पावरा यांनी आदिवासी विकासाच्या संदर्भात चर्चा करुन उपयुक्त शिफारशी केल्या आहेत. उषाकिरण आत्राम यांनी आदिवासी संस्कृतीचा ऐतिहासिक आढावा घेत आजच्या समस्यांवर प्रकाश टाकला आहे. हाकाराची पंचवीस वर्षांची वाटचाल लक्षात घेता आदिवासी संस्कृती व समाजाबद्दल केवळ वर्णानात्मक लेखन न करता त्यांच्या विकासात अडथळा निर्माण करणाऱ्या समस्यांबाबत अभ्यास, चर्चा व शिफारशींची गरज आहे. तसेच महाराष्ट्राबाहेरील आदिवासी समाज आणि विशेषत: ईशान्येकडील आदिवासी राज्ये याबाबत जास्त माहिती पुढे आणणे अगत्याचे आहे. विद्यापीठातील डिग्री मिळविण्यासाठी केलेले शोधनिबंध हाकाराच्या माध्यमातून प्रकाशित होऊ नये असे आम्हाला वाटते. प्रत्यक्ष आदिवासी समाजात निवास करुन आदिवासींच्या नजरेतून त्यांची संस्कृती व त्यांच्या समस्या यांचे विचार हाकारामार्फत सर्व समाजात पोहोचविण्याचे कार्य आम्ही करावयास हवे, असा विश्वास आहे.

रा. के. मुटाटकर
संपादक

# भूमिहीन, वेठबिगार कुपोषित आदिवासी

रा. वि. भुस्कुटे

भारतात १८७ जिल्ह्यात साडेआठ कोटी आदिवासी राहतात. महाराष्ट्रातील आदिवासी जमातींची संख्या ४५ आहे. (पूर्वी ती ४७ होती.) त्यामध्ये गोंड, भिल्ल, कोळी महादेव, कोकणा, वारली, ठाकूर हलबा, कातोडी, कोळी मल्हार आणि कोलम या प्रमुख जमाती आहेत. २००१च्या खानेसुमारीनुसार महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या ८५.७८ लक्ष आहे. राज्यातील एकूण लोकसंख्येच्या ८.८७ टक्के आदिवासी आहेत. त्यापैकी ग्रामीण भागात राहणारे आदिवासी ७४.८७ लक्ष असून शहरी भागात १०.९१ लक्ष आहेत. १९९१ ते २००१ च्या दशकात आदिवासींच्या लोकसंख्येत १७.२० टक्कयांनी वाढ झाली आहे. भारत देशातील राज्यवार आदिवासींच्या संख्येत महाराष्ट्राचा क्रमांक तिसरा आहे. १००० आदिवासी पुरुषामागे ९७३ आदिवासी स्त्रिया आहेत.

भारतीय संविधानातील कलम २४४ (१) नुसार राष्ट्रपतींनी घोषित केलेले राज्यातील ५ व्या अनुसूचित क्षेत्राचे क्षेत्रफळ ४६५३१ चौ. कि.मी. आहे. हे क्षेत्र १५ जिल्ह्यात असून यामध्ये ५००९ खेडी आणि १२ शहरे आहेत. धुळे, नंदूरबार, ठाणे, नाशिक, नागपूर, चंद्रपूर, अमरावती, गडचिरोली या जिल्ह्यातून आदिवासी मोठ्या संख्येनी आहेत, ते त्या जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या १० ते ४० टक्के आहेत.

उपयोजना क्षेत्राबाहेर २५ टक्के आदिवासी आहेत. महाराष्ट्र राज्यात १५४३० चौ. कि.मी. सुरक्षित वनक्षेत्र आहे. या क्षेत्रात ३६ वन्यजीव संरक्षित क्षेत्रे ५, राष्ट्रीय उद्याने आणि ३ व्याघ्र राखीव वनक्षेत्रे आहेत. राखीव वनक्षेत्र ५९५९ चौ. कि.मी. असून महसूल आणि खाजगी जमिनीसह इतर वनक्षेत्र ९७४१ चौ. कि.मी. आहे. राज्यात एकूण ६१,८६७ चौरस कि.मी. भूभाग वनव्याप्त असून हा भाग राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २१ टक्के आहे. यापैकी ३१,२७७ कि. मीटर क्षेत्र म्हणजे ३९ टक्के क्षेत्र आदिवासी क्षेत्रात आहे. या संरक्षित वनक्षेत्रात अजूनही ७३ वनगावे आहेत. ती नंदूरबार जिल्ह्यात आहेत या विविध प्रकारच्या वनक्षेत्रात राहणारे आदिवासी परंपरागत जंगलातून उपलब्ध होणाऱ्या नैसर्गिक जीवनदायी गोष्टीवर अवलंबून गोष्टीवर अवलंबून होते आणि आहेत.

जळी जिणे लाजिरवाणे तंट्या भिल्लाचे सांगणे

आदिवासी भागात भरपूर जमीन असल्याचे आणि आदिवासी कुटुंबाची जमीन धारणा देखील मोठी असल्याचा एक गैरसमज आहे. राज्यातील ४१.८ टक्के आदिवासी भूमीहीन आहेत. (एन.एस.एस. ४४ ची फेरी) ४३ टक्के आदिवासींकडे ०.०१ ते ४.०४ हेक्टर्स जमीन आहे. आदिवासी कुटुंबाकडील सर्वसाधारण सरासरी जमिनीचे क्षेत्र ०.९८ हेक्टर आहे. महाराष्ट्रातील आदिवासी भूधारकांचे एकूण भूधारकाशी प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

| वर्गीकरण | धारक संख्या (लाख) | टक्के | धारण केलेले एकूण क्षेत्र (लाख हेक्टर) | टक्के |
|---|---|---|---|---|
| महाराष्ट्रातील एकूण भूधारक | ९४.७० | १००% | २१२.२० | १००% |
| आदिवासी भूधारक | ६.३४ | ७% | १५.३२ | ७३% |
| एकूण भूधारकांपैकी व्यक्तीगत भूधारक | ५.७७ | ९१% | १३.५७ | ८८.६% |
| संयुक्त भूधारक | ०.५७ | ९% | १.७५ | ११.४% |

१० टक्के आदिवासी भूधारकांकडे एक हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे. आदिवासींकडे असणारी जमीन काही अपवाद वगळता अतिशय हिणकस दर्जाची, कमी कसाची आहे. जंगलातील आदिवासींच्या जमिनी या उताारावरील मातीचा पातळ थर असणाऱ्या आहेत. आदिवासींच्या जमिनी कोरडवाहू आहेत. अनेक ठिकाणी त्या खडकाळ आहेत. डोंगराळ भागातील, दऱ्या, खोऱ्यातील आदिवासींच्या जमिनीचा पावसाचे पाणी वाहून नेण्याचा घेरा खूप असतो. आधुनिक सेंद्रीय तंत्रज्ञानाचा अभाव आदिवासी क्षेत्रात जाणवतो. उलट काही भागात आधुनिक संकरीत बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या वापरामुळे नव्हती ती संकटे आदिवासींच्या शेतीवरही येऊ लागली आहेत. काही परंपरागत टिकाऊ आणि कसदार अन्नधान्ये नाहीशी होत आहेत. त्यामुळे शेतीमालाचे उत्पन्न निकृष्ट पद्धतीचे आहे.

मोठमोठी धरणे, औद्योगिक संरक्षण प्रकल्प, महामार्ग इत्यादी आदिवासी क्षेत्रातच मुख्यत्वेकरुन होत असतात. राष्ट्रीय विकासाच्या प्रकल्पासाठी आदिवासींची मालकीची जमीन फार मोठ्या प्रमाणावर संपादन करण्यात येते. ते भूमीहीन होतात. जमिनीची भरपाई मिळावी म्हणून त्यांना संघर्ष करावा लागतो. पुनर्वसन कायदा असूनही त्यांचे पुनर्वसन करण्यात येत नाही. हजारो नव्हे लाखो आदिवासी विविध विकास प्रकल्पांमुळे भूमिहीन झाले आहेत. शेतमजुरी आणि वेठबिगारी करुन कसे तरी तगून आहेत.

एन.एस.एस. च्या अंदाजाप्रमाणे ४६ टक्के ग्रामीण आदिवासी कुटुंबे त्यांच्या उपजीविकेचा मुख्य हिस्सा स्वयंरोजगारातून मिळवतात तर ४७ टक्के कुटुंबे मोलमजुरी करुन पोट भरतात. स्वयंरोजगारातून उपजीविका चालविणाऱ्यांमध्ये ४४ टक्के शेतीवर अवलंबून आहेत. तर फक्त दोन टक्के बिगर शेती व्यवसायात आहेत. कंदमुळे इत्यादी अन्न गोळा करुन जगणारे किंवा शिकार करणारे आदिवासी खूपच कमी आहेत. कातकरी/काथोड सारख्या आदिम मागास जमातीमध्ये अजूनही घुशीची, वानराची शिकार करुन पोट भरण्याची पाळी त्यांच्यावर ओढवलेली आहे. साहजिकच बहुसंख्य आदिवासी कुपोषित आहेत.

आदिवासी क्षेत्रात पशुसंपत्ती ही मुबलक प्रमाणात आहे. पशुधन व म्हशी यांचे प्रमाण आदिवासी क्षेत्रात अनुक्रमे २७ टक्के व १९ टक्के आहे. शेळ्या मेंढयांचेही प्रमाण मोठे असून त्यांचे प्रमाण अनुक्रमे ११ व २२ टक्के आहे. तर आदिवासी क्षेत्रात कुक्कुट संख्या २५% आहे. याचाच अर्थ आदिवासींच्या जीवनात जमिनीला आणि जंगलाचा फार मोठे महत्त्व आहे. जंगलावरील जमिनीवरील मालकी आणि अधिकार हिरावून घेतल्यामुळे आदिवासींवर उपासमारीची कुपोषणाची आणि भुकेकंगाल

कर्जबाजारीपणाचे संकटे वारंवार कोसळत आहेत. त्यांना घरेदारे सोडून जगण्यासाठी स्थलांतर करण्याची आणि वेठबिगारीचे लाजीरवाणे जिणे जगावे लागत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळून ४८ वर्षे झाली असली तरी भारतात अजून ५० लाख वेठबिगार आहेत. ते बहुतेक आदिवासी जमातीचे आहेत.

खरीप हंगाम संपल्यावर आदिवासींना गाव सोडून मोलमजुरी करुन जगण्यासाठी स्थलांतरीत व्हावे लागते. भट्टया, कोळसा भट्टया, साखर कारखान्यातून आदिवासी कुटुंबांना वर्षातील ६/७ महिने मजुरी करावी लागते. त्यांना तेथे किमान वेतनही मिळत नाही. अन्याय अत्याचारांना ते बळी पडतात. आदिवासींमध्ये साक्षरतेच्या दराची सरासरी ३६.५६ टक्के आहे. (पुरुष ४९.०९ टक्के, स्त्रिया २४.०३ टक्के) तर महाराष्ट्रात सर्वसाधारण साक्षरता ६४.८७ टक्के आहे. (पुरुष ७६.५६, महिला ५२.१० टक्के शिक्षणाचे बाबतीत स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ५० वर्षे होऊन गेली तरी आदिवासी समाज अजूनही फार मागासलेला अशिक्षित आहे. राज्यातील शाळांमधील (माध्यमिक) एकूण विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण ५४ टक्के आहे. तर आदिवासी विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण ७० टक्के आहे. दारिद्रयात खितपत राहिलेल्या आदिवासी कुटुंबाची संख्या कमीत कमी होत असल्याचा शोध शासनाने लावला आहे. आदिवासी कुटुंबाची जमिनीवरच आणि जंगलातून होणारी सततची हकालपट्टी, त्यांचे दरवर्षी वाढत्या संख्येने आणि अधिकाधिक काळासाठी होणारे स्थलांतर त्यांच्या जमीनीचे हस्तांतरण या गोष्टी त्यांचे दारिद्रय कमी करतात काय?

श्री. दिलीप सिंग भुरीया यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित क्षेत्र आणि अनुसूचित जमाती आयोगाने त्यांच्या महाराष्ट्र राज्याच्या अहवालात दिलेली आकडेवारी अशी आहे.

महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील आदिवासी कुटुंबाचे सरासरी प्रमाण ९०.८९ टक्के आहे. गडचिरोली जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे ९७.२५ टक्के आदिवासी कुटुंबे बीपीएलची आहेत. त्या खालोखाल शहापूर (ठाणे) मध्ये ९६.५९ आहेत.

आदिवासींचे दारिद्रय कमी करण्याचा एक महत्त्वाचा उपाय म्हणजे त्यांना करण्यासाठी जमिनी देणे, जमीन सुधारणा कायद्याची नीट अंमलबजावणी करुन आदिवासी भूमिहीनांना जमिनी वाटप केल्या पाहिजेत. पश्चिम बंगाल मधील मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीच्या सरकारने ५ लक्ष आदिवासींना जमीन वाटून दिली. त्रिपुरामधील डाव्या आघाडीच्या सरकारने आदिवासींची बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झालेली सर्व जमीन आदिवासींना परत दिली.

मार्च २००२ पर्यंत महाराष्ट्र राज्यातील १०.२३ लक्ष एकर सरकारी पडीक जमीनीचे वाटप केल्याची माहिती सरकारकडून सांगितली गेली. पण यापैकी आदिवासींना किती वाटली ते मात्र सांगितले नाही. तसेच १.०४ लक्ष भूदान जमीनीपैकी फक्त २७००० एकर वाटली गेली अशी माहिती सरकार सांगते. यापैकीही किती आदिवासींना दिली त्याची माहिती दिली गेली नाही.

भारतीय संविधानातील ५ आणि ६ अनुसूची आदिवासींकडून बिगर आदिवासींकडे जमीनींचे हस्तांतरण होऊ नये म्हणून अशा हस्तांतरणाला मनाई करतात. सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा आदिवासींच्या जमीन हस्तांतरणावर निर्बंध घातले आहेत. तरीही मोठ्या प्रमाणावर आदिवासींच्या जमिनीचे हस्तांतरण चालूच आहे. जेव्हापासून साम्राज्यवादी जागतिकीकरणाची खाजगीकरणाची आणि उदारीकरणाची आर्थिक धोरणे

राबविली जाऊ लागली. तेव्हापासून केंद्रातील आणि महाराष्ट्र राज्यातील एकामागून एक येणाऱ्या सर्वच भांडवलदारी सरकारांनी आदिवासींच्या जमीन हस्तांतरणाला मुक्त वाव दिला आहे. संविधानातील ५ व्या अनुसूचीत बदल घडवून आणण्यासाठी बड्या भांडवलदार जमीनदारांनी हालचाल सुरु केली. व्यवस्थापनाची नवी रचना करुन आंध्र प्रदेशमध्ये इंडियन टोबॅको सारख्या बड्या खाजगी कंपन्यांना वनजमिनी बहाल करण्यात येऊ लागल्या. पोलाद उद्योगाकरिता जिंदाल कंपनीने छत्तीसगडमध्ये आदिवासींची जमीन बेनामी पद्धतीने हस्तांतरण करुन बळकावली. महाराष्ट्रात पुणे जिल्ह्यातील ३७६० एकर जमीन पर्यटन प्रकल्पासाठी सहारा हौसिंग वि. या कंपनीने हडप केली. यातील बरीच जमीन आदिवासींची आहे. मुंबई-पुणे एक्सप्रेस हायवे खाली रायगड जिल्ह्यातील कातकरी आदिवासींच्या वस्त्या आणि दळी जमीनी गाडल्या गेल्या. रायगड जिल्ह्यातील ४०० हेक्टर पेक्षा जास्त दळी जमीन तथाकथित विकासासाठी आदिवासींकडून हिसकावून घेतली गेली आहे. जुलमी फॉरेस्ट-जमीनदारांची दादागिरी संपुष्टात आणावीच लागेल.

आदिवासींच्या बिगर आदिवासींकडे हस्तांतरीत झालेल्या जमिनी त्यांना पुन: परत देण्यासाठी दोन कायदे क्र. ३५/१९७४ आणि क्र. १४/१९७५ करण्यात आले आहेत. वेठबिगारीत आदिवासी राहू नयेत म्हणून बंध मुक्ती कायदा १९७६ करण्यात आला आहे. रोजंदारीवर जगणाऱ्यासाठी किमान वेतन कायदा करण्यात आलेला आहे. तर आदिवासींवर अत्याचार होऊ नयेत म्हणून अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ करण्यात आलेला आहे. पण हे कायदे जरी करण्यात आले असले तरी ते अमलात आणण्याची राजकीय इच्छाशक्ती शासनाची नसल्याने नोकरशाही हे कायदे अमलात आणत नाही. ही कटू पण सत्य वस्तुस्थिती आहे आणि त्यामुळेच महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रात नक्षलवादच टिकून आहे आणि फोफावतही आहे हे आम्ही लक्षात घेतले पाहिजे.

आदिवासींची मुले कुपोषणामुळेच दरवर्षी मृत्यू पावत आहेत, तर कर्जबाजारीपणामुळे विदर्भात शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागत आहेत. मुख्यमंत्री पद भूषवणारे वसंतराव नाईक, शरद पवार, शिवाजीराव पाटील, निलंगेकर, विलासराव देशमुख हे शेतकऱ्यांचे हितरक्षण करण्यास बाधील असल्याचे कटाक्षाने सांगत आहेत. वस्तुस्थिती मात्र काही वेगळीच आहे. शासनकर्ते बुरसटलेल्या सरंजामी मनोवृत्तीचे प्रतिगामी सधन शेतकरी आहेत. बहुसंख्येनी असलेल्या मध्यम, गरीब शेतकरी आणि भूमिहीनांना राबवून घेऊन धनीक शेतकऱ्यांचे सर्वार्थाने हितरक्षण करण्याकडे त्यांचे सगळे लक्ष केंद्रीत झालेले असते. एवढेच नव्हे तर, आहे ती परिस्थिती कायम ठेवण्यात जमीनीची विषय वाटणीची जपवणूक करण्यात, शेतमजूर, स्वरूपात मिळावेत म्हणून भूमिहीनांना जमीन न देण्यामध्ये ह्याचे स्वत:चे आणि त्यांच्या वर्गाचे हितसंबंध गुंतलेले आहेत. सत्तेचा वापर भ्रष्टाचार करुन अब्जावधीची माया जमवण्यासाठी स्वत:चे आसन टिकवून ठेवण्यासाठी ते राजरोस करत आलेले आहेत. लोकप्रिय घोषणा देऊन अंमलात न येणारी भरमसाठ आश्वासने देऊन जातीचे राजकारण करुन निवडून येण्याकडे त्यांचे सदा सर्वकाळ लक्ष केंद्रीत झालेले दिसून येते. चहुबाजूंनी कोंडी झालेल्या महाराष्ट्रातील आदिवासींना या महाकठीण परिस्थितीतून मार्ग काढावा लागणार आहे. आदिवासी लढाईत कधी पांढरे निशाण फडकवत नाहीत. तेव्हा महाराष्ट्रातील लढाऊ आदिवासी संघटीत होऊन यातूनही निश्चितपणे मार्ग काढतील. ●●

# कोकणी समुदायाचे राजकारणातील सहभागाविषयी समाजशास्त्रीय अध्ययन

डॉ. कल्याण मोरे

प्रस्तावना - भारतीय समाजाच्या मागासलेपणाच्या आधारे विकसित व मागासलेला समाज असे दोन विभागात वर्गीकरण केले जाऊ शकते. मागासलेल्या प्रवर्गात प्रामुख्याने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासलेले यांचा समावेश होतो. घटनेनुसार जाती-जमातीचा त्यांचा मागासलेपणा लक्षात घेऊन त्यांच्यात विकास घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून काही जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची जबाबदारी शासनावर टाकण्यात आलेली आहे. या जाती-जमातीला भारतीय राज्यघटनेने मान्यता दिली असून त्यांची यादी घटनेच्या परिशिष्टात दिली आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांचा उल्लेख अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणून केलेला आहे.

भारतात अनेक राज्यांमध्ये अनेक प्रकारचे आदिवासी वा अनुसूचित जमातीचे समूह आहेत. सामाजिक स्तर, सांस्कृतिक वारसा, राहणीमानाचा दर्जा, आर्थिक परिस्थिती इत्यादी अनेक घटकांच्या बाबतीत हे समूह इतर समूहांपासून वेगळे असल्याचे जाणवते. वेगवेगळ्या प्रांतात त्यांचे वेगवेगळे प्रकार आहेत आणि ते वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात.

भारताच्या राजकीय क्षेत्रात आदिवासींना राखीव जागांमुळे फायदा झालेला आहे. सरकार वा शासन कोणत्याही पक्षाचे असो आदिवासींकरिता राखीव जागा असतात व त्या (राजकीय क्षेत्रातील) भरल्याही जातात. याचा फायदा आदिवासींना झाल्याचे दिसून येते.

आजपर्यंतच्या काळात आदिवासींवर बरेच संशोधन झाले आहे; परंतु आदिवासी समुदायाला वेगवेगळ्या भागात ज्या राखीव जागा दिलेल्या आहेत, त्यामुळे त्यांचा कितपत विकास झाला याचा ऊहापोह कधीच झाला नाही. आदिवासी समुदायाला राजकारणात ज्या राखीव जागा दिलेल्या आहेत, त्यामुळे त्यांचा विकास कितपत झाला हे पाहण्याच्या अनुषंगानेच 'कोकणी समुदायाचा राजकारणातील सहभाग' हा विषय प्रस्तुत शोध-निबंधासाठी निवडला. कोकणी समुदायाचा राजकारण हा जीवनाचा अविभाज्य घटक असून या घटकामुळे त्यांच्या जीवन पद्धतीचा, विविध समस्यांचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास होणे आवश्यक आहे, तसेच ती काळाजी गरज आहे. याविषयीची व्यापक व्याप्ती लक्षात घेता हा विषय धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील साक्री आणि नवापूर तालुक्यातील कोकणी समुदायापुरताच सीमित केलेला आहे. या शोध-निबंधात कोकणी समुदायाच्या राजकीय सहभागाविषयी समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केलेला आहे. तसेच बऱ्याच समाजशास्त्राज्ञांनी कोकणी समुदायाविषयी अध्ययन केलेले आहे.

शाह पी.जी. आणि कॅम्पबेल यांनी सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनाविषयीची बरीच माहिती दिलेली आहे. हे विवरण गुजराथमधील कोकणी जमातींच्या संदर्भात गॅझेटियर्स मध्ये दिलेले आहे.

रॉय दिबेश यांनी नासिक जिल्ह्यातील खेड्यांच्या अभ्यासात कोकणी समुदायातील

विवाहाच्या बदलत्या स्वरूपाबद्दल विशेषत: त्यातील विवाहविधी, विवाहाचे प्रकार, घटस्फोट, पुनर्विवाह आणि हुंडापद्धती याबद्दल मांडणी केलेली आहे.

अलिकडच्या काळात एका अभ्यासात श्रीमती गायकवाड एस.एस. यांनी 'आदिवासी स्त्रियांचे राजकीय विश्व-धुळे जिल्हा एक अभ्यास' यामध्ये धुळे जिल्ह्याविषयी सर्वसाधारण माहिती, आदिवासी विकास प्रयत्न, आर्थिक जीवनाच्या समस्या, आदिवासी विकासाची कार्ये, आदिवासींमध्ये झालेले बदल, प्रगतीची वाटचाल, राजकारणामुळे विकास, राजकीय पक्षाबाबतची जाणीव इत्यादीविषयी माहिती दिलेली आहे.

वेगवेगळ्या अनुसूचित जमातींचा मोठ्या प्रमाणावर अभ्यास झाला असला तरी महाराष्ट्रातील कोकणी या जमातीचा फार कमी अभ्यास झालेला आहे किंवा या जमातीचा वेगवेगळ्या अंगाचा (घटकांचा) कमी अभ्यास झालेला आहे. तसेच केंद्रीय अभ्यास व विवक्षित माहिती देणारे अभ्यास अगदी अपुरे आहेत.

राजकीय क्षेत्रात तसेच इतर क्षेत्रात त्यांच्यासाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत. तसेच शासनाच्या इतर कल्याणकारी योजनांद्वारे विकास होण्याच्या दृष्टीने त्यांच्यात झालेले परिवर्तन समजून घेणे आवश्यक आहे. याच दृष्टीने संशोधन होणे महत्त्वाचे आहे.

महाराष्ट्रात अनुसूचित जमातीच्या यादीत एकूण ४७ आदिवासी जमातींचा समावेश आहे. शोध-निबंधासाठी निवडलेल्या जमातींचा समावेश हा कोकणी, कोकणा, कुकणा या नावाने वरील यादीत २५ व्या अनुक्रमांकावर आहे. महाराष्ट्र राज्याचे एकूण लोकसंख्येशी अनुसूचित जमातीचे प्रमाण ९.२७ टक्के आहे. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी ४०.९ टक्के अनुसूचित जमातीची लोकसंख्या असलेला धुळे अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येबाबत राज्यात प्रथम क्रमांकावर होता. विकासाच्या प्रक्रियेत वेग यावा, आदिवासींच्या विकासात गती यावी म्हणून जनतेची नंदूरबार जिल्ह्याची मागणी होती. ही मागणी लक्षात घेता स्वतंत्र नंदुरबार जिल्हा मागणी १ जुलै १९९८ पासून धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदुरबार जिल्हा अस्तित्वात आला. धुळे जिल्ह्यात साक्री, शिरपूर, शिंदखेडा हे तालुके आहेत. तर नंदुरबार जिल्ह्यात नवापूर, शहादा, तळोदा, अक्कलकुवा, धडगाव हे तालुके आहेत.

महाराष्ट्रात धुळे व नंदुरबार जिल्ह्यात कोकणी ही जमात साक्री व नवापूर तालुक्यात आढळून येत असली तरी धुळे जिल्ह्यात भिल्ल, कोकणी या आदिवासींचे प्रमाण जास्त आहे. कोकणी जमात साक्री तालुक्यात दिसून येते, तर भिल्ल आदिवासी संपूर्ण जिल्ह्यात सर्व तालुक्यात आढळतात. नंदुरबार जिल्ह्यात कोकणी समुदाय नवापूर तालुक्यात व नंदूरबारच्या काही भागात दिसून येतो. तसेच या जिल्ह्यात भिल्ल, मावची, पावरा, गावित इत्यादी आदिवासी इतर तालुक्यांत आढळून येतात. पावरा या आदिवासींचे बहुतांशी प्रमाण धडगाव (अक्राणी) तालुक्यात आहे. कुपोषणाच्या बाबतीत हा तालुका महाराष्ट्रात सर्वांना परिचीत आहे.

सदरहू शोधनिबंध विषय कोकणी समुदायाचे राजकारणातील सहभागाविषयी समाजशास्त्रीय अध्ययन या विषयावर आधारित असल्याकारणाने साक्री व नवापूर तालुक्यातील कोकणी आदिवासींची पार्श्वभूमी लक्षात घेणे आवश्यक ठरले.

### साक्री तालुक्यातील कोकणी आदिवासी

या तालुक्यात भिल्ल व कोकणी आदिवासी बहुतांशी प्रमाणात दिसून येतात. भिल्ल आदिवासी संपूर्ण तालुक्यात विखुरलेले आहेत. त्यांची बिगर आदिवासी

असलेल्या गावातूनही लोकसंख्या आढळून येते. भिल्ल समुदाय गरीब असल्याकारणाने उदरनिर्वाहासाठी फार मोठ्या प्रमाणात बिगर आदिवासींवर अवलंबून असतात. परंतु कोकणी समुदायाचे तसे नाही. साक्री तालुक्यात अशी फार कमी गावे आहेत की जेथे कोकणी हे बिगर आदिवासींयासोबत राहतात. कोकणी समुदायाची स्वतंत्र गावे किंवा भिल्ल व कोकणी आदिवासी एकत्रित राहताना दिसून येतात.

कोकणी समुदायाकडे आपली स्वत:ची शेती असून प्रगतीकडे वाटचाल करतांना दिसून येतात. भिल्ल समुदायाच्या तुलनेने कोकणी समुदायाचा जास्त विकास झालेला आहे, असे आढळून येते.

## नवापूर तालुक्यातील कोकणी आदिवासी

या तालुक्यात प्रामुख्याने कोकणी, मावची, भिल्ल व गावित हे आदिवासी आढळून येतात. तसेच या तालुक्यात मावची आदिवासी बहुसंख्याने दिसून येतात. गावित या समुदायाचे प्रमाण मावची समुदायाच्या तुलनेने कमी आहे. साक्री तालुक्यात कोकणी आदिवासींचा प्रभाव आहे, तर नवापूर तालुक्यात मावची समुदायाचा प्रभाव आहे. या दोन्ही जमाती, दोन्ही तालुक्यात सर्वांगाने प्रबळ जमाती आहेत.

## अभ्यासाचे विश्व

प्रस्तुत शोधनिबंधासाठी धुळे जिल्ह्यातील साक्री तालुका व नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर तालुक्यातील कोकणी जमात हे अभ्यासाचे विश्व आहे. शोध-निबंधासाठी दोन्ही तालुक्यातील प्रत्येकी दहा गावांची निवड केली. एकूण वीस गावातील सरपंचाच्या मुलाखती घेतल्या व त्यांची राजकारणाबद्दलची मते जाणून घेतली. उत्तरदात्यांची ज्या गावातून निवड केलेली आहे किंवा जी गावे या नमुन्यात आलेली आहेत. त्यात कोणत्या जनजातीचे लोक संख्येने जास्त आहेत हे पाहिले असता असे आढळून आले की, कोकणी जनजातीचे ९० टक्के लोक असलेली १८ गावे आहेत. कारण शोध-निबंधासाठी अशाच गावांची निवड केली होती की, त्या गावांमध्ये कोकणी समुदायाची लोकसंख्या पाचशेपेक्षा जास्त आहे. याच कारणामुळे इतर जाती-जमातीपेक्षा कोकणी समुदायाचे लोक प्रत्येक गावात जास्त दिसून आले.

साक्री व नवापूर तालुक्यातील शोध-निबंधासाठी निवड केलेली गावे व त्या गावातील एकूण लोकसंख्या (अंदाजे)

साक्री तालुका

| अ.क्र. | गावाचे नाव | लोकसंख्या (अंदाजे) |
|---|---|---|
| १. | शेवडींपाडा | ९७८ |
| २. | पारगाव | १५०० |
| ३. | धो. दिगर | ५४४ |
| ४. | दरीपाडा | १३२० |
| ५. | कोकणगाव | ६७० |
| ६. | मंडाणे | ८२६ |
| ७. | होळ्याचा पाडा | ७४९ |
| ८. | हारपाडा | ९५७ |
| ९. | नवापाडा | १२०० |
| १०. | गव्हाणीपाडा | ९६४ |

नवापूर तालुका

| अ.क्र. | गावाचे नाव | लोकसंख्या (अंदाजे) |
|---|---|---|
| १. | मोगराणे | ३१३४ |
| २. | पांघरण | १५०० |
| ३. | ढोंग | १३७० |
| ४. | निंबोणी | ९३५ |
| ५. | पळसून | १३५० |
| ६. | शेई | १६०० |
| ७. | खडकी | १५०० |
| ८. | सागाळी | ८७५ |
| ९. | नावली | १५७५ |
| १०. | श्रावणी | ३५०० |

निवड केलेल्या ज्या गावांमध्ये कोकणी समुदायाच्या लोकांचे प्रमाण इतरांपेक्षा जास्त आहे, अशाच गावांची निवड शोध-निबंधासाठी केलेली आहे. इतर जाती-जमातीचे लोकही काही प्रमाणात कोकणी समुदायाबरोबर बऱ्याच गावांमध्ये राहताना आढळून आले.

## शोध-निबंधाची उद्दिष्टे

थोडक्यात राजकीय सहभागामुळे कोकणी समुदायात होत चाललेले बदल वा प्रगती याचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत शोध-निबंधात आहे.

१. कोकणी समुदायातील कुटुंबाचा राजकारणातील सहभाग, त्याचे स्वरुप, त्यांची राजकीय पक्षाशी असलेली बांधिलकी इत्यादी तपासून पाहणे.

२. कोकणी आदिवासींच्या विकासातील राजकीय पुढाऱ्यांचे योगदान याबद्दलची त्यांची मते तपासून पाहणे.

३. कोकणी समुदायाचा राजकीय सहभागामुळे सामाजिक, सांस्कृतिक विकास झाला का याबद्दलची मते जाणून घेणे.

## संशोधन पद्धती (नमुना निवड)

प्रस्तुत शोध-निबंधासाठी दोन्ही (साक्री व नवापूर) तालुक्यातील प्रत्येकी दहा-दहा (एकूण २० गावे) गावांची निवड केली. या गावांमध्ये कोकणी समाजाव्यतिरिक्त इतर आदिवासी व बिगर आदिवासी समाजही आढळून आला. ज्या गावांमध्ये कोकणी समुदायाची लोकसंख्या पाचशेपेक्षा जास्त असेल अशाच गावांची निवड शोध-निबंधासाठी केली. प्रत्येक गावातील सरपंचाची परिस्थिती वेगवेगळी आहे. कोकणी समुदायातील हे उत्तरदाते शेती व शेतमजुरी करणारे आहेत. म्हणून त्यांच्या मुलाखती घेतल्या. त्यांना राजकारणाबद्दल बरीचशी जाणीव असल्याकारणाने त्याबद्दल त्यांना चांगल्या पद्धतीने माहिती दिली. ज्या सरपंचाच्या मुलाखती घेतल्या त्यांची गावनिहाय यादी खालील तक्त्यात दिलेली आहे.

## साक्री व नवापूर तालुक्यातील शोधनिबंधासाठी निवड केलेल्या सरपंचाची गावनिहाय यादी

### साक्री तालुका

| अ.क्र. | गावाचे नाव | सरपंचाचे नाव |
|---|---|---|
| १. | शेवडींपाडा | बहीराम कमल सिताराम |
| २. | पारगाव | गांगुर्डे निर्मला नारायण |
| ३. | धो. दिगर | भोये मंडीराम चिंतामण |
| ४. | दरीपाडा | चौरे बकाराम विश्राम |
| ५. | कोकणगाव | साबळे चंद्रकांत पांडू |
| ६. | मंडाणे | पवार काळू शंकर |
| ७. | होळ्याचा पाडा | साबळे राजेंद्र भटू |
| ८. | हारपाडा | आहिरे बळीराम गजमल |
| ९. | नवापाडा | चौधरी जेजीराम मोतीराम |
| १०. | गव्हाणीपाडा | बागुल उरवा शिवाजी |

### नवापूर तालुका

| अ.क्र. | गावाचे नाव | सरपंचाचे नाव |
|---|---|---|
| १. | मोगराणे | कोकणी सुधाकर मधुकर |
| २. | पांघरण | कोकणी सुनीता राजेंद्र |
| ३. | ढोंग | कोकणी जवाहरलाल सरद्या |
| ४. | निंबोणी | वळवी तानाजी भरत |
| ५. | पळसून | वळवी रमेश फुलजी |
| ६. | शेई | मावची सिंड्या रेवा |
| ७. | खडकी | आहीरे कमल नारायण |
| ८. | सागाळी | कोकणी सुधाकर उमाकांत |
| ९. | नावली | कोकणी सोमनाथ पिथ्या |
| १०. | श्रावणी | मावची दिलीप जालमसिंग |

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी सन २००४-०५ मध्ये स्वतंत्ररित्या मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये सरपंचाचा पदभार सांभाळलेल्या व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात आल्या. याव्यतिरिक्त स्थानिक वृत्तपत्रे दैनिक लोकमत, सकाळ, गावकरी, देशदूत इत्यादी वृत्तपत्रांची (कोकणी समुदायाच्या राजकारणाबद्दलची) कात्रणे मिळविण्यात आली. या वृत्तपत्रांच्या बातम्यांच्या आधारे राजकारणाबद्दलची सविस्तर महत्त्वाची माहिती मिळविण्यासाठी मदत झाली.

## आशय विश्लेषण

शोधनिबंधासाठी निवड केलेल्या गावांमध्ये एकंदरीत राजकारणात वा स्थानिक गावांच्या प्रशासनात त्यांचा प्रभाव कसा आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. यादृष्टीने येथे असलेले महत्त्वाचे पद कोणा जमातीकडे आहे हे पाहिले असता असे दिसून आले की, या गावांमध्ये १३ गावातील सरपंच कोकणी समुदायाचे आढळून आले. भिल्ल समुदायाचे तीन सरपंच दिसून आले. तर मावची समुदायाचे चार सरपंच आढळून आले.

तसेच साक्री तालुक्यातील शेवडींपाडा व पारगाव या दोन गावात स्त्रिया सरपंच आहेत तर नवापूर तालुक्यात पांघरण व खडकी या दोन गावातही स्त्रिया सरपंच आढळून आल्या.

यावरून असे दिसून येते की कोकणी आदिवासी स्त्रियांचे राजकारणात सहभागांविषयीचे प्रमाण थोड्याफार प्रमाणात वाढत असून बहुतांशी सामाजिक, सांस्कृतिक विकासाला चालना मिळत आहे. बहुसंख्य (निवडलेल्या) कोकणी समुदायाच्या गावांची शोध-निबंधासाठी निवड केलेली असल्यामुळे कोकणी समुदायातील सरपंच या गावांमध्ये अधिक आढळून आले. तसेच ज्या गावांमध्ये कोकणी समुदाय इतर आदिवासींच्या तुलनेने कमी आहे अशा गावात भिल्ल व मावची समुदायाचे सरपंच दिसून आले.

यावरून असे आढळून आले की ज्या गावात जी प्रभावी जमात आहे त्या गावात त्याच जमातीचा सरपंच असतो. श्री. एम.एन. श्रीनिवास यांनी सांगितलेली प्रभावी जातीची संकल्पना याठिकाणी लागू पडते.

कोकणी समुदायाच्या बाबतीत ज्या सरपंचाकडे शेती जास्त आहे, अशा सरपंचाचे राजकारणात भाग घेण्याचे प्रमाण जास्त आहे. याचा अर्थच असा की, आर्थिक परिस्थिती बरी असल्याकारणाने समाजात थोडी प्रतिष्ठा असते. त्याचाच फायदा म्हणून इतर पुढाऱ्यांशी संबंध येतो. म्हणूनच राजकारणात भाग घेणाऱ्यांचे प्रमाण शेती असणाऱ्या सरपंचाचे जास्त दिसून येते. ज्यांचा व्यवसाय शेतमजुरी आहे, त्यांचे राजकारणात भाग घेण्याचे प्रमाण अतिशय नगण्य अशा स्वरूपाचे आहे. कारण त्यांना आपल्या कुटुंबाची उदरनिर्वाहाची काळजी असते. मजुरी करुन उदरनिर्वाह करणे यामध्येच त्यांचा सर्व काही वेळ जातो. राजकारणात भाग घ्यायला त्यांच्याकडे वेळ व पैसा नसतो. थोडाफार पैसा व अर्थार्जनाची निश्चित साधने असली की लोकांचा कल सक्रीय राजकारणाकडे जात असतो, याची प्रचीती या सरपंचाच्या बाबतीतही आढळून येते.

ग्रामपंचायतीच्या निवडणुका (स्थानिक पातळीवर) सरपंच पदासाठी असतात. सर्वच गावातील लोकांना याबद्दल उत्सुकता वाटत असते किंवा त्यात त्यांना रस असतो. बाकीच्या निवडणुका वरच्या पातळीवरच्या असल्याकारणाने त्यामध्ये कोकणी लोक मोठ्या प्रमाणात रस घेत नाहीत. लोकसभा,

विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये मतांसाठी (स्थानिक लोकांकडे) आग्रह करतात, तितका मतांसाठी आग्रह सरपंचाच्या निवडणुकांसाठी केला जात नाही.

कोकणी समुदायाच्या या गावांमध्ये कॉंग्रेस पक्ष व भाजप पक्ष या दोन गटाला मानणारे लोक जास्त आढळतात. त्यांची कॉंग्रेस पक्षावर जास्त श्रद्धा आहे. हाच पक्ष आदिवासीचा विकास करु शकतो. याच पक्षाने आदिवासींना सवलती दिलेल्या आहेत. अशी या पक्षाबद्दलची कोकणी लोकांची समजूत दिसून आली. म्हणूनच बहुतेक सरपंच कॉंग्रेस पक्षाला बहुसंख्याकाने अनुकूल असल्याचे जाणवले. भाजप पक्षाबद्दल फक्त चार सरपंच अनुकूल असल्याचे सांगताना आढळून आले. भाजप पक्षाबद्दल, कॉंग्रेस पक्षाला अनुकूल असलेल्या सरपंचांनी नाराजी व्यक्त केली.

एखाद्या समुदायाला विकासाबाबत त्यातील नेत्यांचे योगदान निश्चित असते. याबाबतीत कोकणी समुदायातील पुढाऱ्यांनी कोकणी समुदायाच्या विकासात हातभार लावला या मताशी उत्तरदाते (सरपंच) सहमत आहेत. कारण स्थानिक पातळीवर (गाव) ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली असते, त्यांचा कोकणी समुदायातील पुढाऱ्यांशी आमदार, खासदार, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य यांच्याशी संबंध असतो त्यामुळे सरपंच पदासाठी स्थानिक पातळीवर कोणाला सरपंच बनवायचे , कोणाला मते द्यायची हे पुढारीमंडळी ठरवित असतात. त्यानुसार सरपंचाची निवड होत असते.

कोकणी समुदायात साक्री तालुक्यात खासदार मा. बापू चौरे (कॉंग्रेस) मा. डी.एम.आहिरे (भाजप) मा. रामदास रुपला गावीत (भाजप) कै. मा. रेश्मा भोये इत्यादी होऊन गेले, त्यापैकी आज कॉंग्रेस प्रणित मा. बापू चौरे खासदार आहेत. केंद्रात मा. सोनिया गांधी यांच्या प्रेरणेने कॉंग्रेसचे सरकार (पंतप्रधान - मा. मनमोहनसिंग) आहे.

आमदारात माजी आदिवासी विकासमंत्री मा. गो.शी. चौधरी, मा. साहेबराव बागुल व आज मा. वसंत दोधा सूर्यवंशी आमदार आहेत. खासदार व आमदार सतत या समुदायातून येऊ शकतील, कारण अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा आहेत. या आमदार व खासदारांमुळे कोकणी समुदायाचा राजकीय सहभाग वाढलेला आढळून येतो. तसेच जिल्हा परिषद, पंचायत समिती, गावपातळीवर सरपंच इत्यादी निवडणुका काही आमदार, खासदारांच्या मार्गदर्शनाखाली होताना दिसून येतात.

सरपंचपदांच्या निवडणुकांसाठी या समुदायात भांडणे होताना कधी दिसून येत नाहीत. जो व्यक्ती पदासाठी लायक असेल व आमदार, खासदारांच्या मर्जीतला असेल तर त्यालाच निवडून येण्यासाठी तिकीट दिले जाते. निवडून आल्यानंतर जनतेची (गावातील) कामे करावी लागतात. जनतेची कामे केली नाही तर हा सरपंच नको अशी तक्रार वरिष्ठांकडे (आमदार व खासदार) केली जाते. त्यामुळे सर्वांचा विश्वास संपादन करुन कामे करावी लागतात, असे शेवडींपाडा व पारवागच्या सरपंचानी सांगितले. गावातील विकासाची कामे सरपंच व ग्रामसेवक एकमेकांच्या आचार-विचाराने करतात. गावातील पाण्याची सोय, गटारे, सांडपाणी, जनावरांना पाण्याची सोय, घरकुल योजना इत्यादी कामे पंचायत समितीकडून मंजूर झाल्यानंतर ग्रामसेवक सरपंचांना माहिती देतात. ग्रामसेवक शासकीय पातळीवरचे अनुदान गावाच्या विकासासाठी खर्च करताना सरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांच्याशी विचार विनिमय करुन नियोजन करीत असतात.

थोडक्यात जनतेचे प्रतिनिधी (सरपंच) व शासनाचे प्रतिनिधी (ग्रामसेवक) एकमेकांच्या सहकार्याने गावपातळीवरचा विकास करीत असतात. शासनाने ठरवून दिलेली पंचायतराजची संकल्पना गावपातळीवर अशा पद्धतीने राबविली जाते.

गावातील इतर जाती-जमातींना ग्रामपंचायतीची कामे करताना विश्वासात घेतले जाते का ? असा प्रश्न सरपंचांना विचारण्यात आला तेव्हा सर्व गावातील सरपंचांनी 'होय' सांगितले. आमच्या गावात भिल्ल समुदाय जास्त आहे. त्यांना विश्वासात घेऊनच कामे करावी लागतात. आमचे संबंध कायमस्वरूपी चांगल्या स्वरुपाचे आहेत, असे १५ गावातील सरपंचांनी सांगितले. ज्यांची आर्थिक परिस्थिती हलाखीची असते ते राजकारणात सक्रीय सहभाग घेत नाहीत, असे खडकी येथील सरपंच सौ. कमल नारायण आहिरे यांनी सांगितले. तसेच राजकीय क्षेत्राबद्दल श्री. सुभाष गावीत रा. खडकी (नवापूर पंचायत समिती सदस्य) यांनीही योग्य ती माहिती सांगितली. आमच्या समुदायात जे लोक शेतमजुरी करतात. त्यांचे राजकारणात भाग घेण्याचे प्रमाण अतिशय नगण्य अशा स्वरूपाचे असते. थोडाफार पैसा व अर्थार्जनाची निश्चित साधने असले की लोकांचा कल सक्रीय राजकारणाकडे जात असतो. असे या लोकप्रतिनिधीनी बोलून दाखविले.

कोकणी समुदायाच्या या (वीस) गावांचा अभ्यास करतांना असे आढळून आले की, एखादे पद भूषविण्यासाठी (मिळविण्यासाठी) बिगर आदिवासींच्या तुलनेत या समुदायाला बरीच स्पर्धा करावी लागते, असे आढळून येत नाही.

## निष्कर्ष

१. ज्या गावातील सरपंचाकडे शेती हा व्यवसाय आहे, त्यांचे राजकारणात भाग घेण्याचे प्रमाण जास्त आहे. तसेच राजकीय क्षेत्रामुळे आमचा विकास झाला असे मत काही उत्तरदात्यांचे असल्याचे आढळून आले.

२. ज्या गावांमध्ये कोकणी समुदायाचे प्रमाण जास्त त्या गावात त्याच समुदायाचे सरपंच, उपसरपंच आढळून आले. थोडक्यात गावातील राजकीय क्षेत्रावर प्रभावी जाती/जमातीचे वर्चस्व असते.

३. कोकणी समुदायातील स्त्रियांचा राजकारणातील सहभाग अल्प प्रमाणात आहे.

४. कोकणी समुदायाचा राजकीय सहभागामुळे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास झालेला आढळून आला.

५. कोकणी समुदायातील राजकीय पुढाऱ्यांचे त्यांच्या समुदायातील सर्वांगाने विकासाबद्दल तसेच अडीअडचणींबद्दल बरेच योगदान आहे.

■■

प्रा. डॉ. कल्याण मोरे
समाजशास्त्र विभाग,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
दिंडोरी, जि. नासिक

# नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजातील व्यसनाधीनता: स्वरुप व उपाययोजना

प्रा. फारुक के. शेख

प्रस्तावना - एकविसाव्या शतकात आदिवासी समुदायात लोकसंख्या, आर्थिक विषमता, संस्कृतीचा ऱ्हास, पर्यावरण असंतुलन, बेरोजगारी आणि व्यसनाधीनता यांसारख्या कितीतरी समस्या वाढत आहेत. त्यातील व्यसनाधिनता ही समस्या जास्त भीषण व उग्र होत आहे. त्यामुळे आदिवासी समुदायाच्या जीवनावर विपरित परिणाम होत आहेत. नाशिक जिल्ह्यातील सामाजिक संस्था व सामाजिक कार्यकर्ते यांच्या मतानुसार आदिवासी समुदायातील व्यसनाधीनतेकडे प्रकाश टाकल्यानंतर असे लक्षात येते की, प्रौढ मंडळी, युवक, लहानमुले, स्त्रिया देखील व्यसनाच्या आहारी गेलेल्या आहेत. कारण, आदिवासी समाजव्यवस्थेत मद्यपान करण्याची मुभा दिलेली असते. म्हणून शास्त्रीय संशोधनातून करुन व्यसनाधीनता या समस्येचा उलगडा करुन आदिवासी समुदायाची ही समस्या सोडवणे शक्य होईल आणि त्यांना मुख्य प्रवाहात सामील करुन घेता येईल. ही समस्या अभ्यासण्यासाठी आदिवासी समुदायातील व्यसनाधीनतेचे स्वरुप, त्याची तीव्रता व गंभीर परिणाम जाणून घेणे आवश्यक ठरते, त्याचसाठी या विषयावर संशोधन केले आहे. सन २००१ च्या जनगणनेनुसार नाशिक जिल्ह्यातील लोकसंख्या एकूण ४९,८७,९२३ असून त्यात आदिवासी लोकसंख्या ११,९४,२७१ इतकी आहे. अर्थातच एकूण जिल्ह्याच्या लोकसंख्येपैकी २४ टक्के लोकसंख्या आदिवासी समुदायाची आहे.

महाराष्ट्रात एकूण ४७ आदिवासी जमाती आहेत. त्यातील काही जमाती सह्याद्री पर्वताच्या विभागात आढळतात. त्यात महादेवकोळी, वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, मल्हारकोळी इत्यादी जमातींच्या वस्त्या आढळतात. त्या जमातीपैकी नाशिक जिल्ह्यात महादेवकोळी, कोकणा, ठकार, भिल्ल व काही प्रमाणात वारली या जमाती आढळतात. भारतीय राज्य घटनेच्या ३४१ व ३४२ कलमांतर्गत आदिवासी समुदायाला विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत. यामध्ये प्रामुख्याने आदिवासी समुदायाची सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक उद्दीष्टे जोपासणे असा प्रमुख उद्देश मांडलेला आहे. अस असताना आपण आदिवासी समुदायाला समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील करु शकलो का? याची कारणमीमांसा केल्यानंतर त्यास अनेक घटक जबाबदार ठरतात. त्यात व्यसनाधीनता हा सुद्धा घटक या परिस्थितीला कारणीभूत आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. यासाठीच आदिवासी भाषेच्या माध्यमातून लोकशिक्षण देणे नितांत गरजेचे आहे. कारण आदिवासी समुदायातील व्यक्ती हा त्याच्या सांस्कृतिक व सामाजिक वातावरणात जगतो व त्यामुळे त्यांच्या चालीरीतींवर तो जास्त प्रमाणात विश्वास ठेवतो. यासाठी नाशिक जिल्ह्यातील कोकणा, महादेवकोळी व वारली या जमातींवर संशोधनात्मक अभ्यास केला आहे. त्यातूनच या जमातीतील व्यसनाधीनतेच्या कारणांचा उलगडा झालेला आहे. त्याचा आपणास पुढीलप्रमाणे सविस्तर विचार करता येईल.

आदिवासी समुदायातील व्यसनाधीनतेचे कारण व स्वरुप

धार्मिक विधी व संस्कृती - आदिवासींची संस्कृती ही निसर्गावर अवलंबून आहे, त्यामुळे निसर्ग हे दैवत आहे असे ते समजतात. त्यामुळे निसर्गात उत्पादित सर्व वस्तूंचा विनियोग करण्यापूर्वी ते निसर्गाला नैवेद्य किंवा प्रसाद चढवितात. त्यानंतर ते स्वत:साठी ह्या उत्पादित वस्तू वापरत असतात. आदिवासी समाजात धार्मिक विधी करताना भगताची मदत घेण्यात येते. धार्मिक विधीच्या प्रसंगी बकऱ्याचा बळी करतांना त्यासोबत मद्याचा वापर करतात. या धार्मीक विधीच्या वेळी उपस्थित असणाऱ्या नातेवाईक किंवा ग्रामस्थांना प्रसाद म्हणून मद्य व मांसाहार सेवनासाठी दिले जाते. त्यातूनच आदिवासी व्यक्ती हा व्यसनाधीनतेकडे वाटचाल करतो.

आदिवासी सण - आदिवासी जमातीत होळीचा सण, डोंगरदेव, माऊलीदेवी, हिरवागाव देव भैरव, चंद्र, सूर्य, बहिरम, खंडेगार, सहादेव, वाघदेव इत्यादी देवतांची यात्रा किंवा सण साजरे केले जातात. या सणाच्या प्रसंगी मद्यपानाचा वापर करण्यात येत असतो. त्यातून देखील आदिवासी समाजात व्यसनाधीनतेची सवय निर्माण होते.

सामाजिक व्यवहार - आदिवासी समाजात सामाजिक कार्यक्रमात देखील व्यसन करण्याची प्रथा आहे. उदा. मूल जन्माला आल्यानंतर गावातील लोकांना पाचवीच्या दिवशी मद्यसेवन करण्यासाठी मुभा देण्यात येते. तसेच गावात कोणत्याही व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा दुखवटा म्हणून मद्यसेवन करण्यात येत असते. त्यातून आदिवासी समाज हा अप्रत्यक्षपणे व्यसनाकडे वळतो. तसेच विवाहाप्रसंगी किंवा विवाह समारंभात नवऱ्या मुलाकडील पाहुण्यांचा पाहुणचार करण्यासाठी जास्त प्रमाणात मद्यपान उपलब्ध करुन देण्यात येते. या प्रक्रियेतून आदिवासी समाज हा व्यसनाधीनतेकडे वळतो.

मोहडा - आदिवासी समाजात मोहडा म्हणजे सुट्टीचा दिवस. पेठ, सुरगाणा व त्र्यंबकेश्वर या परिसरातील आदिवासी व्यक्ती आठवडाभर शारीरिक श्रमाची कामे करीत असतात. व मोहडाच्या दिवशी गावातील पुरुषमंडळी जंगलात गटागटाने शिकार करायला जातात व शिकार केल्यानंतर गावात येऊन गावातील सर्व मंडळींना त्याचा उपभोग घ्यावयाचा असतो व त्याचबरोबर मद्याचे सेवन देखील ते करीत असतात. परंतु वनविभागाच्या जाचक कायद्यांमुळे जंगलात मुक्तपणे फिरणे व शिकार करणे बंद झाल्यामुळे आदिवासी व्यक्ती हा मोहडाच्या दिवशी फक्त मद्याचे सेवन करीत असतो. त्यातून आदिवासी समाजात व्यसनाधीनता वाढतच चाललेली आहे.

आर्थिक कारणांमुळे व्यसन - महाराष्ट्रातील सह्याद्री पर्वतरांगांत राहणाऱ्या कोकणा. वारली, महादेवकोळी या जमातींना वर्षातून फक्त चार महिने मजुरी मिळते, तसेच उरलेल्या बाकी दिवसांत त्यांना मजुरीसाठी बाहेरगावी स्थलांतर करावे लागते. अशा रोजगाराच्या ठिकाणी गेल्यानंतर रोख स्वरूपात मजुरी मिळत असल्यामुळे त्यांना वेगवेगळ्या प्रकारची व्यसने जडतात. तसेच आदिवासी भागात पावसाळ्यात चिखलात भाताची लागवड करावी लागते. तसेच वीटभट्टीवर कामे, रस्त्याची कामे, द्राक्षेबागेतील कामे इत्यादी कामे करावी लागतात. त्यामुळे त्यांना कामाचा शीण जाणवतो व शारीरिक त्रास होत असतो. कामाचा शीण व शारीरिक त्रास कमी करण्यासाठी मद्यपान व धूम्रपानाचा वापर ते करीत असतात. त्यातूनच आदिवासी समुदायांमधील व्यसनाधीनता वाढत चाललेली दिसते.

इतर समाजांशी संपर्क - शासनकर्ते व बिगर आदिवासी लोकांशी संपर्क आल्याकारणास्तव आदिवासी समुदायामध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. ती भावना लपविण्यासाठी मद्यपानाचा वापर ते करीत असतात. तसेच तत्कालीन शासनाने मंडल विषयक अनेक कायदे पास केल्यामुळे वनसंपत्तीवर आदिवासी समुदायापेक्षा शासनाचा अधिकार महत्त्वाचा मानण्यात आला व शासकीय धोरणामुळे ठेकेदारी पद्धत अस्तित्त्वात आली त्याचा परिणाम म्हणजे आदिवासी हा दारिद्र्याकडे ओढला जावू लागला. त्यातून बेरोजगारीची समस्या निर्माण झाली. त्याचा एक परिणाम असा झाला की, त्यांच्या जीवनात व्यसनाधीनतेने प्रवेश केला आहे.

आदिवासी भागातील व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम - आदिवासी समाजात मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनता असल्यामुळे या समुदायाला अनेक व्याधींना सामोरे जावे लागते, असे संशोधन अभ्यासात आढळलेले आहे. मद्यपान, तंबाखू सेवन, विडी पिणे इत्यादी व्यसनांनी आदिवासींचे आयुर्मान कमी कमी होत चालल्याचे चित्र आपणांस बघायला मिळते.

सामाजिक संस्था व सेवाभावी कार्यकर्ते यांच्या मतानुसार मद्यपानामुळे आदिवासी समाजातील व्यक्तींना यकृत सुजणे, विस्मरण, गर्भधारणेवर परिणाम, लैंगिक क्षमता कमी होणे, पोटाचे विकार असे अनेक आजार जडतात. ह्या आजारांवर तातडीने उपचार घेण्याचीही सोय आदिवासी भागात उपलब्ध नसल्याने, किंबहुना सोय उपलब्ध असली तरी तिचा उपयोग करुन न घेतल्यामुळे आदिवासींना हळूहळू मृत्यूला सामोरे जावे लागते व शारीरिक क्षमता कमी होत असल्यामुळे श्रमाची कामे करण्याची ताकद कमी होत जाते.

तसेच आदिवासी भागात तंबाखूचे सेवन जास्त प्रमाणात केले जाते. त्यामुळे आदिवासी समुदायात कर्करोग व श्वसन मार्गाच्या जंतु संसर्गामुळे , दमा, क्षयरोग इत्यादी सारखे आजार निर्माण झालेले आहेत. तसेच आदिवासी भागातील लहान मुले, तरुण, महिला व पुरुष यांच्यात तंबाखुचे सेवन करण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे तंबाखूत आढळणारी बेंझोयरिन, फेनाल्स व इतर कार्सिनोजनिक (कर्करोग निर्माण करणारी) पदार्थांमुळे अनेक अवयवांचे कर्करोग होतात. तेवढेच नव्हे तर तोंड, जीभ, हिरड्या, गाव, घसा, स्वरयंत्रणा, श्वसननलिका, मूत्राशय यांच्यावर देखील विपरीत परिणाम झालेला आढळतो. तंबाखूचा वापर करणाऱ्यांना निकोटीन बराच काळ मिळाले नाही तर त्याअभावी तंबाखूची अतितीव्र इच्छा, अस्वस्थता, जळजळ, थोडीशी उदासीनता, नीट झोप न येणे, पोटाचे काही त्रास, डोकेदुखी, विसरभोळेपणा, चित्त एकाग्रतेचा अभाव व काही कामात विसंगती वगैरे लक्षणे आढळतात.

आदिवासी भागातील मद्यपान व धूम्रपान सवयींमुळे पुरुषांबरोबर स्त्रियांना देखील शारीरिक व्याधी जडलेल्या आहेत. व्यसनाच्या आहारी गेलेल्या व्यक्ती ह्या शासकीय योजनेचा लाभ घेत नाही. म्हणूनच ती व्यक्ती कल्याणकारी व विकासात्मक योजनेपासून वंचित राहते. यास्तव आदिवासी भागात विकासाचे कार्यक्रम यशस्वी होत नाहीत. आदिवासी भागात व्यसनमुक्ती प्रबोधनासाठी वापरलेल्या प्रसार माध्यमांविषयीची माहिती पुढीलप्रमाणे सांगता येईल.

प्रसार माध्यमे - आदिवासी भागात शासकीय यंत्रणा व सामाजिक कार्यकर्ते यांच्यामार्फत व्यसनमुक्ती प्रबोधनाचे कार्य करण्यासाठी पत्रक, व्हिडिओ शो व फिल्म शो या प्रसार माध्यमांचा वापर केला जातो. या प्रसार माध्यमातील आशयात बहुधा शहरी सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती रेखाटण्यात आलेली

आहे. यास्तव त्या यंत्रणेतील प्रसार माध्यमातील आशयामुळे प्रभावीपणे व्यसनमुक्ती प्रबोधनाचे कार्य होऊ शकत नाही, असे ह्या संशोधन अभ्यासात आढळलेले आहे. यासाठी संशोधन अभ्यासातून आदिवासी भागातील व्यसनाधीनता कमी करण्यासाठी व प्रतिबंध करण्यासाठी प्रसार माध्यमांसाठी नवीन आशय तयार केलेला आहे. तसेच आदिवासी भागातील व्यसनाधीनतेला प्रतिबंध घालण्यासाठी पोस्टर्स व स्लाईड शो या प्रसार माध्यमांतून आशयात आदिवासी भाषा, सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक परिस्थिती रेखाटण्यात आलेली आहे. पोस्टर्स व स्लाईडशोसाठी खालीलप्रमाणे आदिवासी भाषेतील आशय व संदेश वापरलेला आहे.

- '' तमख आणि चूना चोळून केली गोळी, करुन टाकली डवरने आयुष्याची होळी''.
- '' पोरघं जलमाल आलेवर मग
  तहा पाचवीचे ऐळस पोरघेल.
  आया दारु पाजते हे''.
- '' खंडोबाचे जतरात नवस पैंडतांना भगताकडून दारुची धार देते ऐळस''.
- '' हौस, मजेकड धाव घेस नको. तेनी तेहची जान ठेलायलं हवी.
  कामालं बाहेर गावालं गेलेवर मजरीतून पयसे आलेवर मग तहा मितरायचे जोडीलं दारु पेन मज्जा करत ऐळस.''
- '' काम करुन भंगल्यावर भंग जाएंल अन.
  विसावा मिळावा मघून ईडी ओढताना.
  एसन ही मरणाचे दारात लवकर जाएची वाट.''
- '' एक तरुण व्यक्ती म्हणतो (सोंगाड्या)
  काय रे तू काशाले दारु पेदली माझ्या डोक्याला जराकं तरास झाला
  आणि घेतली ना जराकं
  ह्या पासुन चांगल व्हतं काय
  याचा पासुन बेसं नाही वाटत अरे पण आता जराक पेदली तर पोपटासारखा अन कामच काय पेदली ना निव्वळ वाघासारखा अधिक जर पेदली तर निव्वळ गाढवाला जमा होतो''
- ''आयेनं कोणतीही, ईडीची सवय अनं एसन केलेवर जलमालं जो पोरं येत हें ते
  आगालां-लुलां-पांगला मुका अन ऐडा असतं हें''

वर ज्या प्रकारचा संदेश दिला आहे तशाच प्रकारच्या ३० स्लाईड व १० पोस्टर्स मधील आशयात आदिवासी भाषेचा व आदिवासी सहजीवनाला स्पर्श करणाऱ्या चित्रांचा संदेश वापरलेला आहे. तसेच या माध्यमातील आशयात आदिवासी जीवनमान व सामाजिक वातावरण टाकल्यामुळे आदिवासी समुदायाला त्यातील संदेश चटकन समजलेला आहे. त्यातून आदिवासी समुदायाने व्यसनमुक्ती करण्यास तयारी दर्शविलेली आहे, असे संशोधन अभ्यासांती आढळून आलेले आहे.

उपाययोजना

१) आदिवासी क्षेत्रातील धार्मिक सण, समारंभाच्या वेळी मद्याचा वापर होत असतो. या मद्यापासून होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती आदिवासी भाषेत सांगण्यात यावी किंवा ती माहिती आदिवासी भाषेतील पथनाट्याच्या माध्यमाने देण्यात यावी.

२) आदिवासी भागातील व्यसनाधीनतेसाठी प्रतिबंधात्मक व रचनात्मक उपाय योजण्यासाठी व्यसनांपासून होणाऱ्या शारीरिक व्यंगांची भित्तीपत्रक लावण्यात यावीत, तसेच त्या भित्तीपत्रकांतील संदेश आदिवासी भाषेत असावा.

३) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या व आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्पातंर्गत असणाऱ्या

सेवाभावी संस्थेच्या स्वयंसहाय्य गटाला पोस्टर्स व स्लाईडशो सादरीकरण करण्यासाठी सुव्यवस्थिपणे प्रशिक्षण देण्यात यावे तसेच त्यांच्यांमार्फत आदिवासी भागात प्रबोधनाचे कार्य करण्यास उत्तेजन द्यावे.

४) आदिवासी भागातील भगत व वैदू यांच्यासाठी व्यसनमुक्ती विषयांवर शास्त्रोक्त पद्धतीने प्रशिक्षण व कार्य आयोजन करण्यात यावे, तसेच आयोजनासाठी सेवाभावी संस्थेने पुढाकार घ्यावा. या प्रकारच्या प्रशिक्षण, मार्गदर्शन व कार्यशाळेच्या आयोजनासाठी आर्थिक मदत आदिवासी विभागाने उपलब्ध करुन द्यावी.

५) आदिवासी गावांतील वन व्यवस्थापन समिती व पाणलोट क्षेत्र विकास समिती या प्रकारच्या संघटनेत व्यसनाधीन व्यक्तीला समाविष्ट करुन घ्यावे, जेणेकरुन त्या व्यसनाधीन व्यक्तीला रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.

६) ग्रामपंचायतीतील सरपंच यांच्या अधिपत्याखाली व्यसनमुक्ती समितीने गठन करावे. या समितीत दोन ग्रामपंचायत सदस्य, दोन सामाजिक कार्यकर्ते, चार महिलामंडळाचे सदस्य, चार तरुण सदस्य व तीन गावांतील ज्येष्ठ व्यक्ती आदींचा समावेश करावा. या समितीच्या माध्यमाने गावांतील व्यसनमुक्ती करण्यासाठी योग्य त्या निर्णयांची अंमलबजावणी करावी. तसेच या समितीस कायदेशीर अधिकारांचा वापर करता यावा. त्यातूनच व्यसनधीनतेचा अटकाव घालणे शक्य होईल.

सारांश - नाशिक जिल्ह्यातील आदिवासी समाजातील व्यसनाधीनतेचा उलगडा केल्यानंतर असे लक्षात येते की, आदिवासी समाजातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक परिस्थितीमुळे व्यसनाधीनता वाढताना दिसून येते. या व्यसनाधीनतेमुळे आदिवासी समाजाच्या जीवनावर विपरीत परिणाम घडत आहे. तसेच आदिवासी भाषेतील आशय असलेल्या प्रसार माध्यमांद्वारे जन प्रबोधन व लोकशिक्षण दिल्यास आदिवासी समाजातील व्यसनाधीनतेला अटकाव घालता येऊ शकेल.

संदर्भ -


(१) नाशिक सांख्यिकी विभाग (२००१-२००२) ''नाशिक जिल्ह्याची माहिती'' प्रकाशक - सांख्यिकी विभाग, नाशिक

(२) डॉ. गोविंद गारे (२०००) ''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'' प्रकाशक - कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजय नगर कॉलनी, पुणे - ३०

(३) डॉ. गोविंद गारे (२०००) ''बदलाच्या उंबरठ्यातील कोकणा'' प्रकाशक - श्रीविद्याप्रकाशन. पुणे.

(४) अंधेरे महादेव (२००१) ''आम्ही आदिवासी वारली'' प्रकाशक - महाराष्ट्र विद्यामंदिर प्रकाशन सुत्रकार पो. कर्झका तलासरी जि. ठाणे

(५) डॉ. प्रमोद महाजन (१९९८) ''तंबाखू-गुटखा व धुम्रपानावर मात'' प्रकाशक - हरिश गांधी, अध्यक्ष रोटरी क्लब, चंद्रपुर

(६) नित्सुरे य. गो. (१९९६) ''युवक आणि मद्य'' दारुबंदी (शिक्षण) संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई

# आदिवासी संस्कृतीचे समकालीन संदर्भ

उषाकिरण आत्राम

या विषयावर विचार व्यक्त करताना आदिवासींची प्राचीन संस्कृती, पूर्व इतिहास, वर्तमान स्थिती, शासनाची भूमिका, समाजाचा दृष्टीकोन व स्व-अनुभव या बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

१) आदिवासींचा प्राचीन इतिहास व संस्कृती - आजच्या भारत हा आदिवासींचा प्राचीन शंबुद्वीप आहे. शंबुद्विपात हजारो वर्षांपासून वास्तव्य करणारे या भूमीचे मूळ वंशज, मूळ बारसदार, मूळचे मालक म्हणजेच मूळनिवासी होय. शंबुद्विपातील मूळच्या आदिवासींची अती प्रगत संस्कृती होती. त्यांची मूळची मातृभाषा होती. त्यांचा लौकीक असा इतिहास होता. त्यांचा धर्म व संस्कृती स्वयंपूर्ण व निसर्ग परिक्रमावर आधारीत, निसर्गवादी होती. संघटन, सामाजिक हित, समता, बंधुता, न्यायप्रियता, सत्यवादी, एकवचनी, इमानदारी, परोपकारी, समाज सुरक्षितता, वस्तुनिष्ठ, वास्तववादी विचार व आदर्श तत्त्वज्ञान तसेच मातृशक्ती पूजक समाज व्यवस्था होती. सुजल, सुफल, सुसंपन्न व स्वतंत्र जीवनशैली व शांतताप्रिय, न्यायप्रिय न्यायव्यवस्था होती. गणव्यवस्था आदर्श होती. समाज आदरबिंदू होता तर जीवन आभूषण होते. नैसर्गिक हक्क प्रत्येकालाच मिळावेत. जीवन जगण्याचे स्वातंत्र्य माणूस पशुपक्षी, किड्या-मुंग्यांना, वनस्पती जीवांना मिळावे हा समता न्यायाचा विचार आदरनीय व पूजनिय होता. सुसंपन्न सुशांत प्रगत जीवन जगणाऱ्या या शंबुद्विपावर आर्यांच्या आगमनाने एक जबरदस्त तडाखा बसला नि इथूनच शंबुद्विपातील मूळ निवासीयांच्या संस्कृतीला कायमचे ग्रहण लागले. टोळ्या टोळ्यांनी खुंखार घोड्यावर स्वार झालेले आर्यशत्रू अडीच हजार वर्षांपूर्वी मध्य आशिया मंगोल युरोपमधून आल. काबूल, कंदहार तक्षशिला गाठून प्रस्तान मांडले. आपला धर्म, रीतीनिती, भाषा, संस्कृती, जीवनपद्धतीचा प्रचार-प्रसार करु लागले. आक्रमण करुन मूळनिवासींचा प्रदेश काबीज करुन रक्तपात, नरसंहार, जाळपोळ करुन भूमीप्रदेश काबीज करु लागले. हडकंप मचना-हमलावार दैत्य होऊन टोळ्यांच्या नायकांना कापून काढू लागले. संपत्ती, जमिनी प्रदेशाची लूटमार होऊन-मूळ निवासींना हाकलून, पराभूत, परावृत्त करुन पाठलाग करुन पळवून लावू लागले. जिवाच्या रक्षणार्थ मूळ निवासी अरण्यात दरी-खोऱ्यात पहाड- कुंदरात जीव लपवू लागले. इथूनच मूळनिवासी बेदखल झाले. आपल्या मातृभूमीला, आपल्या संस्कृती-इतिहासाला, आपल्या स्वामीत्वाला ते मुकले आणि आर्यपुत्र दुष्यंत व शकुंतलेचा पुत्र भारत हा शंबुद्विपाचा राजा घोषीत करुन शंबुद्विपाचे नाव - भारत करण्यात आले. मूळनिवासींचे शंबुद्वीप नाव मागे पडले व नव्या भारताचा उदय झाला. आर्यांच्या शास्त्र पुराण ग्रंथातील श्लोकांमधूनच पूर्व इतिहास ज्ञात होतो. ''आर्यावृत्ते भरत खंडे । रेवाखंडे शंभुद्विपे'' यातून आर्यांचे आगमन शंबुद्विपात झाले, हा पुरावा मिळतो.

इ.स. पूर्व १५०० वर्षांपुर्वी भारतात हिंदूधर्म स्थापित केला. तर याच आर्यांचे वंशज युरोप अरब मध्ये पसरले. जेरुसेलमध्ये येशुने ख्रिश्चनधर्म स्थापित केला. आर्यांच्या काही वंशजांनी असंतोष प्रगट करुन बौद्धधर्म व जैनधर्म इ.स. पूर्व ५ व्या व ६ व्या शतकात

स्थापित केला. इ.स. ६२२ मध्ये युरोपमध्ये मो. पैगबरांनी इस्लाम धर्म स्थापन केला. शंभर दोनशे वर्षात आशिया युरोपमध्ये इस्लाम धर्म फोफावला. भारतात १० व्या शतकात आर्यपुत्र शंकराचार्यानी संपूर्ण भारत भ्रमण करुन हिंदूधर्माचा प्रचार-प्रसार करुन हिंदूधर्माची कट्टर व मजबूत मेढ रोवली. धर्माचा प्रचार होऊन हिंदूधर्मांत्तर वेगाने झाले. धर्म व संस्कृती रीतीनीतीचा जबरदस्त पगडा समाजमनावर पडला. त्याचवेळी मूळनिवासीयांवर अफगान, यवन हून, तुर्क मंगोलीयन अरबियांचे सतत हमले सुरु होते. मुगलांनंतर इंग्रजांनी भारतावर शासन केले. आपली शासनव्यवस्था, न्यायव्यवस्था तयार करुन दऱ्या खोऱ्यात, अरण्यात आपले स्वतंत्र इतरांपासून जीव वाचवून शांततेनी जीवन जगणाऱ्या आदिवासींचे जल, जमीन, जंगल ताब्यात घेतले. त्यांच स्वामीत्व, सामाजिक कायदे व असले नसले स्वातंत्र्यही हिरावून घेतले. आदिवासींना दुसऱ्यांची गुलामी मान्य नाही. लाचारी पत्करण्यापेक्षा मरण पत्करणे हा त्यांचा धर्म आहे. चोरी करणे, लूटमार करणे, भीक मागणे, फसवणूक करणे या गोष्टींना त्यांच्या धर्म संस्कृतींत मान्यता नाही. त्यामुळे इंग्रजांविरोधांत दऱ्या-खोऱ्यांतल्या आदिवासींनी प्रथम विरोध करुन बंड पुकारले. इंग्रजांविरोधात हल्ले चढविले. बंडखोरी करुन विरोध दर्शविला. त्यानंतर संपूर्ण देशात हिंदू, मुस्लीम, शीख, ईसाई, बौद्ध सर्वांनी बंड पुकारले. आदिवासी लढले-प्रतिकार करताना सर्वात जास्त आदिवासींचे रक्त सांडले. सर्वात जास्त शहीद आदिवासी झालेत. हजारोंच्या संख्येनी आहुती दिली. हजारो कापले गेले, मारले गेले, चिरडले गेले. आपल्या रक्तपात रक्ताने भारत भूमीला सर्वप्रथम आदिवासी माणसांनी चिंब केले. मायभूमीच्या रक्षणासाठी, या मातीसाठी, स्वाभीमान व अस्तित्वासाठी मरण पत्करले. कारण मातृशक्ती मातृप्रेम, मातृभक्ती, मातृपूजा, त्यांच्या संस्कृतीचा उच्च आदर्श आहे. मायेसाठी सर्वस्वाचा त्याग करणे हेच आदिवासी धर्म व संस्कृतीचे उच्च तत्त्वज्ञान आहे. '' म्हणूनच भारतभूमीच्या पृथ्वीच्या निर्मितीपासून आजमितीपर्यंत जर मायमुलांचे-नाळचे नाते असेल, ते आदिवासीसाठींचे'' म्हणूनच ते हक्कदार, वारसदार व मूळचे मालक ,वंशधर या देशाचे आदिवासी आहेत. परंतु स्वातंत्र्याच्या विजय उत्सवानंतर ह्या लढवय्यांना रक्त/जीव बहाल केलेल्या वारसदारांना काय मिळेल? काय दिले त्यांना स्वातंत्र्याने? बटवारा झाला. सत्ता संपत्ती उद्योग/व्यापाराची वाटणी झाली. सर्वांना सर्व मिळाले, उरले शेवटी आदिवासी. आरक्षणाच्या नावाखाली एक तुकडा दिला. कारण ते निर्बुद्ध आहे. अपात्र-अज्ञानी मागास, नीच वर्गातील आहे. त्यांच्या गरजाचं कितीक? या मानसिक सडेल भावनेतून क्षेत्र प्रतिबंधनाची अट ठेवून १९७६ पर्यंत आदिवासींना ताटकळत ठेवले. मुके, बहिरे/गुंगे/नाकर्ते/निराधार/निशब्द/भित्रे समजून सुळावरची पोळी दाखवत त्यांना दाबून ठेवले. सत्तेच्या मक्तेदारांनी अंगुली निर्देशावर नाचवत, त्यांना आपल्या बुद्धीचातुर्याने नागवत ठेवले. कायमचे मानसिक गुलाम बनवून आपल्या अधिकाराच्या हुकूमशाहीच्या पिंजऱ्यात बंदिस्त करुन ठेवले. संविधानात कायदे झाले. आरक्षणाचे गाजर दाखविता दाखविता - आता जीव जाण्याच्या तयारीला लागले. परंतु आमचे दुःख आमचेच राहील. त्यांचे कधीच झाले नाही ! ही वास्तववादी शोकांतिका व दुःख माझा स्वअनुभव आहे. आदिवासीत वर्णभेद चातु:वर्ण व्यवस्था नाही. समता, बंधुत्व, निसर्गपूजक, निसर्गवादी जगणे मरणे व्यवहार रीतीनीतीच्या व धर्मास आदिवासी मानतो. तो निसर्गाचा उपासक आहे. देवदैवत, श्रद्धा, पूजा, आदर

हा निसर्ग आहे. आर्यांच्या धर्मसंस्कृतीहून भिन्न अशी धर्मसंस्कृती आदिवासींची आहे. आर्य पुरुष प्रधान संस्कृतीचा पूजक आहे, तर आदिवासी मातृशक्तीचा पूजक आहे. कपोलकल्पीत देवदेवतांना मानत नाहीत, तर वस्तुनिष्ठ निसर्ग व आपल्या वंशजांना देव दैवत मानणे ही आदिवासी संस्कृतीचे मूल्य आहेत. आदिवासींच्या संस्कृतींची नीतीमूल्ये उच्चप्रतीची वस्तुनिष्ठ, निसर्गवादी व विज्ञाननिष्ठ आहेत. त्यामुळेच हिंदूधर्म, इस्लामधर्म ईसाईधर्म आदिवासींना आपापल्या धर्माकडे ओढून जबरीने हिंदूधर्म, मुस्लीमधर्म, ईसाई धर्म देऊन धर्मांतरीत करीत असल्याचे दिसून येते. आदिवासींचे अज्ञान, आर्थिक कमकुवतपणा, सामाजिक संघटनेचा अभाव व कायदा, न्याय, सुरक्षिततेचा अभाव यामुळेच आदिवासींवर जो-तो आपला हक्क सांगून त्यांना जबरीने धर्मांतरीत करुन गुलाम बनवित आहे. हा माझा स्पष्ट आरोप आहे. आदिवासी संस्कृती ही मागास आहे. ते अंधश्रद्धाळू आहे. ते पशुवत आहे, कुठली संस्कृती कुठला धर्म? कुठली नीतीमूल्ये? कुठला आदर्श? कुठले अस्तित्व? हे प्रश्न विचारून त्यांचे मानसिक बौद्धिक बळ कमी करुन जो तो आदिवासींबद्दल बोलतो लिहितो व सांगतो. खरेतर आमचे दुःख, आमची व्यथा, आमची संस्कृती, आमचे जगणे मरणे, आमची देव-दैवते, आमच्या गरजा हे सारे आम्हास माहिती असताना इतरच यावर बोलतात, लिहीतात. त्यात कितीक तथ्य असते, ह्याचा कोणी विचारच करीत नाही. जोतो फक्त आदिवासींवरच का बोलतो? का लिहितो? त्यांना बोलण्याचा-लिहिण्याचा, वाटेल तशी मते व्यक्त करण्याचा, वाटेल तशी समीक्षा करण्याचा, ऊहापोह करण्याचा, उच्चनिचतेच्या तराजूत वजन करण्याचा, प्रतवारी करण्याचा, (श्रेणी) योग्य ठरविण्याचा अधिकार कोणी दिला? ह्यावर विचार होणे अगत्याचे आहे. आणि त्यामुळे आदिवासींच्या उच्च प्रतीच्या आदर्शवादी वस्तुनिष्ठ, विज्ञान विचार मूल्ये असलेल्या संस्कृतीचा नाश झालेला आहे. उरली सुरली संस्कृती व अस्तित्व आज मरणदारी पोहोचविण्याचे काम गैरसंस्कृतीचे लोक करीत, आहे हे खेदाने म्हणावे लागते. कारण पुरोहित, गुरुपंरपरा व किरायाचा माणूस आणून पूजापाठ व प्रचार आदिवासी संस्कृतीमध्ये नाही.

आदिवासी समाजाच्या स्थितीचे तीन कालखंडात विचार होणे महत्त्वाचे वाटते.

१) भूतकाळातील गौरव

२) वर्तमानताळातील स्थिती

३) भविष्य काळातील स्थिती

भूतकाळातील गौरव - आदिवासी संस्कृती पृथ्वी निर्मितीपासून मानवी विकास, विस्तार ते आजपर्यंत अतीप्राचीन आहे. भारताच्या तिन्ही बाजुंनी समुद्र व एका बाजुनी पर्वतरांगा, निबीड अरण्यांनी व्यापलेला भूभाग होता. अतीसंपन्न समृद्ध सुजलाम् सुफलाम् स्थिती असलेला भूभाग हा प्राचीन आदिवासींची वसाहत-मातृभूमी व मूळचा प्रदेश होय. म्हणून मातृभूमीचे वारस, आदिवासी मूळनिवासी होते. त्यांची स्वत:ची भाषा संस्कृती होती. अर्थातच त्यांची भाषा, लिपी होती. त्यांची संस्कृती धर्म व जीवनपद्धती होती. परंतु आर्य आगमनामुळे आर्यांच्या सतत आक्रमाणामुळे उदध्वस्त झालेली संस्कृती व भग्नावेश झालेला दहापंधरा हजार वर्षापूर्वीचा इतिहास हा आदिवासींचा आहे. स्वावलंबन/सहकार/इमानदारी, सत्यवाद, साम्यवाद, निसर्गवाद व स्वतंत्र जीवन जगण्याची पद्धती यामुळे समृद्ध समाजव्यवस्था व उत्तम संस्कृतीची नीतीमूल्ये, आदर्श तत्वज्ञान व गौरवशाली भूतकाळ होता. परंतु परकीयांच्या आक्रमणांमुळे यांची मूळ संस्कृती नष्ट

झाली. त्यांचा गौरव, इतिहास दडपला गेला. त्यांची भाषा लिपी नष्ट केली गेली व रानावनांत आश्रय घेऊन ते जगू लागले.

वर्तमान स्थिती - आदिवासी संस्कृतीवर सतत घोर हमले झाल्याने, आर्य संस्कृतीच्या वर्चस्वाने प्रभावितपणामुळे मूळ संस्कृती पासून नवी पिढी दूर गेली आहे. त्यांना आपल्या संस्कृतीची जान-भान व ओळख राहिलेली नाही. बाह्य संस्कृतीमध्ये वाढल्यामुळे विचार-आचार-संस्कार झाल्यामुळे गैरसंस्कृतीच्या लोकांकडून आदिवासी संस्कृतीबाबत्र गैरसमज पसरविले गेले, आदिवासी संस्कृती मागास आहे, पशुवत आहे, ती अंधश्रद्धाळू, अज्ञानी, अडाणी व नीच प्रतीची आहे. कुठली संस्कृती? कुठली नीती मुल्ये? कुठला आदर्श? ती तर रानटी लोकांची संस्कृती आहे अशा विचारांमुळे, शिक्षणातूनही तसेच वर्णन वाचल्यामुळे, तशीच चर्चा केल्यामुळे तरुण पिढी स्वतःच्या संस्कृतीपासून दूर गेलेली आहे. वेदपुराण, पोथी परंपरा, गुरु, पंडीत, पुजारी, मंदिर, व्रतवैकल्ये देवदेवता, पुण्यपाप या कल्पना व समाजव्यस्थेमधून मिळणाऱ्या शिकवणुकीतून आदिवासी समाजच आपल्या संस्कृतीपासून भटकून दूर गेलेला आहे. दुसऱ्याच्या इशाऱ्यावर दुसऱ्याची गुलामी पत्करुन/ मानसिक गुलाम झालेला वर्ग आज आदिवासी समाजात तयार झालेला आहे. शिकून काय होणार, कोणता न्यायधीश होणार, सरकारचे जावई, आरक्षणाची मस्ती आली. माजलेत, साले आदिवासी हे वर्तमानकाळात सतत उपरोधिक बोलणे ऐकून ऐकून आदिवासी समाजाचे मानसिक बळ कमी करण्याची साजेदारी व उपरोधिक तिरस्कृत वागणूक मिळाल्यामुळे, कुठेही सन्मानाची वागणूक व न्याय समतेनी वागणूक न मिळाल्याने वर्तमान काळात आदिवासी समाज न्यूनगंड/भीती व आत्मग्लानीने बेहोश झालेला आहे. प्रतिकार करण्याची क्षमता असूनही निरुत्तर, निष्क्रीय स्थितीत दिसून येतो.

आरक्षणाच्या नावाखाली हजारो रुपये खर्च होतात. हजारो योजना राबविल्या जातात. परंतु संसद भवनातून ग्रा. पं. ग्राम स्तरावर लाभार्थी पर्यंत फक्त १० टक्के हिस्सा आदिवासींना मिळतो. तोही सुखाने न मिळता, धाक दपटशहा-वजने ठेवून मोठ्या मुस्कीलने मिळतो. ही वस्तुनिष्ठ स्थिती आहे. आरक्षण असले तरी महागडे शिक्षण व उच्च प्रतीच्या परिक्षेपर्यंत आदिवासी विद्यार्थी पोहचू शकत नाही. म्हणूनच आरक्षण या फसव्या मृगजळामागे धावत असणारा आदिवासी आज शिक्षणक्षेत्र, व्यवसाय क्षेत्र, राजकीय क्षेत्र, समाजक्षेत्र, जागतिक क्षेत्र या सर्वात मागे आहे. आजही आय.पी.एस., आय.ए.एस. अधिकारी नाहीत. जलसेना, वायुसेना व मिलीट्रीमध्ये कमांडर, जनरल आदिवासी नाही. केंद्रसरकारमध्ये कॅबीनेटमंत्री, राज्यपाल, राजदूत, परराष्ट्रमंत्री नाहीत. महत्त्वाच्या हुद्दयावर आदिवासी नाहीत. शिक्षणप्रणाली आदिवासीसाठी सुकर नाही. त्यांची बोलीभाषा व भौगोलिक स्थिती, सामाजिक स्थिती व वातावरणानुसार नसून आंधळ्यापुढे मोती ठेवल्यासारखी गत आहे. ही क्रूर थट्टाच आहे. वर्तमान स्थितीत आदिवासी दिशाहीन अवस्थेत भरकटलेला, डोक्यात काहूर घेऊन भयगंडानी पछाडलेला, असुरक्षित, बेघर, बेहाल स्थितीत जगताना दिसतो आहे.

शासनाचे धोरण - स्वतंत्र भारतात शासनव्यवस्थेत पुंजीपती, उच्चकुलीन वर्गाचे वर्चस्व आहे. कायदा करणारे/राबविणारे/अंमलबजावणी करणारे/ मूल्यांकन करणारे व श्रेणी ठरविणारेही तेच आहेत. आदिवासींचा विकास करण्यासाठी नेमकी कोणती गरज आहे? काय

अत्यावश्यक आहे? कशा प्रकारची निकड आहे. व्यवस्थापन कसे असावे? ह्याचा विचार करणाऱ्या समितीमध्ये एकही आदिवासी नसतो. कुलरच्या हवेत ए.सी. मधून फिरणारे सत्ताधीश आदिवासींसाठी योजना करतात-शासन निर्णय घेतो; परंतु आदिवासींची गरज, त्यांची भूक व त्यांचे दुःख त्यांचा अंतस्थ टाहो-त्यांचा अंतस्थ आक्रोश शासनाला ऐकू येत नाही, ही शोकांतिका आहे.

१९५२ पासून नेहरुंच्या काळापासून सोनियाच्या काळापर्यंत एकही कॅबिनेट मंत्री, राज्यपाल, राजदूत आदिवासी आलेला नाही. केंद्रीय सचिवालयांत सचिव शून्य आहे. प्रशासनकर्त्यांची मानसिकताच आदिवासीप्रती चांगली नाही. आदिवासींची लायकीच नाही, ते बुद्धीमान असूच शकत नाही ही धारणा आहे. म्हणून योग्यता असतांनाही-शिक्षण क्षेत्रात, उद्योगधंद्यात व उच्चपदस्थ जागेपर्यंत त्यांना पोहचू दिले जात नाही. यासाठी विविध अटी, नियम व जाचक कायदे आदिवासींसाठी तयार केले आहे. जातीयतेचे खतपाणी घालून विविध जातींना आदिवासींच्या आरक्षणासाठी, सवलतीसाठी भडकविले जात आहेत. त्यांना संविधानाने कायद्याने दिलेला हक्कही आज मिळणे दुरापास्त झालेले आहे. जे लोक १९७६ पर्यंत आदिवासी ही नीच जात आहे, त्यांच्या जमातीप्रवर्गात आम्ही नाहीत असे सांगणारे आज कितीतरी जातीचे लोक (खोटे) घुसखोर आदिवासींच्या जागा बळकावून चैनीने जगत आहे व मूळचा आदिवासी लढत झगडत हार खावून मरणदारापर्यंत पोहचला आहे. हे कशामुळे होत आहे. शासनाच्या सावत्रभूमिकेमुळे आदिवासींच्या विकासमार्गात अडथळे निर्माण करण्यासाठी तयार केलेल्या बुद्धीपुरस्पर जाणीव पूर्वक केलेल्या अडवणुकीमुळे आहे. शासनाची भूमिका न्यायीक नसून आदिवासीसाठी बेहोशीत-अडगळीत ठेवण्याची किमया आहे.

आदिवासी जल-जमीन-जंगलांचे स्वामी असून जमीन-जंगलाचे संवर्धन करणारे आहेत. मात्र उद्योग विकासाच्या नावावर आदिवासींना त्यांच्या भूमीपासून विस्थापित केले जात आहे. जंगलात कारखाने-खाणी तयार करुन आदिवासींना हुसकावून लावले जात आहे. त्यांना बेघर-बेसहारा करुन देशीधडीला लावले जात आहे. ही वास्तविकता आहे. सरोवर/तलाव/कारखाने उभारण्यासाठी हजारो आदिवासींना बेघर केलेले आहे; परंतु त्यांच्यासाठी वसाहती बांधून त्यांना सुरक्षितता दिलेली नाही. ते दरदर भटकत आहे. मग ते सरदार सरोवर असो, तुंगभद्रा असो की बर्गी असो, भिलई, राहूलकेला, खडकवासला, संबलपूर, रायगडा असो की सिमेन्ट फॅक्ट्री कोलमाईन्स असो. जंगलांना उद्धवस्त करुन हजारो आदिवासींना सरकारने त्यांचे जमीनीचा संपत्तीचा मुहावजा न देता बेदखल करुन आदिवासींवर अतोनत अत्याचार व छळ केल्याचे उदाहरण जीवंत आहे.

नक्षलवाद हे दुसरे ताजे उदाहरण आहे. मारणाराही आदिवासी व मरणाराही आदिवासी; परंतु नक्षलवादी संघटना कोणाची आहे? तीच तर आदिवासींची नाही. पोलीस व नक्षलवाद्यांच्या हातातील बंदुकीतील गोळ्या कोणत्या आदिवासींच्या कारखान्यांतील आहे? त्या तर उद्योगपतींच्या कारखान्यातून तयार झाल्या. शासन व्यवस्था याचा शोध न घेता नक्षलवादी म्हणून हजारो आदिवासींना कापून काढत आहे. आमचे मरण आमच्याच हातांनी करवून घेत आहे. शासन जर खरोखरच आदिवासींचा विकास व सुरक्षा करत असते तर असे रोज मुरदे पडले नसते. शासन एवढे कमजोर कसे, जे एका नक्षलवादी

संघटनेला आटोक्यात आणू शकत नाही? करोडो रुपये खर्च करुन नुसते आदिवासी मारुन टाकत असेल तर शासनाची भूमिका काय आहे? यावर विचार न करण्याइतपत आदिवासी बुद्धीहीन नाही. शासनाच्या या भूमिकेपायी आदिवासींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. उद्या मारुन मारुन आदिवासी संपवून टाकण्याची ही पद्धतशीर कपटनीती आहे, असे म्हणणे अयोग्य होणार नाही.

समाजाचा दृष्टिकोण - आज भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील आदिवासींचे भवितव्य धोक्यात आले. परंतु आदिवासींकडे पाहण्याचा दृष्टिकोन घृणास्पद व तिरस्कारयुक्त, संदेहपूर्ण आहे. समाज कधीच आदिवासींच्या संस्कृतीचा/इतिहासाचा चांगल्या गोष्टींचा गौरव करीत नाही, तर फुकटचे भेटते म्हणून मस्ती आली. आरक्षण भेटते, सवलती भेटते म्हणजे सर्व आदिवासींनाच सारे मिळते, अशी धारणा सर्वसामान्य समाजाची झाल्यामुळे व सतत आदिवासींच्या नावांनी शासन करोडो रुपये खर्ची घातल्याचा डांगोरा पिटत असल्यामुळे समाजात आदिवासींबद्दल ईर्षा निर्माण झाली आहे. ते तुच्छ भावनेनी, हीन भावनेनी व बदल्याच्या भावनेने विचार करतात. ही आजची वास्तविक स्थिती आहे. तसेच साहित्यामधून, शिक्षणामधून आदिवासींची संस्कृती/ इतिहास व माहिती मधून जे हीन दर्जाचे बिभत्स चित्रण केले आहे, त्यामुळे ते मागास, उघडे नागडे बुद्धीहीन, पशुवत, रानटी अशी सर्वसामान्य समाजाची, बहूजन समाजाची धारणा झालेली आहे. एवढेच नव्हे तर सुशिक्षित समाज हिंदू धर्म, बौद्ध धर्म, इस्लाम धर्म व इतर धर्माच्या लोकांचीही आदिवासींप्रती पाहण्याचा दृष्टीकोन हा हीन दर्जाचा आहे. समाजशास्त्रात अभ्यास करताना त्याची उच्च नैतिक, सामाजिक मूल्ये, आदर्श मूल्ये न दाखविता उणीवा, नीच भावनेतून दर्शविल्या जातात. त्यांचे सामाजिक जीवन, सामाजिक नियम व कायदे ह्याबाबत गैरसमज पसरविणारे असते. त्यामुळे समाजाचा दृष्टिकोन हा उपहासात्मक असतो.

मिडीया - एवढेच नव्हे तर पेपर, पत्रिका रेडिओ टीव्ही प्रसिद्धी माध्यमे सुद्धा आदिवासींच्या इतिहास, त्यांची संस्कृती, त्यांचे साहित्य याला प्रसिद्धी देण्याचे टाळतात व उणीवा, कमकुवतपणा हीनप्रवृत्ती, रानटीपणा जास्तीत जास्त हीन भावनेने दाखविण्याचा प्रयत्न करीत असते. एकूणच समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन विशाल नाही. संकुचित व उपरोधिक असल्याचे दिसून येते.

स्वअनुभव - आदिवासी समाजात वाढल्यामुळे व आदिवासी समाजाची असल्यामुळे नोकरीच्या ठिकाणी अनेकदा आदिवासी, गोंडगोवारी-आदिवासी चुलीपासी अशा प्रकारची हेटाळणी ऐकून अपमान सहन करावा लागला.

उच्चपदस्थ अधिकारी सतत, तुम्हाला समजत नाही. अक्कल नाही, तुमची लायकी नाही. असे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष वागणूक देऊन उच्च पदापर्यंत पोहचू देत नाही, किंवा मानसिक छळ सहन करावा लागतो, हा स्वअनुभव आहे. एवढेच नव्हे, तर समदुःखी एस.सी. व ओबीसी समाजाकडून आदिवासी समाजाबद्दल हेटाळणी केली जाऊन उपेक्षित, बुद्धीहीन अशा प्रकारची जी तिरस्कारयुक्त वागणूक मिळते तेव्हा खरोखरीच दुःख होते.

काय करु माझ्या दुःखाची जातच वेगळी आहे
मी तुमचे सारेच संदर्भ नाकारते असे नाही.....
पण काय करु...? माझ्या दुःखाची
माझ्या वेदनेची जातच वेगळी आहे.
त्याला माझाही नाईलाज आहे.

••

# विकासाच्या वाटेकडे

सुभाष पावरा

सातपुड्याच्या परिसरात डोंगराळ भागात व पायथ्याशी वसलेले बरेच टक्के लोक आदिवासी आहेत. शासन वेगवेगळ्या कल्याणकारी योजना आखून, अंमलात आणून या आदिवासी बांधवांची आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न करीत आहे. आदिवासी बांधवांना जास्तीत जास्त सुशिक्षित व सुखी समृद्ध करण्यासाठी अनेक योजना आखल्या जात आहेत व अंमलात आणल्या जात आहेत. परंतु या योजनांचा फायदा किती प्रमाणात आदिवासींना झाला? हा संशोधनांचा विषय आहे. आदिवासी समाजाचा सूक्ष्म अभ्यास केला तर आदिवासी समाजातील ५० ते ६० टक्के आदिवासींच्या मुलभूत गरजादेखील भागत नाहीत. अनेक आदिवासींना राहण्यासाठी घरे नाहीत. दोन वेळेचे पुरेसे जेवणसुद्धा मिळत नाही. अंगाला वस्त्रे मिळत नाहीत. यावरुन आदिवासींचा आर्थिक मागासलेपणा दिसून येतो. आर्थिक मागासपणामुळे दरवर्षी अनेक बळी पडतात. याविषयी संशोधन करुन शासनाने आणि समाजसुधारक कार्यकर्ते आणि सामाजिक संस्थांनी त्यावर प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे.

आदिवासी व इतर मागासलेला समाज दैनंदिन स्वरुपात जीवन चरितार्थ चालवित असल्याने व समाजाच्या विकासाच्या योजना शासनयंत्रणेच्या करवी राबविल्या जात असल्याने कोणत्याही योजनेचा लाभ त्यांच्यापर्यंत खऱ्या अर्थाने पोहचत नाही. अशा कित्येक योजनेचा लाभ प्राप्त करण्यासाठी त्यांना कळत नाही. यासाठी समाज जागृती व्हायला हवी. समाजात कार्य करणारे कार्यकर्ते कोणत्याही जातीजमातीचे असोत, त्यांना प्रतिष्ठा असल्याशिवाय त्या कार्यकर्त्यांस आदिवासी समाजाचे कार्य करता येणार नाही. आदिवासी माणूस प्रतिनिधी म्हणून पुढे येतो व तो समाजकारण करुन प्रतिष्ठा प्राप्त करुन समाजात नेतृत्त्व निर्माण करु शकतो. परंतु आपला आदिवासी समाज पुरेसा जागृत नसल्याने त्यात दीर्घकाळ त्यांची प्रतिष्ठा व नेतृत्त्व राजकीय नेतृत्त्वापुढे टिकाव धरु शकत नाही. त्यामुळे तो समाजात नेतृत्त्व निर्माण करुन समाज संघटित करु शकत नाही. त्यामुळे समाजाचा विकास होऊ शकत नाही.

तसेच साक्षरतेच्या मदतीने माणूस शिक्षित होतो. शिक्षित माणूस विचारी होतो. अशा विचारी माणसांनी आदिवासींच्या विकासाच्या समस्यांकडे पाहिले पाहिजे. सध्याच्या अपात्र व्यक्तींनी निवडून आणणाऱ्या व लोकशाहीचा विपर्यास करणाऱ्या प्रक्रियेतून, तसेच त्या प्रक्रियेत गुंतून पडलेल्यांच्या चाकरमान्या वृत्तीतून अशा शिक्षित बांधवांनी आधी बाहेर पडले पाहिजे. आदिवासी समाजाची प्रगती, विकास, लोकांच्या समस्यांविषयी अनेक लोक उल्लेख करीत असतात. प्रत्यक्षात कार्यास सहकार्य नाही असे दिसून येते. सहकार्य केले पाहिजे व आपण पुढाकार घेतला पाहिजे.

शासनाकडे आर्थिक बाबीची कमतरता झालेली आहे. त्यामुळे काही योजना बंद करण्यात येत आहेत. खरा विकास म्हणजे शिक्षण; शिक्षणासाठी शासनाने काही सवलत बंद केली तर मागासलेला समाज

शिक्षणातून वंचित राहील. समाजाकडून देणगी उपलब्ध होऊ शकणार नाही. शिक्षित बांधवांनी पुढाकार घेऊन स्वावलंबनाने शाळा काढून अनौपचारिक शिक्षण दिले तर समाज शिक्षणापासून वंचित राहणार नाही.

नोकर कपात, नोकऱ्या बढती बंद, एकीकडे लोकसंख्या वाढीचे प्रमाण; तर शिकलेल्या तरुणांनी काय करावे? नोकरीची वाट बघण्यापेक्षा आपण स्वावलंबी जीवनाकडे वळले पाहिजे. लहान-मोठ्या व्यवसायाकडे लक्ष दिले पाहिजे. ज्याची शेती आहे, त्यांचेही दिवसेंदिवस नगदी उत्पन्नाची घट होत चालली आहे, ते कसे वाढविता येईल यांच्यावर संशोधन केले पाहिजे.

अज्ञान व अंधश्रद्धा - आदिवासी समाजात शिक्षणाचा प्रसार व प्रचार फारच कमी झालेला आहे. त्यामुळे रोजगार कुठे मिळतो? व कसा मिळवावा? उदरनिर्वाहासाठी कोणत्या मार्गाने पैसा मिळवावा? आणि मिळालेल्या पैश्यांचा विनीयोग कोणत्या पद्धतीने करावा? कोणत्या कारणासाठी किती प्रमाणात करावा? याचा अंदाज आदिवासी समाजात अज्ञानामुळे दिसून येत नाही. तसेच आदिवासी समाज देववादी असल्यामुळे अनावश्यक रुढी परंपरा आणि अंधश्रद्धेवर मोठ्या प्रमाणात अनावश्यक खर्च करतो. मुळातच मर्यादीत उत्पन्न, त्यात हा अनावश्यक खर्च. यामुळे आर्थिक ओढाताण स्वत:हून अज्ञान आणि अंधश्रद्धेपायी ओढवून घेतो.

रोजगार नाहीत - आदिवासी वस्ती जंगलात व खडकाळ भागात जास्त दिसून येते. अशा भागात रोजगार उपलब्ध करुन देणारे कारखाने व लहान मोठे उद्योग स्थापन होत नाहीत. त्यामुळे शहरी भागातील लोकांप्रमाणे आदिवासी बांधवांना रोजगार मिळण्याची संधी मिळत नाही. रोजगाराची पुरेशी संधी प्राप्त न झाल्यामुळे आर्थिक उत्पन्नाचे मार्ग म्हणजे शेती व शेतमजुरी आणि किरकोळ वनस्पती गोळा करुन व सर्पण गोळा करुन उपजीविका करताना दिसून येतात.

फसवणूक -आदिवासी समाजाची व्यापारी व सावकारी वर्गाकडून सुरुवातीपासूनच फसवणूक व पिळवणूक होत आली आहे. व्यापारी वर्ग आदिवासीकडून शेतीवरील माल, फळे व जंगलातील माल आदी वस्तू कमीत कमी किंमतीत खरेदी करुन दोन्ही मार्गांनी पिळवणूक करतो. तसेच खरेदी व विक्रीच्या व्यवहारात वजनमापात मोठ्या प्रमाणात फसवणूक करतो. बळजबरीने (सक्तीने) माल खरेदी करतानाही आदिवासी भागात दिसून येतो. शैक्षणिक प्रगती मर्यादित असल्यामुळे अज्ञानाचा फायदा व्यापारीवर्ग आणि छुपे सावकार घेताना दिसून येतात. शैक्षणिक मागासपणामुळे आदिवासी बांधवांना रोजगार संधी प्राप्त करण्यास अडचण निर्माण होते.

मजुरीतही फसवणूक - आदिवासी समाजाचा शेतमजुरी हा महत्त्वाचा आर्थिक व्यवसाय आहे. शेतकरी अल्प मजुरीवर त्यांच्याकडून कामे करवून घेऊन आर्थिक पिळवणूक करतांना दिसून येतात. तसेच खाजगी ठेकेदार व शासकीय कर्मचारी देखील त्यांची फसवणूक करीत असतात. अज्ञानी आदिवासींना आठ आठ तास कष्टाचे काम करुन देखील पूर्ण मजुरी मिळत नाही.

शोषण - शासनाने आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी विविध योजना केल्या आहेत, मात्र समाजातील लहान मोठे पुढारीच, जे दुर्बल घटक आहेत तिथपर्यंत योजना पोहोचू देत नाहीत. आणि कोण खरोखर या योजनांचा लाभ घेतो? याचा अभ्यास केला पाहिजे. दुर्बल घटकांनाच हा लाभ मिळावा म्हणजे त्यांचा आर्थिक विकास होईल.

मागासलेपणाचे कारण - आदिवासींच्या आर्थिक

गरजा मर्यादित असल्यामुळे गरजेपुरते आर्थिक उत्पन्न मिळवावे व संतुष्ट रहावे अशी प्रवृत्ती आढळते. त्यामुळे उत्पन्नात वाढ करुन जीवनमान वाढविण्याची प्रवृत्तीच खुंटते. ज्याप्रमाणे अनावश्यक गरजा आर्थिक समस्या निर्माण करतात, त्याचप्रमाणे मर्यादित गरजा सुद्धा आर्थिक मागासलेपणा निर्माण करतात. हा मागासलेपणा दूर करण्यासाठी शासनस्तरावर कल्याणकारी योजनेची अंमलबजावणी होत आहे. मात्र योजना यशस्वीरित्या राबविली गेली पाहिजे. त्याचप्रमाणे आदिवासी समाजसेवक व आदिवासी बांधवांतून नेतृत्व जागृती होण्यासाठी दळणवळणांच्या सुविधा व पक्क्या रस्त्यांची सोय झाली पाहिजे.

आदिवासीचा मुख्य व्यवसाय म्हणजे शेती असतो. काही भागात सुपीक तर काही भागात उताराची जमीन आहे. काही शेतकरी रब्बी हंगाम तर काही खरीप हंगामावर अवलंबून असतात. ही जमीन बऱ्याच पिढ्यान्‌पिढ्या शेती करीत आलेलेआहेत. पाऊसपाण्यामुळे त्यातील माती वाहून उताराची जमीन झालेली आहे. उत्पन्न वाढवायचे असेल तर माती अडविणे गरजेचे आहे. अशा जमिनीला बांध बांधून सपाट केली पाहिजे, माती अडविण्यासाठी व बांध फुटणार नाही यासाठी बांधाजवळ झाडे लावली पाहिजेत. शेताच्या चहूबाजूने फळझाडांची लागवड केली तर उत्पन्न वाढेल व पालापाचोळ्यापासून खत तयार होईल. जमिनीची धूप कमी होईल. झाडापासून पाणी झिरपेल; ओलावा राहील. गुरांना पाल्यापासून चारा मिळेल.

काही आदिवासी बांधव शेती विकणे, गहाण ठेवणे या प्रथा अजून चालवतात. परत त्याच शेतात मजुरी करतात. अशा गरीब बांधवांच्या अडचणी समजून त्यांना योग्य मार्गाला लावले पाहिजे.

पूर्वीच्या काळी संकरीत खत बियाण्यांचा वापर नव्हता. त्यावेळी घरात भरपूर जनावरे होती. तेव्हा शेणखताचा वापर होता. गवतपाल्यापासून खत तयार होत होते. झाडामुळे भरपूर पाऊस. गावरान पिके घेत होते. त्या पिकात पौष्टिकतेचे प्रमाण जास्त होते. तूपदूध रोटी शिवाय खात नव्हते. त्यामुळे त्या काळी धिप्पाड माणसे होती. आताच्या काळी जास्त उत्पन्न वाढावे म्हणून संकरीत बियाणे, रासायनिक खताचा वापर होतो. जे नैसर्गिक खत तयार करणारे गांडूळ, किडे नष्ट झालेले आहेत, जमीन नापीक झाली आहे. अन्नधान्यात पौष्टीक आहार कमी. जमीन उतार झाल्यामुळे पाणी टिकत नाही. अशी विविध कारणे उद्‌भवली आहेत. परत शासनाने 'गांडूळ वाचवा' ही योजना चालू केलेली आहे. ती योजना राबविली पाहिजे.

पाण्याची पातळी खोलवर गेलेली आहे. पाण्याचा दुष्काळ निर्माण झालेला आहे. पाणी हे जीवन आहे. पाण्याशिवाय जीव जगणे कठीण आहे. पावसाशिवाय नदी, नाल्यात पाणी राहात नाही. तलाव आटत आहेत. उन्हाळा आला की पाण्यासाठी धावपळ करावी लागते. जनावरे वणवण भटकत फिरतात. तसेच मासे, आपण अन्न म्हणून उपयोगात आणतो, त्यांची पैदास नष्ट झालेली आहे. वनस्पती नष्ट होत आहेत. यासाठी 'पाणी अडवा पाणी जिरवा' हा कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. ज्या गावात नदीनाले आहेत, अशा प्रत्येक खेड्यातील माणसांनी स्वयंसेवेने पावसाळा संपल्यानंतर नदीनाल्यात काही अंतराअंतराने बांध घालून पाणी अडविले पाहिजे. आपल्या गरजा आहेत त्या स्वयंस्फूर्तीने पूर्ण होतील. बारमाही पाणी टिकेल. तसेच जिवंत नदी राहिल्यावर किंवा पाणी साचलेल्या जागी टरबूज, कलिंगड, काकड्या अशी विविध नगदी पिके काढता येतील. मोठ्या डबक्यात, तलावात मासे

पैदास करुन आपला स्वयंरोजगार उपलब्ध होऊ शकेल.

वॉटर बँक - शेतकऱ्यांनी आर्थिक मदत जमा करुन एक बँक तयार केली पाहिजे. त्या पैशातून खेडूत जमिनीत किंवा नदीनाल्याच्या काठी विहीर, बोर, खोदल्या पाहिजेत. त्यातील पाणी आवश्यक त्या शेतकऱ्याला दिले पाहिजे. म्हणजे शेतकरी विविध उत्पन्न काढू शकेल.

कुक्कुट पालन - लहानातला लहान व्यवसाय म्हणजे कुक्कुट पालन. कोंबड्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर असते. शहरात कुक्कुट पालनासाठी स्वतंत्र घरे बांधलेली असतात. त्या कोंबड्या चवीला नसतात. तरी मोठ्या प्रमाणात उत्पन्न देतात. गावरान कोंबडी म्हटल्यानंतर ती चवीलाही चांगली असते. तिची किंमत जास्त असते. खेड्यावर विरळ वस्ती असते. कोंबड्या बाहेर सोडल्या जातात. त्यांना औषधांचा वापर तेवढा करावा लागतो. खर्च कमी. त्यांची थोडीफार काळजी घ्यावी. हा व्यवसाय जर केला तर मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल.

शेळ्या-मेंढ्या पालन - हा एक गरिबांचा व्यवसाय असतो. शेळ्यामेंढ्याना फक्त चारा लागतो. हा व्यवसाय खेड्यात फार मोठ्या प्रमाणात चालू शकेल. चाऱ्यासाठी आपल्या घराशेजारी, शेताच्या बांधावर, पडीत जमिनीत सुबाभूळ सारखी झाडे लावली तर भरपूर हिरवा पाला मिळू शकेल. थोडी काळजी घेतली तर बऱ्याच प्रमाणात उत्पन्न मिळेल.

दुधदुभत्या गायी म्हशी- या व्यवसायाला थोडा खर्च येतो. चारा व पौष्टिक खाद्य वेळेवर दिले तर भरपूर दूध मिळते. दुधाची मागणी खूप असते. तसेच आपण घरातही वापरु शकतो. पूर्वीच्या काळी प्रत्येक घरात दुधदुभत्ती जनावरे होती. डाळ संपली की दुधाचा कालवा करुन खात होते. हा व्यवसाय केला तर आपण स्वावलंबी जीवन जगू शकतो.

फळझाडे-भरपूर उत्पन्न देणाऱ्या व दीर्घ आयुष्य असणाऱ्या आंबा, महू, चारोळी, बदाम, चिक्कू, काजू अशा विविध झाडांची लागवड करुन काळजी घेतली पाहिजे. आपल्या उत्पन्नात भर होईल. आपली काही पडीत जमिनीत किंवा शेताच्या बांधावर, नदीनाल्याकडेने अशी झाडे लावली पाहिजेत.

आंबा म्हटल्यावर एक कल्पवृक्ष आहे. आंबे, आमसूल, कोया विकल्या जातात. तसेच आपण विकण्यापेक्षा आंब्यापासून लोणचे, रस तयार करणे, आमसूलापासून भुकटी तयार करणे, कोयांपासून साबण, तसेच टोळंबीच्या बियांपासून तेल काढणे, माहूफुलांपासून दारु तयार करणे असा पक्का माल तयार करुन विकू शकतो. कच्चामाल विकण्यापेक्षा आपणच माल तयार करुन बाजारपेठेत विकला पाहिजे. या छोट्याशा उद्योगात मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकेल.

सीताफळ झाडांपासून भरपूर उत्पन्न मिळवू शकतो. या झाडांना गुरे खात नाहीत. त्यामुळे कोठेही लावता येते. जसे, वनजमीन, पडीत जमिनीत लागवड केली पाहिजे. त्याची काळजी जास्त घ्यावी लागत नाही.

मोरी- आपण रोज आंघोळ करतो. भांडी कपडे धुतो. पाणी वाया जाते. अशा जागी पपई, फुलांची झाडे येतात. तसेच घराच्या पुढच्या मागच्या बाजूने वाडा असतो. अशा जागी वालपापडी, वांगे, फळे अश्या विविध भाज्या लावता येतील. भाजीपाला विकत घेण्याची आवश्यकता भासणार नाही. जास्त भाजी तयार झाली तर विकता येते. खर्च कमी, रोजच्या गरजा भागविता येतात.

हस्तकला- आदिवासी मेहनती आहे. तो उत्सुकतेने काम करतो. त्याच्याकडे भरपूर कला आहे. घरगुती उपयोगासाठी आवश्यक वस्तू लाकडापासून,

बांबूपासून, मातीपासून तयार करतो. पण या शैक्षणिक युगात उलट तो हे विसरत आहे. असे न विसरता आपण स्वावलंबी जीवनासाठी तयार व्हायला पाहिजे. हस्तकलेला बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी असते. मूर्तीकला, लाकडापासून नक्षीकाम व इतर सामान बनविणे, तसेच बांबूपासून विविध साहित्य बनविणे. अशी विविध वस्तूंची निर्मिती करुन विकता येते. तसेच गवंडीकाम, शिवणकाम, मधउत्पादन, सुतार-लोहाराची कामे, अशा कामांत भाग घेणे आवश्यक आहे. बांबूची घरे कोसळली आहेत, तर आपण स्वत: विटा तयार करुन घर बांधू शकतो. डांगमध्ये महिलामंडळाने बांबूपासून विविध साहित्यनिर्मिती करुन भरपूर उत्पन्न ते घेत आहेत. अशा प्रकारे मंडळे तयार करुन विविध साहित्याची निर्मिती करता येईल. उदा. खेळणी, खडू, पेन्सिल इ.

तसेच आदिवासी लोककथा, गीते, लोकनृत्य, चुटकुले, बालकथा, पौराणीक इतिहास, शूरवीर राजे, वेगवेगळ्या जमातीतील संस्कृती लिहिण्यासारखी आहे. तसेच संगीत कॅसेट तयार करुन विकता येतील.

आपला इतिहास कोणीतरी लिहिलेला असतो, त्यात उणीवा आढळतात. आपण लिहिला तर तो खरा इतिहास लिहिला जाईल. म्हणून शिकलेल्या बांधवांनी लिहिण्याचे काम हाती घेतले पाहिजे. ही एक मोठी विकासाची बाब आहे.

आरोग्य- आरोग्य म्हटल्यानंतर सर्व समाजात उणीवा आढळतात. सार्वजनिक जागेवर घाण करणे हे एक योग्य नाही. विहिरीवर, नळावर, बऱ्याच वेळा कचरा, घाण साचलेली असते. तसेच भांडी, कपडे धुणे अशा वेळी सांडपाणी योग्य मार्गाने सोडले पाहिजे. एस.टी बस, रेल्वेत बसून पान, तंबाखू खाऊन थुंकणे, बिडी, सिगारेट ओढणे, दारु पिणे, तपकीर घासणे अशा काही वाईट गोष्टी समाजाला घातक आहेत. सरकारी मालमत्तेची मोडतोड करणे, चोरी करणे, अनोळखी माणसांना फसविणे, परस्त्रीवर बलात्कार करणे, मतदानाच्या वेळी मते बाद करणे अशा विविध वाईट सवयींवर समाजाने प्रबोधन केले पाहिजे. किंवा विविध कार्यक्रमात भाग घेऊन सांगू शकतात. सामाजिक, राजकीय, धार्मिक कामे करणारे देखील अशा गोष्टींविषयी प्रबोधन करु शकतात.

माणसांना विविध आजार उद्भवतात. काही भोळी माणसे वैद्यकीय उपचार न घेता भगत, बुवांकडे जातात. काही गरिबीमुळे उपचारासाठी जात नाही. अशा वेळी रुग्ण दगावतो. त्यांना वैद्यकीय उपचाराचे महत्त्व पटवून दिशा दाखविली पाहिजे. आर्थिक मदत केली पाहिजे. अंधश्रद्धेमुळे होणारे परिणाम समजून दिले पाहिजेत.

काही गरीब मुले हुशार असतात. त्यांना पुढचे शिक्षण घेण्यासाठी आर्थिक व राजकीय अडचणी निर्माण होतात. अशा अडचणी सोडविली पाहिजेत. समाजाने मदत केली तर अशी हुशार मुले शिकून पुढे जातील.

एखाद्या गरीब कुटुंबात मृत्यू झाला, किंवा अचानक संकट निर्माण झाले, बाहेरगावाहून एखादे कुटुंब व्यवसायासाठी आले आणि त्या कुटुंबात मृत्यू झाला, अशा वेळी मदत केली पाहिजे. अशा संकटांना तोंड देण्यासाठी समाजाने बचतगट किंवा पतपेढी योजना स्थापन केली पाहिजे. बचतीमुळे अडीअडचणींना उपयोगी पडेल, आणि समाज कर्जबाजारी होणार नाही.

मदत - पूर्वी घरे बांधणे, ज्यांची शेती जास्त असेल त्याला नांगरुण देणे, बैल नसेल त्याला बैल देणे, अशा विविध कामांना अडलेल्या व्यक्तीला मदत करीत होते. त्याला लाह्या (मदत) म्हणतात. ही प्रथा फारच चांगली

होती. सध्या धावत्या काळात माणसे पैशाच्या लोभाने मजुरीशिवाय कामे करीत नाहीत. त्यामुळे समाजात विकासकामावर परिणाम झालेला दिसतो. समाजाने समाजप्रथेनुसार मदत केली पाहिजे.

सध्या प्रत्येक गावात एकतरी शिक्षित व्यक्ती असते. त्यांनी आपआपल्या गावात, पाड्यात वेळ काढून अंगणवाड्या, बालवाडी वर्ग, प्रौढवर्ग स्वयंसेवेने चालवायचा पाहिजे. म्हणजेच साक्षरता निर्माण करता येईल. तसेच रोजच्या रेडिओ बातम्या सांगितल्या, वर्तमानपत्रातील घडामोडी वाचून दाखविल्या तर समाजाला बाहेरील वार्ता कळू शकेल. विविध कथावाचन, शेतीविषयी, आरोग्यविषयी, जंगल संरक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धा निर्मूलन असे विविध उपक्रम हाती घेऊन प्रबोधन केले पाहिजे. यामुळे समाज जागृत होईल. हे एक सामाजिक कार्य आहे. अशा कामाला मेहनताण्याची अपेक्षा करु नये. ही एक ईश्वरसेवा आहे. अशा मार्गाने समाजाचा विकास होऊ शकतो.

बरेच लोक सावकारी कर्जात अडकतात. त्याला दुपटीने रक्कम मोजावी लागते. तसेच आपल्याकडील दागिने सावकार, सोनाराकडे ठेवले जातात. जे व्याज असते ते किंमतीपेक्षाही जास्त असते. यातही समाज फसतो. सरळ मोड केली तर तेवढा पैसा वाचतो. यासाठी आपण योग्य मार्ग शोधून काढला पाहिजे.

प्रत्येक गावात, पाड्यात, महिला व पुरुष बचत गट योजना चालू केल्या पाहिजेत. कोणत्याही अडचणीला त्या पैशांचा उपयोग करता येईल. एखादा आजारी पडला, मृत्यू झाला, लग्न, शेतीकामासाठी, व्यवसायासाठी कमी व्याजदराने आपल्याच रकमेवर मिळू शकेल. त्यामुळे तो कर्जाला बळी पडणार नाही. सध्या बचत गट योजना काही भागात चालू आहे. ही योजना प्रत्येक गावात चालू केली पाहिजे.

धान्यकोष योजना - दुष्काळकाळी, भूकंप, पूरग्रस्तांसाठी धान्यकोष योजना उपयोगी पडेल. पावसाळ्यात बऱ्याच लोकांचे धान्य संपलेले असते. धान्यासाठी शेतीकामे सोडून वणवण भटकत फिरावे लागते. कर्ज काढावे लागते. तसेच महामंडळात, सोसायटीत दहापंधरा दिवस फिरावे लागते. त्याऐवजी पुढचा हंगाम येईपावेतो ते धान्यकोष योजनेतून धान्य काढू शकतात. अशी योजना प्रत्येक भागात राबविली तर समाजाला सोयीचे होईल. आणि हे केलेच पाहिजे.

काही आदिवासी जमातीत श्रीमंती दाखवितात. स्वत: गरीब असोत वा श्रीमंत असोत, समाजात प्रतिष्ठा मिळविण्यासाठी लग्नसमारंभात वा इतर उत्सवात वाटेल तसा पैसा खर्च करीत असतात. शेवटी ते कर्जबाजारी होतात. असे फालतू खर्च करण्यापेक्षा समाजाला दान दिले पाहिजे. किंवा योग्य कामासाठी खर्च केला पाहिजे.

बालमजुरी- बालक हा नाजूक अवयवाचा असतो. त्यांचे दिवस खेळण्याचे असतात. त्यांना वाढीसाठी पौष्टीक आहाराची गरज असते. ६ ते १४ वयोगटात असलेल्या बालकांचे शिक्षणाचे दिवस असतात.

काही गरीब कुटुंबातील बालक आईवडिलांबरोबर मजुरीसाठी परप्रांतात भटकत फिरत असतात. मजुरी मिळावी की बालक देखील दिवसभर ओझे वाहण्याची कामे करतो. वरुन अर्धी मजुरी दिली जाते. काही बालक सालदारकी करतात. काही हॉटेलात व काही इतर कामातही भाग घेतात. या कष्टाच्या कामांमुळे वाढ खुंटते. कमतरतेमुळे विविध आजार निर्माण होतात. तसेच त्यांचे शिक्षणाचे आयुष्य वाया जाते. अशा बालकांसाठी पाळणाघर, साखरशाळा,

फिरती शाळा, प्रेरणाशाळा काढल्या आहेत. पण त्या प्रत्यक्षात राबविल्या जात नाहीत. अशा बालकांसाठी आश्रमशाळा काढून त्यांना शिक्षण दिले पाहिजे. त्यांचा बौद्धिक, शैक्षणिक विकास होईल. तसेच अशा कुटुंबांना परप्रांतात जाऊ न देता स्थानिक भागात रोजगार मिळवून दिला पाहिजे.

अपंग - अपंग बालक जन्माला आला की त्याला चांगली वागणूक दिली जात नाही. त्याच्याकडे सर्वच गोष्टीत दुर्लक्ष केले जाते. त्याचे जीवन जगणे कठीण होते. शेवटी तो भीक मागत फिरतो. त्याचे आयुष्य वाया जाते. त्यांच्यासाठी शासनाने शाळा काढलेल्या आहेत. त्याविषयी अशा बालकांच्या कुटुंबांना मार्गदर्शन केले पाहिजे. त्यांना शिकविले पाहिजे. शिकल्यानंतर तो समाजात वावरेल व लहानमोठा व्यवसाय करु शकेल. उदा. शिवणकाम, हस्तकला, डिझाईन भरणे अशा विविध कामात सहभागी होईल. तो स्वत:चा प्रश्न सोडवू शकेल.

बालविवाह- काही आदिवासी जमातीमध्ये बालविवाहाचे प्रमाण जास्त आढळते. बालविवाहामुळे मुला-मुलीचे आयुष्य कमी होते. त्यांच्या बालकांना आईचे दूध पुरेसे मिळत नाही. बालकांची वाढ खुंटते. मंदबुद्धी, मानसिक, शारीरिक व्यंग, आर्थिक ओढाताण, कुपोषणाचे प्रमाण वाढते. बालमृत्यू, विविध आजार उद्भवतात. योग्य वयातच विवाह केला पाहिजे. तसेच एका मुलामागे योग्य अंतर ठेवले पाहिजे. अंतर ठेवले नाही तर योग्य आहार मिळत नाही. कुटुंबाची संख्या वाढते. जीवनात विविध अडचण्या निर्माण होतात.

पूर्वी जंगल जमीन भरपूर होती. कितीही संख्या वाढली तरी त्यांना आसरा मिळत होता. सध्या या काळात लोकसंख्यावाढीचे परिणाम वाईट होतात. जमीन नाही, जंगल नाही, घरे नाहीत. आर्थिक बाबींवर फार मोठा ताण पडतो. एका वेळेच्या जेवणासाठी धावपळ करावी लागते. पूर्वी कुटुंबनियोजनाची सुविधा नव्हती. अंधश्रद्धा होती. सध्याच्या काळी कुटुंब लांबविणे व बंद करणे यावर विविध यंत्र तयार केलेली आहेत. त्यामुळे कुटुंबसंख्या जास्त वाढविण्यापेक्षा एक, दोनवरच आवरुन घेतले पाहिजे. म्हणजेच कुटुंब लहान सुख महान, आपले जीवन व मुलांचे भविष्य चांगले जाईल.

व्यसन- या समाजात सुख-दु:खात, सणउत्सवात, पूजाविधीप्रसंगी मोठ्या प्रमाणात दारुचे सेवन केले जाते. वापरापेक्षा नुकसान अधिक दिसून येते. या दूरदृष्टीने पाहता सर्व समस्यांचे मूळ देखील हेच दिसून येईल. कुटुंबात, गावात भांडणतंटे होतात; व्यक्तीचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, नैतिक स्वास्थ्य दारुमुळे नष्ट होते. दारु, त्याचबरोबर विड्या, तपकीर, तंबाखू, गुटका अशा वाईट सवयींमुळे येणाऱ्या बालकावर देखील परिणाम होतो. आईवडील, गुरुजी जशी कृती करतील तशी कृती मुलेही करतात. पालकांनी किंवा गुरुजींनी सट्टा लावण्यासाठी चिठ्ठया पाठविल्या तर तो बालक सुद्धा एक रुपया लावेल, लागला तर माझाही फायदा होईल असे त्याला वाटेल. बालकाला विडी पेटवायला पाठविले तर तो पेटविण्यासाठी अगोदर विडी ओढेल. नंतर त्यांना देईल. दारु आणायला पाठविले तर बालक कडक आहे की नरम आहे असे चाखून पाहिल. मुलांना आपण जसे घडविले तसा त्यांचे वळण निर्माण होईल. अशा वाईट सवयी बालकांपासून दूर ठेवल्या पाहिजेत.

भेटीवर मर्यादा हवी- समाजात भेटीची प्रथा पूर्वीपासूनच प्रतिष्ठेची केली गेली आहे. भेटीमुळे समाजात खर्चाला आधार होतो. पण सध्या त्याची स्पर्धा

झालेली आढळते. किती भेट आली व सर्वाधिक कोणी केली, यावरुन प्रतिष्ठा मोजण्यात येते. समाजात सर्वाधिक असणारा व बहुसंख्य असणारा वर्ग, ज्यास दोन वेळेचे जेवण मिळविणे अवघड जाते, त्याचा फारसा विचार कोणी करताना दिसून येत नाही. सधन शेतकरी, सामान्य शेतकरी यांच्याबरोबर काबाडकष्ट करणारे मजूर, सालदार इ. ची ओढाताण होत असते. समाजाने मर्यादित एकच आकडा ठेवून भेट प्रथा ठेवणे आवश्यक आहे.

अंत्यविधी - अंत्यविधी करताना बराच वेळ गमावला जातो. त्या ठिकाणी वेळेचा सदुपयोग व्हावा. पूर्वीपासून चालत आलेल्या प्रथेप्रमाणे गावागावाचा पुकारा, नातेवाईक (वोढाय) इ. समयी बराच वेळ जात असतो. कडक उन्हात किंवा पावसाळ्यात सभोवताली झाडे नसताना तहानभूक विसरून जनसमूह आलेला असतो. काही लांबून आलेले असतात. त्यांना परतायचे असते. तसेच या ठिकाणी पैसे, भांडी वाटायची प्रथा पडलेली आहे. पैसे, भांडी बंद करणे गरजेचे आहे. इकडे घरात दुःख, पैसे भांडी खरीदीसाठी पैसा कुठून येईल? आलेला जनसमूह मदत देतो ते योग्य असते.

झाडे- दिवसेंदिवस जंगल झाडे कमी होत आहेत. फळे देणारी झाडे आंबा, महू यांची तोड होते. वाजवीपेक्षा जास्त लाकडे वापरली जातात. तिथे मर्यादित लाकडांचा वापर केला पाहिजे. एक झाड तोडले तर आपण परत झाडे लावतो का? एक तोडले की त्या जागी नवीन झाडे लावली पाहिजेत. झाड हे प्रत्येक माणसाला लागणारे आहे अशी जाणीव ठेवावी.

श्रद्धा- प्रत्येक समाजात श्रद्धा आढळतात. रुढी परंपरादेखील श्रद्धेवर आधारीत असतात. काही श्रद्धा अशा असतात की त्यात आपल्या जीवास देखील मुकावे लागते. भगत बुवावर विश्वास ठेवला जातो. काही वेळा धनाच्या लोभाने बालकांचा बळी दिला जातो. हे सत्य आहे. विज्ञान कुठपर्यंत पोहोचले आहे आणि आपण कुठे आहोत!

चेटकिणी (डाकण)-चेटकिणीचे नाव घेताच समाज थरथरु लागतो. चेटकिणी कोण ठरवतो ? आपण ज्यांच्यावर विश्वास ठेवतो ते ढोंगी व फसवे भगत, बोडवेच असतात. कोणताही व्यक्ती आजारी पडला वा मृत्यू झाला की आपण बोडव्याकडे धाव घालतो. तो एखाद्या गरीब स्त्रीला डाकण काढतो. त्यावर विश्वास ठेवून आपण त्या स्त्रीवर तुटून पडतो. त्या स्त्रीला घरातून हाकलून काढतात. विविध मार्गाने त्रास देतात. काही वेळेस तिची हत्या केली जाते असेही होते. अशा स्त्रियांचे जीवन विस्कळीत होते. अशा वेळी समाज सुद्धा सहकार्य करीत नाही. हा फार मोठा अन्याय स्त्रियांवर होत असतो.

तसेच भुताखेतांवरही श्रद्धा असते. घुबड ओरडणे, मांजर आडवे होणे, भुताने झपाटले असे म्हणणे अशा काही श्रद्धा समाजात आढळतात. अशा विविध श्रद्धेवर विश्वास ठेवू नये. समाजाने या समजुती नष्ट केल्या पाहिजेत. शिक्षित लोकांनी योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

रोग- समाजात बरेच असे रोग उद्‌भवतात जे नष्ट होत नाहीत. सिकलसेल ॲनिमियासारखे रोग समाजात पसरत असतात. असे बळी घेणारे रोग पसरु नयेत म्हणून समाजघटकांना सहकार्य केले पाहिजे. जसे-डॉ. काटे, पुणे व डॉ. ज्योतिष पटेल, गुजरात यांनी स्वयंसेवी संस्था स्थापन करुन विविध मागासलेल्या भागात फिरुन ते संशोधन करीत आहेत व त्यावर उपचार करीत असतात. अशा असाध्य रोगाला नष्ट करण्यासाठी सर्वांनी सहभाग देणे आवश्यक आहे.

विकास - सपाटी भागात एकत्रित वस्ती असते. अशा

गावात शासनाने काही प्रमाणात सुविधा केलेली आढळते आणि डोंगराळ भागात पाड्या पाड्याने विरळ वस्ती असते. अशा गावांत बालवाड्या, शाळा, वीज, पाणी अशा विविध योजना राबविता येत नाहीत. तर विकास कसा होईल? त्यांना योग्य जागी एकत्रित वस्ती करुन विकासाची वाट दाखविली पाहिजे.

विविध आदिवासी भागांत लहान मोठी धरणे बांधली जात आहेत. यात समाजजीवन विस्कळीत होते. जीवनासाठी आसरा राहत नाही. नर्मदा धरणग्रस्तांसाठी मेधा पाटकरांनी फार मोठे काम हाती घेऊन समाजाला न्याय मिळवून दिला. विस्थापितांना पुन्हा स्थान मिळवून दिले. तरीही काही राहिलेच आहेत. एवढे प्रयत्न करुनसुद्धा शासन दुर्लक्ष करीत असते. अशी कामे एकट्या माणसाकडून होत नाहीत, तर समाजानेही भाग घेऊन सहकार्य केले पाहिजे. चळवळ केली पाहिजे. तेव्हाच समाजाच्या समस्या सुटू शकतील.

वनजमीन-वनजमिनीच्या मालकी हक्कापासून हा आदिवासी समाज आजही वंचित आहे. जमीन नावावर नसल्यामुळे शासनाची एक पैशाचीही योजना इथे पोहचत नाही. वनखात्याच्या जागेवर वसलेले आहेत म्हणून त्यांचा विकास करता येत नाही. रस्ता नाही त्यामुळे कोणतेही दळणवळणाचे साधन नाही, तर शाळा, बालवाड्या कशा चालवतील ? जीवनावश्यक वस्तू खरेदीसाठी दुसऱ्या गावात वा शहरात जाण्यासाठी डोक्यावर ओझे घेऊन चार पाच तास पायवाटेने डोंगर चढून जावे लागते. पावसाळ्यात नदीनाल्याला पाणी असल्याने बंद असते. नाल्याजवळ खोदकाम करुन पाणी पिण्यासाठी व जनावरांसाठी वापरले जाते. पायवाट ते स्वतःच तयार करीत असतात. जवळ दवाखाना नाही. आजारी माणसांना झोळी बांधून दवाखान्यात नेतात. एखाद्या वेळी रुग्ण रस्त्यातच बळी पडतो. अशी गावे जर रेव्हेन्यू झाली तर त्यांना सुविधा मिळू शकेल व त्यांचा विकास होईल. शासनाने ही बाब लक्षात घेतली पाहिजे.

धर्म- धर्माच्या नावाने आदिवासी बळी पडत आहे. कोणतेही धर्मवादी आदिवासींनाच पुढे करुन धर्मांतर करीत असतात. आपला धर्म काय व तो कसा आहे. आपले देवदेवता व संस्कृतीशी तो मिळता जुळता आहे काय ? कोणाचा तरी धर्म म्हणून घ्यायचे व बळी जायचे, याचाही खोलवर विचार केला पाहिजे.

हुंडा (देहेज) - हुंडा घेणे आणि देणे ही प्रथा सर्व समाजात आढळते. आदिवासी समाजात वधूमूल्य आहे. मुलीच्या कुटुंबाला ठरलेली रक्कम मोजावी लागते. त्यालाच देहेज म्हणतात. देहेजचा फार मोठा आकडा विविध भागत आढळतो. शेती, घरे, घरातील थोडीफार संपत्ती विकून लग्न करावे लागते. जीवन जगायला आधार राहत नाही. देहेज देखील समाजाला घातक आहे. ते ठराविकच ठेवले पाहिजे.

स्त्री- आदिवासी समाजात स्त्रीला समान दर्जा आहे. ती स्वतंत्र आहे. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून ती कष्टाची कामे करीत असते. आयुष्याचा जोडीदार निवडण्यासाठी तिला स्वातंत्र्य आहे. त्याच्याशी पटले नाही तर तिला त्या पतीपासून वेगळे होण्याचे स्वातंत्र्य आहे. आदिवासी समाजात वधूमूल्य घेतले जाते. या सारख्या वैशिष्यपूर्ण चालीरीतींमुळे आदिवासी स्त्री स्वतंत्र्य आहे.

आजच्या काळात सामान्य जीवन जगणाऱ्या स्त्रीकडे असो किंवा शैक्षणिक क्षेत्रात, सामाजिक वा राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या, वावरणाऱ्या स्त्रियांकडे असो, समाज नेहमी उपेक्षेनेच पाहात असतो. स्त्री स्वातंत्र्य, स्त्री समानता फक्त नोकरी आणि कष्टाच्या कामापुरतीच मर्यादित आहे का? असा प्रश्न निर्माण होतो.

आदिवासी स्त्रीचे हल्लीच्या सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि विविध संघटनेत स्थान काय आहे? या सर्व क्षेत्रात तिचा सहभाग किती असतो? आपण आपल्या समाजाच्या विकासकार्यात तिचे योगदान किती स्वीकारतो? आपण त्यांचा मान ठेवतो का? स्त्रिया सर्वच बाजूने उपेक्षित राहतात. स्त्री जर नोकरी करणारी असली तर ती घर आणि कार्यालय या वर्तुळातून बाहेर पडू इच्छीत नाही. कोणत्याही क्षेत्रात कार्य करु शकणाऱ्या स्त्रीला आपण त्या चळवळीत सामील करुन घेऊ इच्छीत नाही. त्यांना अशा विविध चळवळीत सामील करुन घ्यावे. त्यांना स्थान द्यावे. आपल्या समाजातील या घटकाकडे प्रथम लक्ष देणे आवश्यक आहे. त्यातून एक विकासाची नवी वाट मिळेल.

जंगल (पर्यावरण)-आदिवासी लोकांचे जीवन जंगलाशी-निसर्गाशी एकरुप झालेले आहे. आदिवासी आणि पर्यावरण यांचा दोघांचा एकमेकांशी अविभाज्य संबंध आहे. सर्व काही देणारा वृक्ष हा आदिवासीचा जीव की प्राण. आदिवासी परंपरागत शेती करुन उर्वरीत काळात वनसंपत्तीवर अवलंबून राहून आपली गुजराण करीत असतात. पण आज मोठ्या प्रमाणावर वनविनाश झालेला आहे. याचा परिणाम आदिवासी जमातीवर होत आहे. वनतोडीमुळे जळणारे लाकूड मिळत नाही. चारा, रानटी फळे, कंदमुळे, वनऔषधे नष्ट होत आहेत. वन्य पशुपक्ष्यांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे. जंगलातील आसरा नाही, तसेच वन्य पशूंना खाद्यही मिळत नसल्यामुळे प्राणी नष्ट झालेले आहे. तसेच नवीन रोग पसरु लागलेला आहे. जमिनीची धूप वाढते आहे आणि पाणी साठविण्याची क्षमता कमी झाली आहे. याचाच परिणाम शेती उत्पादनावर होत आहे. घरांसाठी टिकाऊ लाकूड सागासारखे मिळत नाही. डोंगर टेकड्या उघड्यावर पडलेल्या आहेत. आता एकच पर्याय उरलेला आहे. झाडे लावणे व वनसंरक्षण करणे. डोंगर टेकड्या, पडित जमिनीत, शेताच्या बांध्यावर झाडांची लागवड करणे. त्या झाडांवर हक्क देणे व प्रबोधन वर्ग घेणे. आपण सर्वांनी भाग घेतला तर निश्चित वनाची हरियाली होऊ शकेल.

वनऔषध- पूर्वीच्या काळी आदिवासी समाजाने दवाखाना पाहिलेला नव्हता. त्याकाळी वनऔषधी वनस्पती भरपूर होती. विविध आजारांवर वनऔषधी वनस्पतीचा वापर करीत होते. आजही करीत आहे. तसेच त्यांच्या आहारात विविध झाडपाल्याचा वापर होत होता. त्यामुळे रोगावर मात करीत होता. आज झाडपाला मिळत नाही. विविध रोगांना बळी पडत आहे. आज सुधारीत औषध दीर्घकाळ टिकत नाही. दीर्घकाळ टिकणारी वनऔषधी वनस्पती लावण्याची अत्यंत गरज आहे. गावात पन्नास घरे असतात. प्रत्येक घरांना एक औषधी झाड दिले तर पन्नास वनस्पती झाडे तयार होतील. ती आपण आवश्यकतेनुसार वापरु शकतो. अशा पद्धतीने वनस्पती लावली तर ती नष्ट होऊ शकणार नाही.

भाषा- भाषा ही माणसाची ओळख आहे. भारताच्या संविधानामध्ये आठवा परिशिष्ट खास भाषेचा आहे. देशातील असंख्य भाषांपैकी थोड्याच भाषांना त्यात महत्त्व देण्यात आले. परंतु आदिवासी भाषांना आठव्या परिशिष्टात समाविष्ट करण्यात आले नाही. साहित्य आणि शिक्षणक्षेत्रात सुद्धा स्थान नाही. कारण या भाषांना लिपी नाही. मौखिक परंपरेने चालत आलेल्या या सर्व भाषा आणि यामध्ये असलेल्या विशाल सांस्कृतिक, साहित्यिक खजिन्याला वाचविण्याची जरूरी आहे. त्यासाठी भाषा संशोधन केंद्र, बडोदा यांनी आदिवासी भाषेत 'ढोल' नावाचा अंक सुरु केलेला

आहे. त्यात पावरी, देहवाली भिली, कुंकणा, अहिराणी, पंचमहाली भिली, डोंगरी भिली, चौधरी, भांतू, गोर-बंजारा, राठवी अशा दहा भाषेत प्रसिद्ध करण्यात आले आहे. ढोलचे संपादक स्वत: आदिवासीच आहेत. यामध्ये देशातील विविध आदिवासी जमातीतील लोक आपले विचार मांडू शकतील. स्वत:ची सांस्कृतिक परंपरा एकमेकांना कळवू शकतील. ह्या भाषा आणि संस्कृती जगभरात पसरतील व आदिवासी भाषेस लिखाणाचे स्वरुप प्राप्त होईल. त्यासाठी लिहिणे आवश्यक आहे. यातून आदिवासी विकास अभियानाला 'ढोल' माध्यमातून नवी दिशा मिळू शकेल.

न्याय निवाडू-न्याय निवाडू ही प्रथा पूर्वीपासूनच चालत आलेली आहे. भांडण तंटे झाले की पोलिस कार्यालयात जाताच खिसा खाली करावा लागतो. समाजाला न्याय नियमांची माहिती नसते. न्यायदरबारी गेल्यावर खोट्याचे खरे केले जाते व खऱ्याचे खोटे केले जाते. न्यायालय पैशाच्या बळावर चालते तर आदिवासी न्याय निवाड्यात दोघांचे गाऱ्हाणे ऐकून योग्य मार्ग दाखविला जातो. यात जातीभेद नसतो. बिगर पैशाने, लाललुचपतीवर न चालणारी, निर्दोष माणसांना चांगला न्याय देणारी; दोषीला योग्य शिक्षा ठोठावणारी तसेच कोणाच्या दबावात न जाणारी अशी ही न्याय निवाड्याची फारच चांगली प्रथा आहे. समाजाचा वेळ व खर्च वाचतो.

आदिवासीच्या विविध मागासलेल्या भागात डॉ. गणेश देवी यांनी फिरून संशोधन केले. त्यांच्या अडचणी, समस्या पाहून देवीसरांनी स्वयंसेवी संस्था स्थापन केली. समाज कसा स्वावलंबी बनू शकेल यावर विविध योजना चालू केल्या. अनौपचारिक शिक्षण केंद्र, बालवाड्या, हस्तकला, माली-वॉटरबँक, बचत गट, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी कॉम्प्यूटर चालविणे, ग्रंथालये इ. तसेच समाजाच्या विविध समस्या सोडविण्याचे प्रयत्न करीत असतात. अशा प्रकारे महान कार्य हाती घेऊन आदिवासी व मागासलेल्यांचा समाज विकासाच्या वाटेकडे विविध मार्गे कसा पुढे जाईल याकडे बारकाईने पाहत असतात. तसेच आदिवासीची भाषा, विकास, संस्कृतीवरील पुस्तकांचे संशोधन व प्रकाशन कार्यही करीत असतात. आदिवासी व मागासलेल्या समाजासाठी आपल्या भारत देशात हे एक फार मोठ्या कार्य हाती घेतलेले आहे.

असे कार्य प्रत्येक आदिवासी गावागावातून व्हायला हवे. यासाठी आपण आदिवासी माणसांनी पुढे आले पाहिजे. गावागावामध्ये सुशिक्षित तरुण व जाणत्या माणसांनी आपल्या समाजाच्या विकासासाठी कार्यक्रम हाती घेतला पाहिजे. याप्रमाणे काम करण्यासाठी प्रत्येक ग्राम पंचायतीला अधिकार दिलेला आहे. समाज विकास कामासाठी ग्राम पंचायतीतील सरपंच, सदस्य तसेच तालुका पातळीवरील सदस्यांनी सुद्धा समाज विकास कार्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. आपण सर्वांनी समाज विकासासाठी पुढाकार घेतला तर कदाचित समाज कोणत्याही बाबतीत मागे राहणार नाही अशी अशी अपेक्षा आहे.

●●

(साभार : आदिवासी विकासाच्या नव्या दिशा - ३ मधून)

# 'पाऊस' - एक आदिवासी अख्यायिका

विरसिंग पाडवी

आपला देश कृषीप्रधान असून शेतीव्यवसाय हा पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. अशा कृषीप्रधान देशात विविध संस्कृतीचे व जाती जमातीचे लोक राहतात. आपआपल्या श्रद्धा भावनेनुसार पूजाअर्चा करीत असतात. वेळेवर पाऊस पडला नाहीतर आपल्या भावनेनुसार पावसाच्या देवाची पूजा करतात. पाऊस पडण्यासाठी आराधना करतात.

सातपुडा परिसरातील धुळे, नंदूरबार जिल्ह्यांतील आदिवासी बांधवात देखील अनेक पावसासंबंधीत लोककथा सांगितल्या जातात. पावसाचा प्रमुख देव काला मेघ, कालारागा, राणी काजल, गाजण गोटा, विजला राणी, किव्हा थोटी विजल, आभला कुवर, धुवरा कुवर, काकट आभ, मुर आभ सुर आभ, हिरु आधळा विरु पागळा, वाहल्या राणा इत्यादी त्याकथेमधील पात्र असतात.

कथा अशाप्रकारे सांगण्यात येते की एकदा पृथ्वीतलावर १२ वर्षांचा दुष्काळ पडला होता. कारण की पावसाचा देव काळा मेघ झोपला होता. त्याला बारा वर्षांची गाढ झोप लागली होती. तर पृथ्वी तलावर राणी काजल पावसाची देवी अवतरुन बारा वर्षाची झाली होती. तिला पृथ्वीवरील दुष्काळी परिस्थिती पाहवली जात नव्हती. जिकडे तिकडे हाहाकार माजला होता. नदी नाले तलाव विहिरी आटून पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. प्राणी जीव जंतू पाण्यावाचून तडफडून मरत होते. जमीन मोठ मोठाले भेगा पडून फाटून गेली होती. झाडे, झुडपे, वनस्पती वाळून मरुन चालल्या होत्या. अशावेळी राणीकाजला माता, रावकागळी म्हणजे कावळी मार्फत संदेश पाठवला होता. काळा मेघ एका झाडाखाली सावलीत बारा वर्षांची गाड झोप घेत झोपला होता. तेथे जाऊन राव कागळीने कावळीने कॉव कॉव करुन आवाज करुन संदेश दिला. काळा मेघाच्या कानात आवाज गेल्याबरोबर झोपेतून खडबडून जागा झाला. घडलेला प्रकार त्याच्या लक्षात आला.

काळा मेघ झोपेतून उठल्याबरोबर पृथ्वी तलावर वातावरणा मध्ये लगेच फरक पडू लागला होता. आभला कुवरने आपल्या कामाला सुरुवात केली होती. आभ म्हणजे आकाश, आभाळ आकाशात धुंवाधार वातावरण पसरुन दिले होते. ढगाळ वातावरणामुळे बाष्पी भवनात फरक पडू लागला होता. आभला कुवर नंतर वातावरणात फरक पडत पडत कांकड आभ आभाळात वाढून वातावरणात थंडावा पसरु लागला, आणि जंगलातील डुक्कर वेळ आणि काकड झाडाला कोंभ फुटून वनस्पतींना पालवी फुटू लागली होती त्यानंतर काही दिवसांनी अंतराने धुवरा कुवरने आभाळात धुंवाधार धुवा निर्माण करुन आकाशात मोठ मोठाले ढग गोळा होऊ लागले होते. ढग एकमेकांना टकरावून आवाज करु लागले होते. तो आवाज करणारा देव म्हणजे गाजन गोठा. हातपाय डोके नसणारा गोटा सारखा तो गाजन गोटा ढगांमध्ये गळ बळतो, म्हणून मोठ मोठाले आवाज होतात व आवाज निर्माण करतो, तो गाजन गोटा. तसेच विजला राणी, किव्हा थोटी विजला ही देखील हातपाय नसल्याने तिचे नावच थोटी विजला असे आहे. गाजन गोटा गळबळतो आवाज करतो तेव्हा हिला देखील हातपाय नसल्याने ढगांवरुन

सटकून जमिनीवर पडते, प्रकाश निर्माण करते, चमकते, चकाकते ती थोटी विजला असे संबोधले आहे. ह्या सर्वांना काला मेघ आदेश देतो. ढगांना दर्यावरुन पाऊस पाणी आणण्याचे आदेश देत असल्याने ते दर्यावरुन पाणी आणताना दर्याचे राखनदार हिरू आधळा व विरू पागळा हे पाणी घेऊ देत नाहीत. विरू पागळा सांगेल त्या दिशेने हिरु पागळा गोफणीचे दगड मारुन ढगांना पाणी घेऊ देत नाही. परंतु त्यांना न जुमानता ढग दर्यावरुन पाणी घेऊन जात असतात. ते पाणी मात्र पावसाच्या रुपाने ढगातून अर्धे समुद्रात, थोडे फार जमिनीच्या काठावर मुसळधार पाऊस पडून संपून जात असे. कारण ढगांना दूर पाणी वाहून नेता येत नव्हते. तेव्हा ही बाब काळा मेघाच्या लक्षात आल्यावर वाहल्या राणा म्हणजे वारा ह्यांच्या बरोबर आभला कुवर, धुवरा कुवर काकड आभ, मुर आभ, सुर आभ, ह्याचे लग्न लावून देत असतो. तेव्हा वारा त्यांना दूर दूर जमिनीवर ढगांना वाहून नेत असतो. पाऊस सरी सरीने पडण्यासाठी मुर आभ व सुर आभ ह्याची मदत होते. मुर आभ थोडे थोडे झीम झीम पाऊस पाडते; तर सूर आभ सरीच्या सरी जोरात पाऊस पाडते. अशा प्रकारे बारा वर्षानंतर पृथ्वीतलावर पाऊस पडायला सुरुवात होत असते. तो पृथ्वीवर सर्व पशु-पक्षी प्राण्यांना फार मोठा आनंद होते. खादीराज म्हणजे बैल (धाड्या) आनंदात येऊन उड्या मारत फिरतो. आपली शिंगे जमिनीत खूपसून माती शिंगाना लावून पळत असतो. कारण पाऊस पडल्यावर मातीला एक वेगळ्या पद्धतीचा सुगंधित वास येत असतो. त्या वासाने बैलाला जास्तच उत्साह आलेला असतो. तेव्हा राजा पानठा, गांडा ठाकूर देवांना विचार पडतो की याला आता कशाप्रकारे आवर घालायचा म्हणून बैलाला पकडून त्याच्या नाकात वेसन (नाथ) टोचून शेतीच्या कामासाठी (काकाकुनबी) शेतकऱ्याला सोपले. शेतकऱ्याला शेती कामाला लावले शेतीसाठी अन्न धान्याची बी-बियाणाची आवश्यकता होती तेव्हा राजा पानठा गाडा ठाकूर देवाने मुगीकडे गेले. बी-बियाणाची मागणी घातली. मुंगीने आपल्या बिळात साठवलेली विविध अन्न धान्याचे बी शेतकऱ्याला काढून दिले, तेव्हा पासून शेतकरी आपल्या शेतीच्या कामाला लागला व औतासाठी बैल वापरु लागला आहे. अशाप्रकारे अख्यायिका सांगण्यात येत असते.

पाऊस पडून पावसाळा सुरुवात झाल्यावर पावसाळ्याच्या डबक्यात रात्रीच्या वेळी फार मोठ्या प्रमाणात बेडके ओरडत असतात पावसाळा सुरु झाल्याबरोबर दिसायला लागतात. त्यात मोठी बेडके पिवळ्या रंगाची, जशी हळद लावल्या सारखी दिसतात. ती राणीकाजल व काळा मेघाच्या लग्नाच्या गीत गाणारी आहेत. पावसाळ्याची सुरुवात म्हणजे काळामेघाचे लग्नाला सुरुवात या अर्थाने बेडके ओरडतात म्हणजे निसर्ग लग्नाची गीते गात असतात, अशी समज आहे. तेव्हा ज्या वेळेस दुष्काळ पडण्याचा संभव असतो. पाऊस पडत नसतो तेव्हा आदिवासी बांधव राणी काजल मातेची पूजा करतात. राणी काजल मातेचे ठिकाण गावाच्याबाहेर गावपांढरीत, शिवारात कुठे तरी झाडा झुडपात ठरलेल्या दिवशी आदिवासी बांधव कोंबडे बकरे घेऊन पाऊस पडावा म्हणून आराधना करायला जातात, एकप्रकारे त्याच्या लग्नाला जातात तेव्हा गीते गात एकमेकांवर पाणी ओतून ओलेचिंब भिजून घरोघरी पाणी मागत राणीकाजलच्या देवस्थानाच्या ठिकाणी जात असतात. तेव्हा खालील पैकी गीते मुली व महिला गातात.

१) गाजेन गोटो गाजेवा हारु पाढूरी
थोटी विजेल विजलेवा हारू पाढूरी
काल्या मेघ्या वोराडया आल्यावा हारू पाढरी
काल्या मेघ्या गीथाऱ्या आल्या वा हारू पाढूरी

गीताचा भावार्थ

गाजन गोटा गर्जत आहे, थोटी विजला चमकत आहे, त्याच्या लग्नाला आम्ही आलो आहोत.त्याची गीते आम्ही गात आहोत.

---

२) माहरी माहरी आवेरा काल्या मेघेरा
हाल्याभी हुकाय गीयारा काल्या मेघेरा
तोपती बेटूमे दोब्योरा काल्या मेघेरा
पोयरे सावरे रोडेरा काल्या मेघेरा

गीताचा भावार्थ

पावसा तू लवकर लवकर ये, पड भात सुकून चालला आहे तेव्हा तू तापी नदीच्या बेटात लपून बसला आहे काय? आमची पोरे सोरे रडता आहेत इ.

---

३) तीली ओतो वादलो रा वेऱ्या
बादो जुगे वेऱ्योरा वेऱ्या
पायभी नाहा पोडतोरा वेऱ्या
देश नीगी जाहूरा वेऱ्या
गाती हिदो बादूरा वेऱ्या
देशे नीगी जाहूरा वेऱ्या

गीताचा भावार्थ

तिळच्या दान्या एवढे आकाशात ढग येऊन ते सर्व व्यापून गेले आहे, तरी पाऊस पडत नाही तेव्हा पोट भरण्यासाठी दुसऱ्या देशात निघून जाऊ या.
पाठीवर बिढार व शिदा आटा घेऊन आपण सर्व पोट भरण्यासाठी दुसरीकडे निघून जाऊया इत्यादी.

---

या गाण्यात भावार्थ असून अशा प्रकारे राणीकाजलची पाऊस पडावे म्हणून पूजा करण्यासाठी अशाप्रकारे आदिवासी बाया गीते गात जातात तर लहान लहान मुले घोषणा देत जाता व ' गाजन गोटो देव चिडो २ तोप्योरा तोप्यो देव चिडो' अशाप्रकारे पाऊस पडावा म्हणून सर्व गावातील लहान मोठे सर्व राणीकाजलच्या पूजेसाठी जात असतात. आदिवासींमध्ये पावसासंबंधी अनेक कथा सांगितल्या जातात. त्यातील एक कथेचा सारांश दिलेला आहे. ह्या कथेचा व गीताचा उपयोग पाऊस पडावा म्हणून पूजच्या वेळी याचा उल्लेख करुन पुजारी पूजा करीत असतात. त्या संबंधित थोडक्यात लेख.

●●

# आदिवासी संस्कृती आणि समाजकार्य

डॉ. शैलजा देवगांवकर

संस्कृती (Culture) हा शब्द आपण अनेकदा वापरतो. वास्तविक मुळात संस्कृती म्हणजे एक कल्पनागम्य आकृतीबंध असून केवळ जीवन जगण्यासाठी नाही तर मरण्यासाठीही माणूस तिचा आधार घेतो. टायलरने केलेली संस्कृतीची व्याख्या मान्यताप्राप्त आहे. त्याच्यामते संस्कृती म्हणजे एक गुंतागुंतीची कल्पना असून तिच्यात ज्ञान, विश्वास किंवा श्रद्धा, नैतिकता, रुढी आणि कायदा व इतर पात्रतांचा (ज्या पात्रता मनुष्य समाजाचा घटक म्हणून प्राप्त करतो) समावेश होतो. (Culture is that complex whole which includes knowledge, belief, art, morals, law, custom and other capabilities acquired by man as a member of society) गुस्ताव क्लेम ह्याने केलेल्या आधुनिक व्याख्येनुसार संस्कृती मध्ये रुढी, माहिती, कौशल्ये, शांततेच्या आणि युद्धाच्या काळातील जीवन, धर्म, विज्ञान आणि कला अंतर्भूत होत असून नवीन पिढीला मिळणाऱ्या जुन्या अनुभवांच्या वारशातून ती प्रगट होते. संस्कृती हा एक वारसा असला तरी तो समाजातून मिळणारा आहे, केवळ जन्मातून नाही. एका पिढीने दुसऱ्या पिढीला हस्तांतरित केलेला तो वारसा असतो आणि एका ऐतिहासिक प्रक्रियेने चालत येतो. संस्कृतीच्या हस्तांतरणात भाषा हे महत्त्वाचे साधन आहे.

कोणत्याही जनसमूहाच्या संस्कृतीत स्थूलमानाने भौतिक संस्कृती आणि अध्यात्मिक किंवा अभौतिक संस्कृती असे दोन भाग करता येतील. वेशभूषा, अवजारे, वापरातील विविध वस्तू, वाहने, घरांच्या पद्धती, दागिने, भांडे इत्यादींचा समावेश भौतिक संस्कृतीत होतो, तर देवदेवता, श्रद्धा आणि समज, नैतिक कल्पना, चालीरीती, समाजव्यवस्थेचे आधार उदा- कुल, गोत्र इत्यादींचे नियम, वागणुकीचे निषेध इत्यादी, धर्मविधी, जादू आणि मंत्र तंत्र आदिंचा समावेश अभौतिक संस्कृतीने करता येतो. काही वेळा अभौतिक संस्कृतीची भौतिक संस्कृतीतील प्रतिकेही आदिवासी समाजामधे आढळतात. उदा. कुलचिन्ह (Totem), देवतांची प्रतिके, मृतांची स्मारके, गोंदण इत्यादी.

कोणत्याही जमातीच्या लोकवाङ्‌मयात त्यांच्या परंपरागत संस्कृतीचे प्रतिबिंब व चित्र प्रगट होते. त्याचप्रमाणे होत जाणारी परिवर्तनेही त्यात प्रवेश करतात. आदिवासींच्या नृत्य-गीतांचा अभ्यास केल्यास हे दिसून येते. सामान्यत: आपल्या संस्कृतीची जपणूक करणे आणि तिच्यात बदल होऊ न देणे अशी स्वकेंद्रवादी (Ethnocentric) प्रवृत्ती आदिम जनसमूहात असते. परंतु त्याबरोबरच सभोवतालच्या भिन्न आणि प्रभावी संस्कृतीच्या आकर्षणामुळे तिच्यातील काही गोष्टी स्वीकारण्याची प्रक्रियाही सुरु असते. यालाच सांस्कृतीकरण (Acculturation) म्हणतात. जास्त विकसित आणि प्रभावी गटांशी संबंध आल्यास ही गोष्ट जास्त वेगाने होते आणि त्यामुळेच विविध आदिवासी गटांच्या सांस्कृतीकरणाचा स्तर भिन्न भिन्न दिसतो. उदा.- माडिया आणि कोरकू . माडिया जमातीचा सांस्कृतीकरणाचा स्तर कमी आहे म्हणून तिला अतिमागास (Primitive) म्हणतात. या तुलनेत कोरकू सांस्कृतीकरणाच्या वरिष्ठ स्तराला पोहोचलेली आहेत. एकाच जमातीतील दुर्गम विभागात राहणाऱ्या आणि आधुनिक जगाशी संपर्क येणाऱ्या गटांमधेही

फरक आढळून येतो. म्हणून ज्या जमातींमधे कार्य करायचे आहे, त्यांच्या संस्कृतीची व सांस्कृतीकरणाच्या स्तराची ओळख करुन घेणे आवश्यक ठरते.

## सांस्कृतिक संदर्भ आणि समाजकार्य

सामाजिक संशोधन तसेच समाजसेवा करण्यासाठी जाणाऱ्या कार्यकर्त्यांला जे क्षेत्र कार्य (Field-work) करावे लागते ते करीत असताना ज्या लोकांमध्ये जाऊन आपण कार्य करणार आहोत, त्यांच्या संस्कृतीचा संदर्भ लक्षात ठेवणे आवश्यक असते. विस्तार कार्यात आपण त्यांना विविध उपयुक्त सेवा पुरवितो आणि त्यांचे प्रश्न (समस्या) सोडविण्यास मदत करतो, प्रबोधनही करतो, संशोधन कार्य करुन माहिती गोळा करतो. एका बाजूने त्यांनी आपल्या कल्पना-सेवा स्वीकाराव्या आणि दुसऱ्या बाजूने त्यांनी आपली माहिती आपणास द्यावी अशी आपली अपेक्षा असते. कार्य करणाऱ्या व्यक्तीबद्दल त्यांच्या मनात विश्वास निर्माण झाला व त्यांनी मनापासून त्या व्यक्तीला स्वीकारले तरच वरील दोन्ही गोष्टी होऊ शकतात यासाठी कार्यकर्त्याने किंवा संशोधकाने त्यांच्या सांस्कृतिक कल्पनांना ठेच पोहोचणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. यासाठी प्रथम त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास कोणतीही पूर्वग्रहदूषित दृष्टी न ठेवता करणे आवश्यक ठरते. अनेकदा जी गोष्ट बदलण्यासाठी आपण जातो, ती त्यांच्या परंपरागत श्रद्धेची बाब ठरते. उदा. दारूचा वापर. धार्मिक कार्यक्रमाला दारु आवश्यक आहे. तेव्हा या गोष्टींबर एकदम टीका किंवा हल्ला करुन चालणार नाही तर प्रथम नवीन माहिती देऊन त्यांनाच विचार करायला लावणे आणि ज्यांनी हा बदल स्वीकारला आहे त्यांच्या द्वारा जाणीव जागृती करता येईल. उदा. महाराजांची दारुबंदीबद्दलची भूमिका आणि गडचिरोली जिल्हयातील स्त्रियांचे दारुबंदीचे आंदोलन.

अंधश्रद्धांच्या बाबतीतही असे दिसून येते की, आधुनिक औषधोपचारांचा उपयोग न करता देवदेवतांची पूजा, जादू यांचा उपयोग ते करतात. त्यावर एकदम टीका करुन चालणार नाही किंवा ते एकदम थांबविण्याचाही प्रयत्न करणे व्यावहारिक ठरणार नाही. उलट आधुनिक औषधांचा पुरवठा करुन व सातत्याने सेवा देऊन काही रोगी बरे झाल्याची प्रात्यक्षिके बघितली की, जादूटोणासारख्या गोष्टी अनावश्यक आहेत हे पटू शकेल. आधुनिक उपचारांबरोबरच देवतांवरील श्रद्धा टिकून असेल व औषधही घेत असेल तर उलटपक्षी ते उपयुक्तच ठरते. कुष्ठरोगाच्या गोळ्या घेऊन पेशंट जर एखाद्या देवतेची पूजा करीत असेल तर आपल्या तथाकथित आधुनिक समाजापेक्षा ते काही वेगळे नाही. श्रद्धांचा योग्य वापर करुन घेणे हा कार्यकर्त्यांच्या कौशल्याचा भाग आहे. व्यक्तींची इच्छाशक्ती (will power) श्रद्धांमुळे प्रबळ होते हे निश्चितच आहे.

आदिवासींमध्ये स्त्री-पुरुष संबंधाकडे (विवाहपूर्व अवस्थेत) जास्त उदार दृष्टिकोनाने बघितले जाते. माडियांमधे तर घोटुल सारख्या परंपरागत संस्था अगदी आतापावेतो कार्यरत होत्या, कोरकूंमधेही सिडोली किंवा फुलनागनी सारख्या कार्यक्रमांमधे स्त्री-पुरुष फारच मोकळेपणाने एकत्रित येतात. आदिवासींमध्ये वंशवृद्धी आणि जमात टिकून राहणे ही प्राथमिक गरज लक्षात घेऊन या परंपरा निर्माण झाल्या असाव्यात. एड्स सारख्या रोगांबद्दलचे प्रबोधन करताना अशा परंपराबाबत टीका करण्याचा मोह होणे हे स्वाभाविक आहे. परंतु ते जाणीवपूर्वक टाळावयास हवे. उलट रोगांच्या कारणांबद्दल प्रबोधन करुन उदाहरणे दाखवावीत व त्यांनाच स्वत:ला एका विशिष्ट निर्णयाप्रत पोहोचण्याची क्षमता निर्माण करण्यास मार्गदर्शन करावे.

एकदम टीका करु नये ही दक्षता घ्यावी. अशाच प्रकारे माडियांमध्ये दूध न काढणे व न पिणे, माडिया स्त्रियांचा पोशाख, कोरकूंचे स्वत:ला रावणवंशी सांगणे व मेघनाद व रावणाची पूजा करणे इत्यादी चालीरीतींच्या बाबतीतही हे पथ्य पाळावयास हवे.

आपण ज्यांना मागासलेले आणि अशिक्षित समजतो, अशा ग्रामीण तसेच आदिवासी जनसमूहांमधे कार्य करण्यासाठी जात असताना काही शिकण्याची भूमिकाही ठेवणे आवश्यक आहे. आजही त्यांच्या जीवनातील अनेक गोष्टी या आपण शिकावयास हव्यात. उदा. त्यांचे वनौषधींचे ज्ञान, एकूणच निसर्गाबद्दलची माहिती निरीक्षण व तो जोपासण्याची माहिती, प्रामाणिकपणा. या गोष्टी परंपरेने चालत आलेल्या आहेत. सामाजिक क्षेत्रात विवाह ठरवितानाची मुलामुलींना दिली जाणारी साथीदार निवडण्याची मोकळीक (विशेषत: मुलींना), गोत्रबाह्य विवाह, न पटल्यास सहज घटस्फोट घेण्याची पद्धत अशा प्रकारच्या वादावरील पंचायत निर्णयात स्त्रीला महत्त्व या आधुनिक जगात आपण अजून न आणू शकलेल्या गोष्टी आहेत. आदिवासींच्या अन्न शिजविण्याच्या व सेवनाच्या पद्धतीमधेही असे दिसून आले आहे की, केवळ स्वच्छतेच्या दृष्टीने आवश्यक गोष्टी सोडल्यास त्यांची पद्धती पोषक द्रव्यांचे जतन करणारी आहे. अर्थात आधुनिकीकरण आणि विकास कार्यक्रम यामधून ज्या आदिवासी गटांचा विकास झाला आहे त्यांच्यातील हे गुण लोप पावताना दिसतात. त्यांचे हे गुण केवळ जतन करावयास हवे असे नाही तर त्यांचे अनुकरणही झाले पाहिजे. कार्यकर्त्यांनी त्यांच्या जीवनातील परंपरागत माहितीचा, चांगल्या सवयींचा अभ्यास करुन उपयोग करुन घेतला पाहिजे. काही नवीन योजना आणि कल्पनांचे बाबतीत त्यांची अभिमते आजमावून ती संयुक्तिक वाटल्यास त्याची दखल घेतली पाहिजे आणि अशा सर्व गोष्टींचे जतन करण्यास आवर्जून सांगावयास हवे.

सार्वजनिक आरोग्य, रोगप्रतिबंधक उपाय, माता आणि बालक यांचे संरक्षण व पोषण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन इत्यादी गोष्टींच्यासाठी विस्तार कार्य किंवा संशोधन करताना वर उल्लेखित बाबींना कार्याचे तंत्र म्हणून महत्त्व प्राप्त होते. आपल्या समोरील व्यक्तींच्या भावनांचा व अनुभवांचा आणि त्या व्यक्तीला असलेल्या त्यांच्या परंपराबद्दलचा मान राखणे हा विस्तार कार्याचा मंत्र आहे. त्यासाठी त्या व्यक्तीला कमी लेखणे, टीका करणे व आपण फार आधुनिक आहोत हे दाखविणे कार्याच्या दृष्टीने हानिकारक ठरु शकते. म्हणून कार्यकर्त्यांला सहिष्णुता असावी लागते. संयम ठेवावा लागतो. याची अनेक उदाहरणे आपल्याला देता येतील.

समाज कार्यकर्त्याने समाजकार्य करताना याची जाणीव ठेऊन कार्य केल्यास त्या कार्याची फलश्रुती लाभदायी ठरुन अनुभवाच्या आधारावर त्याला स्वत:ला व शासनाला प्रत्यादान मिळेल.

●●

# आरोग्य शिक्षणासाठी विस्तार कार्य आणि दृक श्राव्ये माध्यमे

डॉ. शैलजा देवगांवकर

विस्तार कार्य (**Extension Work**)

कार्यकर्त्याने प्रथम विस्तार कार्य किंवा सेवा म्हणजे काय याची ओळख करुन घेतली पाहिजे. विस्तार सेवेचा अर्थ समाजाला आवश्यक असलेल्या सेवा समाजातील व्यक्तींच्या घरापर्यंत नेऊन पोहचविणे हा होय. यादृष्टीने आरोग्यविषयक माहिती लोकांच्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य स्वयंसेवकाला करावयाचे असल्यास खालील गोष्टी स्वीकारणे व अंगी बाणणे आवश्यक ठरते.

१. माहिती मिळविणे, कौशल्ये प्राप्त करणे आणि योग्य अशा मनोवृत्ती निर्माण करणे, आणि ते सर्व जीवनाच्या प्रत्यक्ष अनुभवामधून मिळविणे.
२. श्रम आणि काम केल्यामुळे मिळणारे समाधान आणि श्रमप्रतिष्ठेची भावना लक्षात घेणे.
३. नेतृत्वाचे गुण आणि पात्रता स्वत:त निर्माण करणे.
४. स्वत:ची जीवन पद्धती आरोग्यदायक ठेवून रिकाम्या वेळात लोकांच्या आरोग्यासाठी कार्य करणे.

थोडक्यात आपल्या डोक्याचा विचारांसाठी, हृदयाचा समाजातील पीडितांच्या सहसंवेदनासाठी, हातांचा सेवेसाठी आणि स्वत:च्या आरोग्याचा सर्वांना निरामय जीवन मिळावे म्हणून सतत उपयोग करीत राहणे हे महत्त्वाचे उद्दिष्ट होय, अमेरिकेतील 4-H clubs (Head, Heart, Hands, Health) मध्ये याच तत्त्वांचा वापर करण्यास आला.

कार्यकर्त्याने शिकताना करावे, Learning to do,
कृती करीत शिकावे, Doing to Learn,
जगण्यासाठी कमवावे, Earning to live,
आणि सेवेसाठी जगावे, Living to Serve,
प्रौढांमध्ये आणि विशेषत: जे मागासलेले आहेत, अशा समूहांमध्ये कार्य करताना जे अनुभव येतात, त्यावरुन खालील सूचना करता येतात.

१. ज्या जनसमुहांमध्ये काम करावयाचे असेल, त्यांच्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा आणि समस्यांचा नीट अभ्यास केला पाहिजे.
२. त्यांच्या श्रद्धा, मूल्ये आणि जीवनपद्धती या बाबत आदराची भावना बाळगली पाहिजे.
३. त्यांच्यातील चांगल्या गोष्टी जाणून घेण्याची, शिकण्याची आणि त्यांच्या अभिमताबद्दल आस्था दर्शविण्याची तयारी असली पाहिजे.
४. त्यांच्या प्रवृत्तींमधे किंवा वागणुकीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांच्या परंपरागत सांस्कृतिक मूल्यांशी कुठेतरी जुळतील अशा बाबींना हात घातला पाहिजे, विशेषत: भौतिक संस्कृतीशी बदल ते लवकर स्वीकारतात.
५. आपल्या वागणुकीने त्यांची मने जिंकून व त्यांचे काही प्रश्न सोडवून त्यांचा विश्वास संपादन केला पाहिजे.
६. त्या लोकांच्या अंगीभूत अशा पात्रता आणि क्षमता ओळखण्यास त्यांना मदत करुन त्यांच्या मनात आत्मविश्वास आणि प्रतिष्ठेची भावना निर्माण केली पाहिजे. (Conscientization).
७. प्रौढांना शिक्षण देत असताना जे त्यांना शिकण्याची गरज वाटेल, त्याच गोष्टी शिकण्यास ते तयार राहतील हे लक्षात घेऊनच कार्यक्रमाची आखणी केली पाहिजे.

केल्याने होत आहे रे ! आधी केलेचि पाहिजे. हे संतवचन विस्तार कार्यात शंभर टक्के खरे ठरले आहे. जगातील अशा कार्याच्या फलश्रुतीत असे दिसून आले आहे की, प्रौढ

वाचल्यापैकी १०%, ऐकल्यापैकी २०% पाहिलेल्यापैकी ३०% , पाहिलेल्या आणि ऐकलेल्यापैकी ५०% स्वत: बोललेल्यापैकी ७०% आणि जे स्वत: म्हटले आणि केले, त्यापैकी ९०% स्मरणात ठेवतात.

ज्या जनसमूहात सेवाकार्य करावयाचे असेल त्यांची भाषा किंवा बोली समजली पाहिजे आणि शक्य झाल्यास कार्यकर्त्यांने वापरली पाहिजे. स्थानिक वयोवृद्ध व्यक्ती किंवा गावातील अन्य सर्वमान्य व्यक्ती, उत्साही युवक यांना हाताशी धरुन कार्य सुरु केले पाहिजे. लहान मुलांचा आणि त्यांच्या मातांचा विश्वास संपादन केल्यास कार्यासाठी वाट लवकर मिळू शकते आणि विशेषत: आरोग्य विषयक जाणीव जागृतीसाठी एका मातेचे मत परिवर्तन केल्यास त्या कुटुंबावर त्याचा इष्ट परिणाम होऊ शकतो.

लोकांचा उत्साह जागृत करण्यासाठी व त्यांना संघटित करण्यासाठी खेळ, नृत्य, संगीत इत्यादींचा उपयोग करुन उत्तम प्रतिसाद मिळवू शकतो. आदिवासी क्षेत्रात ह्याचा चांगला अनुभव आलेला आहे.

## कृती माध्यम

ज्या विविध माध्यमांचा उपयोग करता येतो त्यात कृती माध्यमांचाही उपयोग करावा. यात प्रात्याक्षिके (Demonstration) प्रक्रियेची (Process) तसेच फलिताची (Result) जास्त प्रभावी ठरतात. केलेल्या प्रात्यक्षिकाचे परिणाम ते पाहतात आणि नंतरच त्याचा स्वीकार ते करतात. लसीकरण, रोगांवर औषधोपचार, दृष्टी येण्यासाठी ऑपरेशन, सकस आहार, गोबर-गॅस, डिझेल किंवा ऑईल इंजिनद्वारा शेतीला पाणी पुरवठा, नवीन शेती तंत्रे, ट्यूब वेल्स इ. अनेक गोष्टींच्या बाबतीत मात्र प्रात्याक्षिक अयशस्वी होणार नाही याची काळजी घ्यावी.

अतिमागास भागात अत्याधुनिक गोष्टींचा एकदम वापर करु नये. कारण त्या गोष्टी त्यांना अनाकलनीय असल्यामुळे लोक घाबरुन दूर जातात. अशा गोष्टी कलाकलाने शिरवाव्यात.

## प्रसार माध्यमे

कलामाध्यमांपैकी परंपरागत लोककलांचा वापर भरपूर प्रमाणात करावा उदा. - दंडार, लोकनाट्य, विधीनाट्य, नकला, लावण्या, पोवाडे, भारुडे, भजने तसेच परंपरागत सण आणि उत्सवाचे वेळी घडवून आणलेले सांस्कृतिक कार्यक्रम यांचा प्रभाव परिणामकारक ठरतो. मात्र त्यात स्थानिक लोकांचा सहभाग असावा. त्यांच्यात पुढाकार घेणारा गट/व्यक्ती निर्माण झाल्या की त्यांना पुढे करावे व आपण मागे रहावे. त्यामुळे विकासासाठी नेतृत्व व चळवळ वाढेल. यालाच अप्रत्यक्ष नेतृत्त्व (Indirect Leadership) असे म्हणतात.

दृकश्राव्य साधनांमध्ये आकाशवाणी, दूरदर्शन यावरील निवडक कार्यक्रम लोकांना दाखवावेत; परंतु त्यापेक्षा ध्वनीफीत (Audio-cassette) व चित्रफीत (Video-cassette) यांचा वापर जास्त उपयुक्त ठरतो. कॉलेज मध्ये व्ही.सी.आर. असल्यास दूरदर्शनवरील काही कार्यक्रम, जनहितार्थच्या जाहिराती यांची कॅसेट करुन ती लोकांना दाखवावी. लोकांची भाषणे, कार्यक्रम मुद्रित करुन त्यांना दाखवावेत चित्रपट दाखविल्यास लोक फार आकर्षित होतात; परंतु त्यासाठी निवडक चित्रपट, माहितीपट, यांचाच वापर करावा.

अलिकडे पथनाट्य हा कमी खर्चाचा व प्रभावी प्रचार प्रकार पुढे आला आहे. मात्र त्याचे प्रयोग केवळ स्टेजवर मंडपात म्हणजे नाटकासारखेच होतात. पथनाट्याला प्रत्यक्ष पथावर आणणे जरुरीचे आहे. तसे झाल्यास जनतेला ते फार प्रभावी वाटेल.

शेवटी प्रत्येक कार्यकर्त्याने व संघटनेने आपल्या कार्यक्रमाची गरज, अंदाजपत्रक, वेळ आणि ज्यांच्यामध्ये कार्य करायचे आहे. त्यांची परिस्थिती व कल पाहून माध्यमे निवडावीत आणि विस्तारकार्याची दिशा व पद्धती ठरवावी हे उत्तम. जात्यावर बसले की ओवी आठवते, असे म्हणतात ते याही बाबत खरे आहे. ••

# आदिवासी रंगभूषा-वेशभूषा

कुंडलिक केदारी

रंगभूमीवर आदिवासींचे चित्र अवास्तव अश्लील, किळसवाणे आणि रानटी दाखविले गेले आहे. शालेय संमेलन, पारंपरिक फॅशन शो सारख्या कार्यक्रमात आदिवासींची वेशभूषा कंबरेला झाडपानांची कलकले, गळ्यात रंगीबेरंगी मोठ्या मण्यांच्या माळा, डोक्याला रंगीत रुमाल बांधलेला, हातात उंच काठी किंवा भाला, स्त्रीला लज्जा राखण्या एवढे वस्त्र, गळ्यात काचमण्याच्या माळा, केसात रान-फूल आणि भडक रंगभूषा, पुराणातील राक्षसासारखी प्रतिमा रंगभूमीवरुन दाखविली जात आहे. आधुक रंगभूमी ह्याला अपवाद असू शकते. आदिवासी माणूस हा भोळा-भाबडा, अबोल, शक्यतो बोलण्याचे टाळणारा, प्रामाणिक, पापभिरु, देववादी, परंपरागत जीवन दृष्टीचा. निसर्गाच्या सानिध्यात रमणारा, जीवनाचा स्वच्छंदी आनंद लुटणारा. त्याच्या जीवन प्रवाहाचे वर्णन चार शब्दात करता येते. अन्न, दारु, स्त्री आणि सावकार ह्या चार बाबी सहज सुलभतेने मिळविण्याची त्याची धडपड असते. आदिवासींची वस्ती प्रामुख्याने जंगलात, दऱ्या खोऱ्यात आणि पर्वतांनी व्यापलेल्या प्रदेशात आढळते. त्यामुळे त्यांना गिरीजन, भूमिजन, भूमिज, अरण्यक असे संबोधण्यात येते. भारतीय संविधानाने त्यांना आदिम जाती, जनजाती अनुसूचित जमाती असे संबोधले आहे.

महाराष्ट्रात एकूण ४५ आदिजमाती गणल्या गेल्या आहेत. त्यांच्या ७४ बोली भाषा आहेत. काही मराठीसारख्या, तर काही मराठीपेक्षा भिन्न आहेत. प्रत्येक आदिवासी जमातीची सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये चालीरीती, धार्मिक आचारात सारखेपणा आढळत नाही. ह्यातील ढोबळ गोष्टी, सांस्कृतिक वैशिष्ट्ये शहरी रंगकर्मी, ड्रेस डिसाईनर, रंगभूषाकार व वेशभूषाकार कलावतांना मार्गदर्शक ठरावा या उद्देशाने बहुरंग, पुणे संस्थने कुंडलिक केदारी यांच्या मार्गदर्शनाखाली 'आदिवासीची रंगभूषा व वेशभूषा' कार्यशाळा आयोजित केली होती. कार्यशाळेत पुणे जिल्ह्यातील प्रातिनिधिक जमाती म्हणून महादेव कोळी, ठाकर आणि कातकरी जमातीचे, जोडपे (नवरा बायको) मॉडेल म्हणून अभ्यासात घेतले. सुरुवातीला तीनही जमातींची वेशभूषा, रंगभूषा जीवन शैलीची वैशिष्ट्ये कुंडालिक केदारी यांनी प्रशिक्षणार्थींना सविस्तर विशद केली.

महादेव कोळी - वर्णाने काळे सावळे उंचीने मध्यम अंगयष्टी सडपातळ, काटक चेहरा तेलकट आणि मलूल सरळ नाक, करारी वृत्ती, नम्र स्वभाव, तापट बुबळे. पुरुषांचा घरातला पोशाख लंगोटी, कोपरी, टोपी, पागुटे, गळ्यात बदामीपेटी, हातात कडे, डोक्यावर कमी केस व दाढीचे खुंट वाढलेले. स्त्रिया लुगडे तांबूस, हिरवट, निळसर, रंगाचे वट्यांचे नेसणे. अंगात गाठीची चोळी, कर्णफुले, गोठ बांगड्या, काळी पोत (मंगळसूत्र) ही आभूषणे, कपाळ, हनुवटीवर गोंधलेलं. जत्रा, बाजारहाट सनवाटी वेशभूषेत थोडा बदल होतो तो म्हणजे पुरुष धोतर, पैरण (बंडी) टोपी किंवा पागुटे मफलर पायात वाहना. स्त्रियांच्या वेशात थोडा फरक पडतो. लुगडे (वट्यांचे) परंतु लहान पदर काढून डोक्यावर घेतात किंवा 'फडकी' (तांबडेवस्त्र) पदर म्हणून डोक्यावर घेतात. गळ्यात सरी, वेळा, नथ हे विशेष आभूषण घालतात. महादेव कोळी जमातींच्या

स्त्रिया दररोज कुंकू लावीत नसून सणवार उत्सवाला कुंकू लावतात. मुख्य व्यवसाय शेती आणि मजुरी.

ठाकर - काळे सावळे, आखुडबांधा, सडपातळ, काटक बुजरा, मलूल चेहरा, अबोल, पुरुष लंगोटी, अंगात बिन बाह्याची कोपरी, पागुटे, खांद्यावर टॉवेल, काणात बाळी. स्त्रिया लुगडे (वट्याचे), लहान पदर कंबरेला गुंडाळलेला, निळा, तांबडा, राखाडी रंगांची आवड, अंगात गाठीची चोळी, अंबाड्यावर भडक रंगाचे रिबिन, नाकात फुली (चमकी), सरी गोठ पाटल्या, काळीपोत, यांच्याही वेशभूषेत सण उत्सवात थोडा बदल होतो. पुरुष आखूड धोतर, पैरण (बंडी) पागुटे, खांद्यावर टॉवेल, स्त्रिया लुगड्याचा लहान पदर म्हणून खांद्यावर घेतात. मोठे कुंकू लावतात. मुख्य व्यवसाय मजुरी आणि शेती.

कातकरी - काळेसावळे, मध्यम उंची, चपळ, डोळे खोल, नाक चपटे, केस कुरळे, दाढी वाढलेली, दिसायला राकट, पुरुष लंगोटी, कोपरी (गोठ असलेली), डोक्याला रंगीत रुमाल, कडे तांब्याचे हाती. स्त्रिया आखूड गुढग्याच्यावर लुगडे, घट्ट कासुटा, आंबाड्यावर भडक रंगाची रिबीन, गाठीचं पोलकं, काचमण्याची गाठली, काळी पोत, मोठं कुंकू, कपाळ हनुवटीवर हातावर गोंधलेले. बाजारहाटाला जाताना पोशाखात थोडा बदल होतो. पुरुष कोपरी, लंगोटी ऐवजी लहान धोतराचा काचा किंवा लंगोटीवर टॉवेल कंबरेला गुंडाळतात. स्त्रिया रंगीत कपड्याचा तुकडा पदर म्हणून समोरुन पाठीवर घेतात. केसात घुंगुरु काटे, पायात कथलाचे पटी पैंजण म्हणून घालतात. मुख्य व्यवसाय मजुरी व जंगलातील कंदमुळे गोळा करणे.

प्रत्येक जमातीतील वेशभूषा आणि रंगभूषा भिन्न असून त्यातील बारकावे, त्यांच्या रंगभूषा आणि वेशभूषांतून सादर करणे ही अवघड बाब केदारी यांनी रंगभूषा, वेशभूषाकाराकडून सहजपणे करवून घेतली. ह्याची पूर्व तयारी म्हणून जुन्नरच्या बाजारातून आदिवासींचे कपडे खरेदी केले होते. ती जुणी मळकट आणि कळकट दिसण्यासाठी लाल मातीत भिजवून घुसळून सुकवून वापरली होती. जुन्या पद्धतीचे कपडे शंकरराव अनुटकर टेलरनी बनवून दिले होते. कार्यशाळेत महादेव कोळी जोडपे म्हणून सिकंदर मुलानी, ठाकर जोडपे मिलींद बाबा आणि मनिषा वाघमारे तर कातकरी जोडप म्हणून राहूल निगडे व अशातऱ्हेने ह्या रंगभूमीवरील कलाकारांची निवड केली होती. प्रात्यक्षिकानंतर तिन्ही जमातीच्या जोडप्यांचे घरातील वावर एकाच रंगमंचावर सादर केल्यामुळे प्रत्येक जमातील जीवन वैशिष्ट्य बेगळी पाहाण्याची संधी प्रशिक्षणार्थींना मिळाली. रंगमंचावर आदिवासींचा बाजार आणि लोकनृत्य दृश्याने अभ्यासकांबरोबर प्रेक्षकांचीही मने जिंकून विरंगुळा मिळाला.

कलावंतांना रंगभूषेतून अस्सल आदिवासी लुक देण्याचे काम बाळ जुवाटकर यांनी केले. त्यांची कसब प्रत्येक दृश्यात पहायला मिळाली. खास आदिवासी पद्धतीचे वट्याचे लुगडे नेसवण्याचे काम सौ. सुमन भालेकर या आदिवासी स्त्रीने केले. पुरुष वेशभूषेची जबाबदारी गोरख गायकवाड यांनी सांभाळली. या कार्यक्रमाला दुंदा मोरे, सदस्य, आदिवासी समाजकृती समिती महाराष्ट्र, पुणे यांनी सहकार्य केले. निरीक्षक म्हणून आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणेचे सहाय्यक संशोधक विजय डगळे उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे मुक्तकंठाने प्रशंसा केली. या कार्यशाळेसाठी विवेक काटकर, माडली पुराणे, रविंद्र सातपुते, श्री. भालेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

●●

# संस्थेने जनसेवा करण्याची संधी दिली

श्रीकृष्ण रघुनाथ वैद्य (काका)
आरोग्य मार्गदर्शक, लाशीर गाव (वेल्हे)

नोव्हेंबर १९९९ साली माझ्या गावात तीन चार अनोळखी लोक आले व योगायोग असा की त्यांना कोणीतरी माझ्या घरी पाठविले. त्यांची विचारपूस करताना त्यांनी आपले येण्याचे कारण सांगितले. त्यांचे सगळे बोलणे ऐकले व मी माझ्या गावातील लोक बोलवून घेतो व लोकांपर्यंत आपला उद्देश काय तो आपण कळवू असे सांगितले. त्याप्रमाणे मी भैरवनाथ मंदिरात ग्रामस्थांना बोलविले व त्या सभेमध्ये आलेल्या पाहुणे मंडळींनी आपला येण्याचा उद्देश सांगितला 'आपल्या गावातून आम्हाला एक पुरुष व एक महिला असे दोन लोक पाहिजेत तर आपण ग्रामस्थच आम्हाला दोन व्यक्ती आरोग्यविषयक कामाकरिता द्या व त्यांची नावे आपणच सुचवा' असे सांगितले. त्यावर ग्रामस्थांनी माझे व एका महिलेचे नाव सुचविले १९९९ मध्ये तालुक्यातील ५ पुरुष व १४ महिलांची नेमणूक करुन घेतली व त्यांना सलग तीन दिवस वेल्हे येथे बोलावून प्रशिक्षण दिले. त्यात १४ गावातील लोक होते. मलाही थोडीसी आरोग्य क्षेत्रात वेळ घालविण्याची आवड होती व 'आपला वेळ फुकट घेणार नाही अल्पसे मानधन देऊ' असे सांगितले. तीन दिवस प्रशिक्षणामध्ये जी माहिती दिली ती अशी होती- आमची एक संस्था आहे तिचे नाव महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद. आम्ही गावोगावी जाऊन आरोग्याविषयी जागृती करण्याचे ठरविले आहे. आम्ही पहिली सभा पंचायत समिती वेल्हे येथे घेतली आहे व आता आपले आरोग्यावर काम चालू करायचे आहे. असे सांगून प्रशिक्षणास सुरुवात केली. प्रथम आपल्या स्वत:च्या शरीराची स्वच्छता, परिसर स्वच्छता इथून सुरुवात केली व तीन दिवसांत आरोग्याविषयी जेवढी माहिती देता येईल तेवढी माहिती दिली. त्यामध्ये संस्थेचे अध्यक्ष मुटाटकर सर, मॅडम, शिल्पाताई, सावंत यांनी आम्हाला माहिती दिली व या नंतर आपण गावातच आरोग्यावर काम करायचे आहे असे ठरविले व काम सुरु झाले. चार-आठ दिवसांनी संस्थेचे लोक येऊन आमच्या भेटी घेऊन आम्हाला माहिती द्यायला लागले व यानंतर आपल्याला महिन्यातून एक प्रशिक्षण सभा घ्यायची आहे व आपण काय केले याचा आढावा घ्यायचा आहे, असे सांगितले. त्यावरुन महिन्याने एक दिवस १४ गावातील १९ आरोग्य मार्गदर्शक जमून प्रशिक्षण घेऊ लागलो. त्यामध्ये स्वत:ची स्वच्छता, गावाची स्वच्छता, पाणी शुद्धीकरण, गावातील जन्म झालेल्या मुलांचे लसीकरण, गरोदर मातेची तपासणी करुन धनुर्वात इंजेक्शन चे दोन डोस, लोहवर्धक गोळ्या मिळतात का यावर लक्ष देण्यास सांगितले. त्यावरुन लसीकरणास हजर रहाणे व व्यवस्थित होते का पाहणे, काही फरक वाटल्यास लसीकरणास आलेले आरोग्य खात्याचे एम.पी.डब्ल्यू, ए.एन.एम.यांना सांगणे, असे काम चालू केले व आपण केलेल्या कामाचा आढावा प्रशिक्षण सभेमध्ये सांगणे व पुढील माहिती घेणे हे काम चालूच झाले. त्यामध्ये लहान मुलांची देखभाल, शाळा, लग्नाचे वय याबरोबर महिलांचे आजार, पुरुषांचे आजार त्यात गरमी, परमा तसेच महिलांचे अंगावरुन जाणे, अंग येणे, गरोदरपणात हातापायास सूज येणे, बाळंतपण कोठे व का करावे, दवाखान्यताच का करावे, तसेच क्षयरोग, कुष्ठरोग, एड्स् या विषयावर आम्हाला प्रशिक्षण मिळू लागले. त्यात सर, मॅडम असायच्याच पण संस्थेचे कार्यकर्ते म्हणून आलेल्या

शिल्पाताई यांनी गावोगावी फिरुन आम्हाला फारच माहिती दिली. थोड्या दिवसांनी श्री. कुदळे साहेब आले. त्यांनी तर मला १४ गावातून फिरविले. आम्ही दोघे दुसऱ्या गावात जायचो. रात्री मुक्काम करायचो. जेवण सर्व कामे आटोपल्यावर २-३ तास आरोग्यावर चर्चा चालायची. त्यांचे ऐकूनच मला माहिती मिळत गेली व कामाकडे लक्ष लागले. आरोग्यावरचे काम चालू असताना संस्थेने आम्हाला सर्व आरोग्य मार्गदर्शकांना मुक्तांगण कॉलेज येथे ७-८ संस्थेचे कार्यक्रम होते तिथे दोन दिवस नेले, मुनोत सभागृह येथे नेले, ध्यासपर्व हा पिक्चर दाखविला, राळेगण सिद्धी येथे नेऊन तेथील सर्व परिस्थिती दाखविली. त्यात तंबाखू बंद, बिडी बंद, सिगरेट बंद, दारुबंद, कोयता-कुऱ्हाड बंद, भांडण बंद, भांडण झाल्यास गावातच न्याय देणे, नविन लग्न होऊन आपल्या गावात आलेल्या मुलीच्या लग्नास वर्ष होताच साडी व ब्लाऊज पीस देऊन सत्कार करणे, ज्या तालुक्यात वर्षातून ४-५ इंच पाऊस पडतो तिथे बाराही महिने विहिरीचे पाणी फुल्ल रहाण्यासाठी बांधलेले बांधारे अशा अनेक गोष्टी पहायला मिळाल्या. जामखेडला शिल्पाताई आम्हाला दोन मार्गदर्शकांना घेऊन गेल्या. तिथे डॉ. आरोळे साहेबांचा प्रकल्प पाहूनही विशेष वाटले. हे चालू असतानाच पाटील नावाचे एक कार्यकर्ते आले. त्यांनी गावोगावी फिरुन लोकांच्या मुलाखती घेणे. शिल्पाताईंनी महिलांच्या मुलाखती घेणे, नंतर त्यांना आरोग्याविषयी माहिती देणे हे चालू केले. त्यांचे मुलाखत घेताना जे बोलणे चालायचे ते ऐकून मला तर आपोआपच पुढील माहिती मिळायला लागली. त्यात भुपाली ताई, विदुलाताई यांनीही आम्हाला प्रशिक्षण दिलेच; पण गावोगावी फिरवून लोकांशी कसे बोलायचे व नुसते आरोग्यावर बोलून लोक जमा होणार नाहीत त्यासाठी काय करायचे तर प्रत्येक संक्रांतीला सर्व गावातून तिळगूळ-हळदीकुंकू कार्यक्रम घ्यायचा व जास्तीत जास्त महिला एकत्र बोलवायच्या. किशोरवयीन मुलींच्या मिटींग घ्यायच्या. त्यांच्या शरीराची वाढ म्हणजे होणारा बदल यावर चर्चा करायची. किशोरवयीन मुलांच्या मिटींग घ्यायच्या. त्यांच्या शरीरात होणारा बदल यावर माहिती द्यायची हे काम चालू असताना मार्गदर्शकांना प्रत्येकी ८ फॉर्म देऊन तुम्ही आपले गाव सोडून आपल्या कार्यक्षेत्रातील गावात जाऊन सभा घ्या व गटचर्चा करा, अहवाल भरा असे सांगितले. त्याप्रमाणे सर्व आरोग्य मार्गदर्शकांनी काम चालू केले. त्यामुळे आम्हाला माहिती घेता आली, चार लोकात बोलायची सवय लागली. या सर्व माहित मुळे आम्ही लोक दुसऱ्या गावात एकत्र जाऊन पुरुषांच्या महिलांच्या सभा घेत आलो. संस्थेचे कार्यकर्ते कुदळे साहेब-शिल्पाताई यांनी प्रथम मला दुसऱ्या गावात नेऊन सभेबद्दल जी माहिती दिली, त्यामुळे मी आज आपले १४ गावातील कुठल्याही गावात जाऊन लसीकरण, पाणी शुद्धीकरण, क्षयरोग, कुष्ठरोग, एड्स यावर चर्चा करुन गावोगावी सभा घेत असतो. महिला महिलांच्या सभा घेतात. मी पुरुषांची घेत असतो. फरक एकच करावा लागतो की प्रौढ पुरुष, किशोरवयीन मुले यातील बोलण्यात फरक करावा लागतो व आता कुठल्या वयाचे व्यक्ती समोर कोणता व कसा विषय घ्यायचा त्याची मला जाणीव झाली आहे. हे काम चालू असता संस्थेने बाहुल्यांचा कार्यक्रम आणला. त्यात मुलांचे जुलाब, गरोदरपण, गरोदरपणातील आहार, बाळंतपण, क्षयरोग, एड्स हे कार्यक्रम आम्ही चालू केल्यानंतर तर कार्यक्रमास भरपूर लोक येऊ लागले त्यात स्त्रिया, पुरुष, मुले, मुली ही मोठ्या संख्येने उपस्थित राहू लागले व आपले जे आरोग्याचे कार्य चालू आहे ते सर्वापर्यंत पोहचवित असल्यामुळे मनास समाधान वाटते. कारण नुसती सभा म्हटल्यास १० लोक जमले तर फार झाले; पण कार्यक्रम आहे असे सांगितलेस मोठी उपस्थिती असते हे समजून आले. आरोग्याच्या कार्यक्रमात पडद्याआडून दारुबंदी, तसेच दारुमुळे होणारे दुष्परिणाम,

एड्स, गरोदरपण याची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य चालू असतानाच संस्थेने महिलांचे आजार, किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबीन तपासणी मोफत करण्याचे ठरविले व २-३ शिबिरे वेल्हे रुरल हॉस्पिटल मध्ये घेतली. त्यात अनेक महिलांना फायदा झालेला आहे. शिबिरात सर्व मोफत होत आहे हे समजताच ज्या महिलांना काही जरुरी असेल त्या अगोदरच सांगतात की आपले डॉक्टर लोक कधी येणार आहेत. मला असा त्रास आहे तर त्यांना तारीख द्यायची व आपलेकडे नाव लिहून ठेवायचे हे काम सोपे झाले आहे. त्यामुळे कोणत्या गावात कोण आजारी आहे हे आपोआपच समजत आहे. संस्थेच्या लोकांची आरोग्याविषयी शिकवण, लाभार्थींना शिबीरात फुकट होणारे उपचार, यामुळे संस्थेचे कार्य घराघरात पोहोचले आहे व सभांमधून आरोग्याची माहिती मिळते, बाहुल्यांचे कार्यक्रमातून आरोग्याची माहिती मिळते व गाण्यातून कार्यक्रम चालू असल्यामुळे उपस्थिती भरपूर असते व लोक जमतात. माहिती ऐकतात, प्रश्न विचारतात. त्यांना उत्तरे देता येतात. जर उत्तर देता आले नाही तर नंतर काय ते सांगतो. संस्थेच्या कार्यकर्त्यांना विचारुन परत त्या गावात जाऊन माहिती देणे यामुळे ग्रामस्थांचा विश्वास बसला आहे हे सर्व कार्य मी किंवा बाकीचे आरोग्य मार्गदर्शक करीत असले तरी संस्थेचे अध्यक्ष, मॅडम, कुदळे साहेब. शिल्पाताई, विदुलाताई, भुपालीताई, पाटील भाऊ साहेब यांनी आम्हाला जे वेळोवेळी प्रशिक्षण दिले, आमचे बरोबर गावोगावी फिरुन आम्हाला जमलेल्या लोकांसमोर बोलायला शिकविले, आमची भिती घालवण्याचा प्रयत्न केला; नव्हे भिती घालवली व आम्हाला आरोग्य मार्गदर्शक म्हणून गावोगावी फिरण्यास नेऊन आम्हाला जी माहिती दिली ती एक न विसरण्यासारखीच गोष्ट आहे. कुदळेसाहेब व शिल्पाताई यांनी प्रजनन, बालआरोग्य व आरोग्यविषयक जाणीव जागृती या कार्यक्रमाचा पाया रचून दिला.

त्यात मोलाची माहिती विदुलाताई यांनी दिली आरोग्यावर कॅम्प घेतले. वेल्हे, मालवली, लाशिरगाव या तीन ठिकाणी कॅम्प घेतले. ह्या कॅम्पमुळे अनेक लोकांचा एकही पैसा खर्च न करता फायदा झाला. लाशिरगांव, मालवली, वांजळे या गावी औषधी वनस्पती लावण्याचा प्रकल्प दिला. त्यांना अल्पसे पैसे दिले. पैकी २० शेतकऱ्यांनी कलमे लावून त्याची निगा ठेवली आहे. एक नविन प्रकल्प आणून मौजे लाशिरगाव, मालवली, दापोडे, वेल्हे येथील शाळा व हायस्कूलमध्ये सूर्यनमस्कार शिकविण्याचे ठरविले. पण २ महिने प्रयत्न करुन कोणी मिळेना. शेवटी एक सुर्यनमस्कार शिकवणाऱ्या मॅडम मिळाल्या, त्या म्हणजे वैशालीताई यादव. त्यांनी चार शाळेतील मुलांना सुर्यनमस्कार व दोन तीन योगासने शिकविली. त्यामुळे चार शाळेतील मुलांचे शरीरातच फरक पडला आहे व प्रत्येक शाळेतील सरांना यापुढेही शिकवावे असे वाटत आहे. आता थोड्याच दिवसा अगोदर लाशिरगावमध्ये आरोग्यावर कॅम्प घेतला. त्या कॅम्पला १३२ लोकांना उपचार केले. त्यातील बऱ्याच लोकांना परत औषधे मिळावीत असे वाटते व स्वखर्चाने औषधे घेऊ असे म्हणतात. पानशेत भागातील आयुर्वेदिक औषधे देणारे श्री गायकवाड मामा यांनी मला अनेक प्रकारची माहिती दिली व देत आहेत. संस्थेचे कार्यकर्ते कुदळे सर, शिल्पाताई खळदकर यांनी मला मोलाची माहिती देऊन आरोग्याविषयी घरोघर माहिती देण्याचा पाया रचून दिला. त्याचा कळस विदुलाताईंनी पूर्ण केला आहे. या पाच वर्षात संस्थेने मला १४ गावांतील घरोघरी फिरून जनसेवा करण्याची जी संधी दिली त्याबद्दल मुटाटकर सर, मॅडम, कुदळे सर, शिल्पाताई, पाटील, भूपाली ताई, विदुला ताई यांचा आभारी आहे.

••

## लेखकांसाठी

हाकारा त्रैमासीकाचे ह रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. गेली २५ वर्षे अखंडपणे आदिवासी जीवन, संस्कृती, समस्या, कला, साहित्य आदी गोष्टींची ओळख इतर पांढरपेशी-नागर समाजाला करून दिलेली आहेच, परंतु त्याचबरोबर आदिवासी नवसाहित्यिकांना एक हक्काचे व्यासपीठ हाकारा च्या रूपाने मिळाले आहे.

अशा या नियतकालिकात आणखीही काही कार्यकर्त्यांना आपले विचार मांडायचे असतील, लेखक-कवींना आपले साहित्य प्रसिध्द व्हावे असे वाटत असेल, तर जरूर लिहावे व आमच्याकडे पाठवावे. पत्ता अंकात दिलेला आहेच.

## निवेदन


( फॉर्म ४, नियम ८ नुसार )

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, पुणे ४११ ००७ |
| २. प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | ६४, आनंद पार्क. औंध, पुणे ४११ ०१७ |
| ४. स्वामीत्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद |

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीनुसार खरा आहे.

रा. के. मुटाटकर
प्रकाशक

३१ जानेवारी २००४